मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://epapervrittamanas. in/

# वृत्तमानस

आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६

मुंबई/ पालघर | रविवार, २ फेब्रुवारी २०२५ | वर्ष- २९ | अंक - २२३ | पाने- ८


Email : vrittamanas1@gmail. com

## कुंभमेळ्याला गेलेल्या भाविकांच्या गाडीला अपघात; तिघांचा मृत्यू

**सिन्नर :** रत्नागिरीतून कुंभमेळ्याला गेलेल्या भाविकांच्या गाडीला शनिवारी पहाटे भीषण अपघात झाला. या अपघातात 3 जणांचा मृत्यू झाला असून एकाची प्रकृती गंभीर आहे. या अपघातात आणखी तिघेजण जखमी झाले असून निवृत्त प्रा. प्रताप सावंत देसाई, वाहन चालक भगवान झगडे व अक्षय निकम यांचा मृत्यू झाला. हा अपघात नाशिक जिल्ह्यातील सिन्नरजवळ शनिवारी पहाटे 4 वाजण्याच्या सुमारास झाला. हे सर्वजण कुंभमेळ्यातील शाही स्नान आटोपून इनोव्हा गाडीने रत्नागिरीला परत येत होते. यावेळी समोरुन येणाऱ्या डंपरने गाडीला जोरात धडक दिली. हा अपघात इतका भयावह होता की, तिघांचा जागीच मृत्यू झाला.



# मोदी सरकारचं मिडलक्लास बजेट



- संरक्षण क्षेत्रासाठी 6 लाख 81 हजार 210 कोटी रुपयांची तरतूद
- आयकर फाईल करण्याची 4 वर्षांनी वाढवली मुदत
- 7 कोटी शेतकऱ्यांना किसान कार्ड

## 12 लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त

नवी दिल्ली

**पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या तिसऱ्या कार्यकाळातील 2025-26 वर्षासाठीचा संपूर्ण अर्थसंकल्प अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज संसदेत सादर केला. हा अर्थसंकल्प सादर करत सीतारामन यांनी सलग आठ अर्थसंकल्प सादर करणाऱ्याचा विक्रम त्यांच्या नावावर नोंदवला. आजच्या या अर्थसंकल्पात त्यांनी सर्वसामान्याचं लक्ष लागून असलेल्या टॅक्सबाबत मोठी घोषणा केली. यावेळी इथून पुढे आता 12 लाखांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त असल्याचं त्यांनी जाहीर केलं.**


आजच्या बजेटमधून त्यांनी शेतकरी, सूक्ष्म व लघू उद्योग यासह विज्ञान आणि तंत्रज्ञानावर भर दिल्याचं पाहायला मिळत आहे शेतकऱ्यांसाठी महत्वाचं मानल्या जाणाऱ्या किसान क्रेडिट कार्डवरील कर्जाची मर्यादा त्यांनी 3 लाखांवरून 5 लाखांवर केली. तर यूरीया निर्मितीत देशाला आत्मनिर्भर करण्यासाठी तीन नवीन कारखाने उभारणार असल्याची घोषणा सीतारामन यांनी केली. तसंच देशात 3 एआय सेंटर उभारण्यात येणार असून लोकांसाठी परदेशी प्रवासासाठी गरजेचा असलेल्या व्हिजासाठीचे नियम सोपे करत तो सहज उपलब्ध व्हावा यासाठी अनेक नियमांत बदल करण्यात आले आहे तर पुढील आठवड्यात इन्कम टॅक्स बील पुढील संसदेत मांडलं जाणार आहे. यासह कस्टम ड्युटीतून 36 महत्त्वाची औषधं वगळली जाणार असून कॅन्सरवरील औषधं कस्टम ड्युटीतून वगळण्यात येणार असल्याची घोषणाही अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केली.

## अमृतकाळात भारताला आर्थिक सुबत्ता देणारा अर्थसंकल्प



गरीब, युवक, शेतकरी, महिला या चार घटकांना समर्पित आणि शेती विकास आणि उत्पादकता,ग्रामीण समृद्धी आणि शाश्वतता, रोजगार आधारित विकास, मनुष्यबळ तयार करणे, नाविन्यपूर्ण गुंतवणूक, ऊर्जेची उपलब्धता आदी १० क्षेत्रांना व्यापत अमृतकाळात भारताला सुबत्ता देणारा आणि पर्यायी इकोसिस्टीम तयार करणारा केंद्रीय अर्थसंकल्प आहे. राज्यांसाठीही यात महत्वपूर्ण तरतुदी करण्यात आल्या असून याचा लाभ घेत महाराष्ट्रही विकासित भारत देशाच्या घोड दौडीत अग्रेसर होईल.

## विकसित भारताला बळ देणारा अर्थसंकल्प



*यंदाच्या अर्थसंकल्पात 140 कोटी भारतीयांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबित झाल्या आहेत. युवकांसाठी विविध क्षेत्रांची दारे खुली झाली आहेत आणि विकसित भारत हे अभियान आता सामान्य नागरिक पुढे नेतील. हा अर्थसंकल्प देशाचे सामर्थ्य कित्येक पटींनी वाढवणारा आहे. हा अर्थसंकल्प या उद्दीष्टांची पायाभरणी करणारा आहे. अर्थसंकल्प देशाचे सामर्थ्य कित्येक पटींनी वाढवणारा आहे. बचत, गुंतवणूक, क्रयशक्ती आणि विकास यामध्ये यामुळे वाढ होईल. अर्थसंकल्पात 12 लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नाला करात सूट दिल्याचे अधोरेखित करत सर्व उत्पन्न गटातील व्यक्तींच्या करात कपात केल्यामुळे मध्यम वर्गाला आणि नव्यानेच नोकरीला लागलेल्यांना त्याचा फार मोठा फायदा होणार आहे. अर्थसंकल्पात सुधारणांसाठी लक्षणीय उपयायोजना करण्यात आल्या आहेत. खाजगी क्षेत्राला अणु उर्जा क्षेत्रात प्रोत्साहन देण्याचा निर्णय ऐतिहासिक आहे. अर्थसंकल्पात रोजगारनिर्मितीच्या सर्व क्षेत्रांवर भर देण्यात आला आहे. जहाजबांधणी क्षेत्राला पायाभूत सुविधा क्षेत्राचा दर्जा दिल्यामुळे भारतात मोठी जहाजे बांधण्याला चालना मिळेल, आत्मनिर्भर भारत अभियानाला गती मिळेल.*

## काय स्वस्त...

- जीवन वाचवणारी औषधे
- एलईडी, एलसीडी टीव्ही
- इलेक्ट्रिक वाहन
- मोबाईल फोन
- जहाज उत्पादन
- चामड्याच्या वस्तू
- फर्निचर
- क्रिटिकल मिनरल्स






## काय महाग...

- इंटरॅक्टिव्ह फ्लॅट
- पॅनेल डिस्प्ले
- फॅबरिक
- आयात केलेले मोबाइल फोन
- सोने आणि चांदी
- परदेशातून आयात केल्या जाणाऱ्या वस्तू



## गोळीबाराच्या जखमेवर 'बँडेज'चा उपाय



गोळीबाराच्या जखमेवर फक्त पट्टी बांधण्याचा (बँडेज लावण्याचा) हा प्रकार आहे. सध्या जागतिक अस्थिरता असून अनेक देशांवर मंदीचे सावट आहे. जागतिक अर्थव्यवस्थाही अस्थिर आहे. अशा काळात देशाला आर्थिक संकटांचा सामना करण्यासाठी योग्य बदल आणि उपाययोजनांची गरज होती. मात्र, या अर्थसंकल्पात असे काहीही दिसून येत नाही. जागतिक अनिश्चितता आणि अस्थिरतेच्या काळात देशासमोरील आर्थिक संकटे रोखण्यासाठी योग्य बदलांची, योग्य दिशेची आणि उपाययोजनांची गरज आहे. मात्र, या अर्थसंकल्पातून सरकारची योजनांची दिवाळखोरी दिसून येत आहे.

## केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्र

- मुंबई मेट्रो : 1255.06 कोटी
- पुणे मेट्रो : 699.13 कोटी
- एमयुटीपी : 511.48 कोटी
- एमएमआरसाठी एकात्मिक आणि हरित प्रवासी सुविधा: 792.35 कोटी
- मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वे : 4004.31 कोटी
- इकॉनॉमिक क्लस्टर : 1094.58 कोटी
- जोडसुधार प्रकल्प: 683.51 कोटी
- महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क : 596.57 कोटी
- नागनदी सुधार प्रकल्प : 295.64 कोटी
- मुळा-मुठा संवर्धन : 229.94 कोटी
- ऊर्जा कार्यक्षम उपसा सिंचन प्रकल्प : 186.44 कोटी

## चेंगराचेंगरीवरुन अर्थसंकल्पीय भाषणाच्या सुरुवातीलाच विरोधकांचे 'वॉकआऊट'



प्रयागराजमधील महाकुंभमध्ये झालेल्या चेंगराचेंगरीच्या मुद्द्यावरुन अर्थसंकल्पीय भाषणाच्या सुरुवातीलाच विरोधी पक्षाने लोकसभेतून वॉकआऊट केले. लोकसभेचे कामकाज सुरू करताना लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना अर्थसंकल्प सादर करण्याची परवानगी दिली. अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणाला सुरुवात करताच तृणमूल काँग्रेस पक्ष सोडून विरोधी पक्षाच्या खासदारांनी वॉकआऊट केले. केंद्रीय अर्थमंत्री अर्थसंकल्प सादर करण्यासाठी उभ्या राहिल्या. त्याबरोबरच विरोधी पक्षाच्या खासदारांनी गदारोळ करण्यास सुरुवात केली. अर्थसंकल्पापूर्वी, प्रयागराजमधील कुंभमेळ्यातील चेंगराचेंगरीवर चर्चा करण्याची मागणी विरोधकांनी केली. गदारोळामध्ये, समाजवादी पक्षाचे सर्व खासदार वेलमध्ये उतरले. उर्वरित विरोधकांनी आपापल्या जागी उभे राहून गदारोळ केला. यावेळी, विरोधकांनी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या राजीनाम्याची मागणीही केली. सुमारे पाच मिनिटे घोषणाबाजी केल्यानंतर, विरोधक काही काळासाठी सभागृहातून बाहेर पडले. काही वेळाने विरोधी पक्षाचे खासदार पुन्हा सभागृहात परतले. मात्र, तृणमूल काँग्रेसने विरोधकांच्या वॉकआउट आणि गदारोळात इंडिया आघाडीला पाठिंबा दिला नाही. तृणमूल काँग्रेसच्या खासदारांनी शांतपणे आपल्या जागी बसून अर्थसंकल्पीय भाषण ऐकले.

## महाराष्ट्र एनसीसी देशात सर्वोत्कृष्ट

मुंबई



नवी दिल्ली येथे झालेल्या एनसीसी प्रजासत्ताक दिन शिबिरामध्ये अनेक वैयक्तिक तसेच सांघिक पारितोषिके प्राप्त करणाऱ्या महाराष्ट्र एनसीसीच्या कॅडेट्सना राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राजभवन येथे निमंत्रित करून शाबासकी दिली. महाराष्ट्र एनसीसीने आजवर 17 वेळा प्रतिष्ठित असे पंतप्रधानांचे निशाण पटकावले आहे, अनेकदा राज्य एनसीसी संचालनालय द्वितीय क्रमांकावर आली आहे. यंदा अनेक सांघिक प्रकारांमध्ये राज्यातील कॅडेट्सनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. राज्याच्या कॅडेटने प्रजासत्ताक दिन परेडचे नेतृत्व केले आहे. त्यामुळे महाराष्ट्र एनसीसी आजही देशात सर्वोत्कृष्ट आहे, असे प्रतिपादन राज्यपालांनी यावेळी बोलताना केले. मात्र पंतप्रधानांचे निशाण पुन्हा प्राप्त करण्यासाठी एनसीसीने नव्या उत्साहाने तयारीला लागावे, असे आवाहन राज्यपालांनी यावेळी केले.

## पाकिस्तानात लष्कर आणि बलुच बंडखोरांमध्ये धुमश्चक्री

### 18 जवान शहीद, 23 दहशतवादीही ठार

क्वेट्टा

पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतात फुटीरतावाद्यांनी केलेल्या हल्ल्यात 18 पाकिस्तानी सैनिक ठार झाले आहेत. या चकमकीत 23 दहशतवादीही मारले गेल्याचे पाकिस्तानी लष्कराचे अधिकारी सांगत आहेत.

लष्कराने सांगितले की, दहशतवाद्यांविरुद्ध त्यांची कारवाई सुरूच राहील आणि या घटनेतील दोषींना अटक करून तुरुंगात पाठवले जाईल. पाकिस्तानी सैनिक बलुचिस्तानमधील अनेक जिल्ह्यांमध्ये फुटीरतावाद्यांविरोधात कारवाई करत आहेत. बलुचिस्तानमध्ये गेल्या 24 तासांत वेगवेगळ्या कारवाईत एकूण 23 दहशतवादी ठार झाले आहेत. वृत्तानुसार या हल्ल्यासाठी बलुच लिबरेशन आर्मीला जबाबदार धरले जात आहे.

## इतिहासातील विनाशकारी आगीवर 3 आठवड्यानंतर अखेर नियंत्रण

लॉस एंजेलिस



इतिहासातील विनाशकारी आगीवर अखेर 3 आठवड्यानंतर नियंत्रण मिळाले आहे. लॉस एंजेलिस येथील दोन जंगलामध्ये लागलेल्या आगीमध्ये असंख्य लोकांना प्राण गमवावे लागले होते तर 10 हजार हून जास्त घरे आगीत भस्मसात झाली होती. अमेरिकेतली लॉस एंजेलिसच्या दोन जंगलात लागलेली आग पूर्णपणे आटोक्यात आली आहे. अग्निशमन एजन्सी कॅल फायरने ही माहिती दिली आहे.

इतिहासातील सर्वात विनाशकारी आग अखेर आटोक्यात आली आहे. तीन आठवड्याहून सुरू असलेल्या या आगीमध्ये 30 लोकांचा मृत्यू झाला आणि

### महासत्ता अमेरिकाही आगीत होरपळली

हजारो घरे भस्मसात झाली आहेत. असंख्य लोकांना स्थलांतर करावे लागले आहे. दोन्ही आगी या 7 जानेवारी रोजी लागल्या होत्या.

इतिहासातील विनाशकारी आगदक्षिण अमेरिकेतील दोन जंगलांमध्ये लागलेली ही आग इतिहासातील सर्वात भीषण आणि विनाशकारी आगीपैकी एक होती.या आगीत 37,000 एकर (150 चौरस किलोमीटर) पेक्षा जास्त क्षेत्र आणि 10,000 हून अधिक घरे नष्ट झाली.

## कर्नाटक देणार त्रस्त रुग्णांना सन्मानाने मरणाचा अधिकार

बंगळुरू



कर्नाटक सरकारने गंभीर आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णांना सन्मानाने मरण्याचा अधिकार दिला आहे. याबाबत सर्वोच्च न्यायालयाचा आदेश दिले होते. तर देशात हा कायदा लागू करणारे कर्नाटक पहिले राज्य ठरले असून ज्यांना दीर्घ आजार आहे किंवा ज्यांना हॉस्पिटलमध्ये लाइफ सपोर्ट सिस्टमवर आहेत पण जगण्याची इच्छा नाही, अशा त्रस्त रूग्णांना आता सन्मानाने इच्छामरण स्वीकारण्याचा अधिकार मिळणार आहे.

कर्नाटकचे आरोग्य मंत्री दिनेश गुंडूराव यांनी माहिती दिली आहे. त्यांनी याबाबत आपल्या एक्स पोस्टमध्ये याची माहिती दिली आहे. राव यांनी, 'रुग्णांना सन्मानाने मरण्याचा अधिकार' देताना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाची अंमलबजावणी करण्याचे ठरवले आहे. यासाठी राज्याच्या आरोग्य विभागाने ऐतिहासिक आदेश जारी केला आहे.

## छत्तीसगडमध्ये 8 नक्षलवादी ठार

### विजापूरमध्ये दोन्ही बाजूंकडून गोळीबार सुरु, मोठ्या नक्षलवाद्यांना घातला घेराव

वृत्तसंस्था

जगदलपूर

छत्तीसगडमधील विजापूर जिल्ह्यात शनिवारी पुन्हा सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक झाली. या चकमकीत आतापर्यंत 8 नक्षलवादी ठार झाल्याची माहिती आहे. ही संख्या आणखी वाढू शकते. सकाळी साडेआठ वाजल्यापासून दोन्ही बाजूंनी गोळीबार सुरू आहे.

जवानांनी माओवाद्यांच्या मोठ्या कार्यकर्त्यांना घेरले असल्याचे सांगण्यात येत आहे. बस्तरचे आयजी सुंदरराज पी यांनी या चकमकीला दुजोरा



दिला आहे. हे प्रकरण गांगलूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गांगलूर परिसरातील जंगलात मोठ्या प्रमाणात नक्षलवादी असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे, डीआरजी, एसटीएफ, कोब्रा 202 आणि सीआरपीएफ 222 बटालियनच्या जवानांच्या संयुक्त पथकाने शोध मोहिमेवर विजापूर येथून बाहेर काढले.

जवानांना पाहताच माओवाद्यांनी गोळीबार सुरू केला शनिवारी सकाळी जेव्हा सैनिक त्या भागात पोहोचले, तेव्हा माओवाद्यांनी सैनिकांना पाहिले आणि गोळीबार सुरू केला. यानंतर जवानांनीही पदभार स्वीकारत नक्षलवाद्यांच्या गोळ्यांना चोख प्रत्युत्तर दिले. या चकमकीत नक्षलवाद्यांचे किती नुकसान झाले हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. चकमक सुरूच असल्याचे आयजी सुंदरराज पी यांनी सांगितले. शोधमोहीमही राबवली जात आहे.

10 दिवसांपूर्वी गरियाबंदमध्ये 16 नक्षलवादी ठार झाले होते 20-21 जानेवारी रोजी गरियाबंद जिल्ह्यातील जंगलातही चकमक झाली होती. सुमारे 80 तास चाललेल्या या कारवाईत 16 नक्षलवादी ठार झाले. त्यापैकी 12 नक्षलवाद्यांवर एकूण 3 कोटी 16 लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. ठार झालेल्या नक्षलवाद्यांमध्ये नक्षल केंद्रीय समितीचे सदस्य चलपती यांचाही समावेश आहे. एकट्या चलपतीवर 90 लाखांचे बक्षीस होते. नुआपाडा-गरियाबंद-धमतरी विभाग समितीचे प्रमुख सत्यम गावडे हेही चकमकीत मारले गेले.

## स्वराज्य टॅक्सी चालक मालक संघ, मनोर - सावरा लाईनचे उद्घाटन

**पालघर :** आज दिनांक 1 फेब्रुवारी रोजी स्वराज्य_टॅक्सी चालक मालक संघ , मनोर - सावरा लाईन चे उद्घाटन अतिशय उत्साहात करण्यात आले.संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष जनाठे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम साजरा करण्यात आला या प्रसंगी शिवसेनेचे(उबाठा) नेते उत्तम पिंपळे यांनी सदिच्छा भेट दिली. संघटनेचे योगेश भुयाळ,दामोदर कासट, सुनील किरकिरा, कुणाल बरफ उपस्थित होते, रामदास हरवटे व नव्याने सुरू झालेल्या युनियन चे अध्यक्ष भाई पाटील व त्यांचे सर्व पदाधिकारी व चालक मालक, चहाडे युनियन - केव युनियन - गणेश घाट युनियन-वेळगाव रोड युनियन चे पदाधिकारी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## थोडक्यात

### कर्नाक रेल्वे उड्डाणपुलाची तुळई रेल्वे भागात सरकविण्याची कार्यवाही पूर्ण

**मुंबई:** मशीद बंदर रेल्वे स्थानकापासून काही अंतरावर असलेला व पी. डिमेलो मार्गाला जोडणाऱ्या कर्नाक रेल्वे उड्डाणपूल प्रकल्पातील महत्वाचा टप्पा असलेली ५५० मेट्रिक टन वजनी उत्तर बाजूची तुळई (गर्डर) रेल्वे भागात सरकविण्याची कार्यवाही यशस्वीरित्या पूर्ण झाली आहे. मध्य रेल्वे प्रशासनाने शुक्रवार, ३१ जानेवारी २०२५ रोजी रात्री ०१.३० ते मध्यरात्री ४.०० या अडीच तासांच्या कालावधीत वाहतूक व वीज पुरवठा या दोन्ही घटकांमध्ये घेतलेल्या विशेष खंड (स्पेशल ब्लॉक) दरम्यान तुळई सरकविण्याची आव्हानात्मक कार्यवाही पूर्ण करण्यात आली. रविवार, २६ जानेवारी २०२५ रोजी तुळई सरकवण्याची कार्यवाही पूर्ण होण्यास १२ मीटर अंतर शिल्लक असताना काही तांत्रिक अडचणींमुळे व्यत्यय आला होता. मात्र, महानगरपालिका आणि मध्य रेल्वे प्रशासन यांनी समन्वय साधून, तांत्रिक अडचणींवर मात करत तुळई सरकविण्याची कार्यवाही काल ३१ जानेवारी २०२५ पूर्ण केली आहे. तुळई सरकविण्याचे हे काम तांत्रिकदृष्ट्या अतिशय आव्हानात्मक होते. त्यासाठी विशेष तज्ञ मे राईट्स यांचे मार्गदर्शन घेण्यात आले. मध्य रेल्वे प्रशासनाने विशेष ब्लॉक घेऊन तुळई सरकविण्याची कार्यवाही पूर्णत्वास नेण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेला विशेष सहकार्य केले.

### प्रबोधन गोरेगावची मराठी कथाकथन स्पर्धा

**मुंबई:** प्रबोधन गोरेगाव संचालित प्रबोधनकार ठाकरे वाचनालय आयोजित ' समाजसेवक उद्योगपती निळकंठ उर्फ भाईसाहेब सावंत स्मृती' मराठी कथाकथन स्पर्धा २०२५ ही दि. २२ मार्च व २३ मार्च रोजी प्रबोधन क्रीडाभवन, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प) मुंबई येथे आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धा मुंबई ( शहर व उपनगरे), ठाणे, पालघर आणि रायगड या जिल्ह्यांतील ३५ ते ६५ वर्षे वयोगटातील सर्वांसाठी खुली आहे. विजेत्यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिके रू. ११०००/- , रू. ७०००/-, रू. ५०००/- व रू १०००/-आणि रू. १०००/- ची दोन उत्तेजनार्थ पारितोषिके तसेच सर्व विजेत्यांना स्मृतिचिन्ह दिले जाईल. त्याशिवाय पहिल्या तीन पारितोषिक विजेत्यांपैकी ज्यांची स्वलिखित विनोदी कथा असेल त्यांना रू. ३०००/- चे स्वतंत्र विशेष कौशल्य पारितोषिक दिले जाईल. कथा स्वलिखित, अन्य लेखकाची अथवा अनुवादित चालेल. परंतु सद्भिरुचिहीन नसावी. सादर करताना कथा मुखोद्गतच हवी. अर्ज प्राप्त होण्याची अंतिम तारीख दि. ८ मार्च २०२५ सायंकाळी ५ वाजेपर्यंत आहे.अर्ज prabodhankridabhavan2014@gmail.com या इ-मेलवरच करावे लागतील. स्पर्धेसाठी प्रवेश मुल्य रू. २००/- (जीएसटीसह) आहे आणि हे प्रवेश मूल्य मोबाईल क्रमांक - ७५०६७६०६७६ वर अदा करावे लागेल. स्पर्धेची तपशीलवार नियमावली वरील इ-मेलवरुन मागवता येईल वा ती संस्थेच्या www.prabodhan.org या वेबसाईटवर तसेच फेसबुक, इन्स्टाग्राम वर उपलब्ध आहे. अधिक माहितीकरिता संपर्क: ७७००९२८२८४ दुपारी ३ ते ५ ( सुटीचे दिवस सोडून)


**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.


# स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये?

**इच्छुकांची अस्वस्थता कायम !**

प्रतिनिधी
■ वसई

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या मुंबईतील मेळाव्यात राज ठाकरे यांनी ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची शक्यता वर्तवल्याने इच्छुक उमेदवारांमध्ये पुन्हा गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे. यापूर्वी राज ठाकरे यांनी निवडणुकीच्या वेळेचा अचूक अंदाज वर्तवल्यामुळे त्यांच्या विधानाला गांभीर्याने घेतले जात आहे. मात्र, प्रत्यक्षात न्यायालयीन प्रक्रियेमुळे निवडणुका लगेच होण्याची शक्यता फार धूसर आहे.

वसई-विरार महानगरपालिकेची निवडणूक गेल्या साडेचार वर्षांपासून लांबणीवर पडली आहे. परिणामी विकासकामे ठप्प झाली असून प्रशासकीय अधिकाऱ्यांची मनमानी वाढली आहे. नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष केले जात असून कोणताही ठोस निर्णय घेतला जात नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नेमक्या कधी होणार, याविषयी वारंवार उलटसुलट चर्चा होत असल्याने इच्छुक उमेदवार संभ्रमावस्थेत आहेत.निवडणुकीच्या तारखा न्यायालयीन सुनावण्यांवर अवलंबून असल्याने सध्या 'तारीख पे तारीख'ची स्थिती निर्माण झाली आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या संदर्भातही निवडणुकीचा निर्णय अद्याप स्पष्ट झालेला नाही. त्यामुळे इच्छुक उमेदवार व पक्षांचे कार्यकर्तेही अनिश्चिततेच्या गर्तेत आहेत.

***राजकीय समीकरणे बदलणार?***

*वसई-विरार आणि आसपासच्या ग्रामीण भागात बहुजन विकास आघाडी (बविआ) आणि भाजपमध्ये लढत होण्याची शक्यता आहे. माजी आमदार विवेक पंडित यांच्या लेकी भाजप आमदार असल्याने श्रमजीवी संघटनेचा प्रभाव ग्रामीण भागात जाणवतो. सध्या वसईत चार जिल्हा परिषद गट आणि आठ पंचायत समिती गण आहेत. यापैकी बहुतांश जागा बविआकडे आहेत, मात्र भाजपमध्ये धनदांडगे उमेदवारीसाठी इच्छुक असल्याने आगामी निवडणुकीत नवे समीकरण तयार होऊ शकते.*

वारंवार निवडणुकीच्या चर्चांमुळे इच्छुक उमेदवार आणि कार्यकर्त्यांचा भ्रमनिरास होत आहे. त्यामुळे अनेकांनी आता निवडणुका इतक्यात होणार नाहीत, या मतावर शिक्कामोर्तब केले आहे. ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये निवडणुकांचा बिगुल वाजेल की पुन्हा फक्त चर्चा आणि अफवा राहतील, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# भारतीय सुलेखन सौंदर्याचे दर्शन घडविणारे प्रदर्शन आणि पुस्तकाचे मुख्यमंत्र्यांच्या अनावरण



प्रतिनिधी
■ मुंबई


'अक्षरभारती' भारतीय सुलेखन सौंदर्याचे दर्शन घडविणारे प्रदर्शन आणि पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे अनावरण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जहागीर आर्ट गॅलरीत करण्यात आले. यावेळी राज्यमंत्री आशीष जैसवाल, नवनीत प्रकाशनचे अनिल गाला, पद्मश्री अच्युत पालव आणि जहागीर आर्ट गॅलरी च्या मिस मेनन उपस्थित होत्या.

यावेळी मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र शासनाने अच्युत पालव यांना पद्मश्री दिल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो, त्यांनी ही कला जोपासली आणि अक्षरकलेला जनसामान्यां पर्यंत पोहोचवले अणि सगळयां कलावंताना ह्या पुस्तकाच्या माध्यमातून सामावून घेतलं. अक्षर लिपि ही आपल्या भारताची खूप प्राचीन लिपी आहे. लिपि ही आपल्याला जिवंत ठेवायला मदत करते. आपली ही संस्कृति पुढच्या पिढी पर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे आणि हे काम पद्मश्री अच्युत पालव खूप चांगल्या प्रकारे करत आहेत. नवनीत प्रकाशनचे अनिल गाला म्हणाले, अच्युत पालव माझ्याकडे पुस्तकांबद्दल म्हणाले. लिपि पुढे कशी घेऊन जाऊया त्यावेळी मी म्हणालो आपण प्रयत्न करा मी तुमच्या सोबत आहे.

पद्मश्री अच्युत पालव यांनी यावेळी मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांना विनंती केली की, प्रत्येक मराठी भाषाचे संग्रहालय निर्माण व्हावे, त्यामुळे सगळयांना लिपिचे ज्ञान होईल. कारण भारत हा जसा शेती प्रधान देश आहे. तसा तो लिपि प्रधान ही देश आहे.

'अक्षरभारती' या पुस्तकात प्राचीन ब्राह्मी, खरोष्ठी, ग्रंथी, शारदा, मोडी, अवेस्तन, सिद्धम पासून ते देवनागरी, गुजराती, उर्दू, गुरुमुखी, कन्नड, तेलगु, मल्याळम या लिप्यांविषयी कलात्मक आढावा घेण्यात आला असून देशातील ३६ सुलेखनकारांची २३६ अक्षरचित्रे या पुस्तकात आहेत. याशिवाय श्री गणेश देवी, डॉ. संतोष क्षिरसागर, डॉ. बलसेकर, जी.व्ही. श्रीकुमार, नारायण भट्टाथिरी आणि अशोक परब यांचे अभ्यासपर लेख या पुस्तकात समाविष्ट करण्यात आले आहेत. या पुस्तकाची संकल्पना आणि प्रकाशनाची जबाबदारी अच्युत पालव यांची आहे. यासोबतच काही निवडक चित्रांचं प्रदर्शन जहांगीरच्या कला दालनात मांडण्यात येणार असून २८ जानेवारी ते ३ फेब्रुवारी सकाळी ११ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत रसिकांसाठी खुले राहणार आहे. नेहमी लिहील्या जाणाऱ्या लिप्यांचं सौंदर्य वेगळया आणि मोठ्या प्रमाणात कसं दिसतं हे पाहण्यासाठी रसिकांबरोबरच शाळा, कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी हे प्रदर्शन पाहण्यासाठी यावं असं आवाहन सुलेखनकार अच्युत पालव यांनी केलं आहे.

# भटवाडीतील पाणी प्रश्न सुरळीत करण्यासाठी बर्वेनगर शाळा क्रमांक ३ येथील काम पूर्ण



प्रतिनिधी
■ मुंबई

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आशीर्वादाने व विभागप्रमुख,आमदार दिलीपमामा लांडे" यांच्या मार्गदर्शनाने तसेच शिवसेना नगरसेविका "सौ. अश्विनीताई दिपकबाबा हांडे" यांच्या सहकार्यातून व "बृहन्मुंबई महानगरपालिका" यांच्या माध्यमातून घाटकोपर पश्चिम विभागातील मोदविनायक गणेश मंदिर, स्वयंभू भाटेश्वर महादेव मंदिर, आई महाकाली मंदिर व आजूबाजूचा सर्व परिसर या ठिकाणी पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीत व्हावा म्हणून बर्वेनगर शाळा क्रमांक ३ येथे काम पूर्ण करण्यात आले आहे. ह्या ठिकाणी शिवसेनेचे उपशाखाप्रमुख "चंद्रकांत कुंजीर" यांच्या देखरेखीखाली जबाबदारीने ते काम पूर्ण करून घेण्यात आले. विभागातील नागरिकांना पाणी पुरवठा करण्यासाठी शिवसेना माजी नगरसेविका अश्विनी ताई दिपक हांडे,माजी नगरसेवक दिपकबाबा हांडे, संतोष (बाबुशेठ) साळुंके माजी शाखाप्रमुख, मंगेश भोर (शाखाप्रमुख), सौ. नंदाताई गव्हाणे ( महिला शाखासंघटक),समाजसेविका सुरेखाताई म्हात्रे यांनी उपस्थित राहून सुरळीत कारण्यास मेहनत घेतली.

# पंडित दीनदयाल उपाध्याय मेळावा आणि मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना रोजगार मेळावा




प्रतिनिधी
■ जव्हार

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प जव्हार , व जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र पालघर आणि भगवान बिरसा मुंडा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था जव्हार यांच्या संयुक्त विद्यमानाने, जव्हार, मोखाडा, विक्रमगड आणि वाडा तालुक्यातील सुशिक्षित बेरोजगार युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी या दृष्टीने शुक्रवार दिनांक ३१/०१/ २०२५ रोजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था जव्हार येथे रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन करिष्मा नायर (भा. प्र.से.)प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय जव्हार, यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाची प्रस्तावना श्री. श्याम अंबाळकर यांनी केली.सदर मेळाव्यासाठी लोखंडे इंडस्ट्रीज, गोविंदास एच आर सर्विसेस, एम एस आर टी सी पालघर, ब्लू स्टार वाडा, ई पी एल लिमिटेड , आस्था हॉस्पिटल, नवनीत EDU, आयशर मोटर्स नाशिक, अण्णासाहेब पाटील महामंडळ पालघर, अलाईड प्लेसमेंट अँड एच आर सर्विसेस, ऑल इन वन प्लेसमेंट, सक्सेस जॉब प्लेसमेंट. अशा एकूण १२ आस्थापनांनी सहभाग घेतला. एकूण ३६५ उमेदवारांनी यात आपला सहभाग नोंदविला. त्यातून २१८ उमेदवारांना नोकरीची संधी प्राप्त झाली. श्रीमती करिष्मा नायर मॅडम यांनी मुलांना रोजगाराच्या आणि व्यक्तिमत्व विकास तसेच आजच्या युगातील आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि चॅट जी पी टी याचा आपण आपल्या जीवनामध्ये कशा तऱ्हेने उपयोग करू शकतो,याचे मार्गदर्शन केले. दीपक टिके सहाय्यक प्रकल्पाधिकारी यांनी सदर संधी चे सोने करावे असे गुरुमंत्र दिला.सदर मेळाव्यामध्ये . नरेंद्र शिरसाट कौशल्य विकास को-ऑर्डिनेटर यांनी इस्त्रायल येथे मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध असल्याबाबत माहिती दिली. तसेच संस्थेचे प्राचार्य अंबाळकर साहेब यांनी या रोजगार मेळाव्याचा जास्तीत जास्त उमेदवारांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले. रोजगाराभिमुख आणि महत्त्वकांक्षी या प्रकल्पात दहावी,बारावी, आयटीआय, पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण झालेले विविध उमेदवारांनी या रोजगार मेळाव्यात उपस्थित राहून संधीचा लाभ घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पडवळ सर आणि आभार प्रदर्शन संपदा मरगडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय जव्हार, औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभाग या सर्व संस्थेतील सर्व अधिकारी व कर्मचारी वृंद आणि प्रशिक्षणार्थी यांनी सहकार्य केले.

# विधानसभा निवडणुकीत पालिकेच्या उत्कृष्ट कामगिरीवर आधारित कॉफी टेबल बुक प्रकाशित



प्रतिनिधी
■ मुंबई

नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक- २०२४ अंतर्गत मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यात बृहन्मुंबई महानगरपालिकेने उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. या कामगिरीवर आधारित 'प्रवास अभिव्यक्तीचा, मागोवा निवडणुकीचा' या कॉफी टेबल बुकचे महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी यांच्या हस्ते महानगरपालिका मुख्यालयात बुधवारी प्रकाशन करण्यात आले.

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. (श्रीमती) अश्विनी जोशी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, विशेष कार्य अधिकारी (निवडणूक) श्री. विजय बालमवार यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर, केंद्रीय निवडणूक आयोगाद्वारे प्रथमच महानगरपालिका आयुक्त यांच्यावर मुंबई शहर आणि मुंबई उपनगर या दोन्ही जिल्ह्यांचे जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली होती. दोन्ही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेचे चारही अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त यांनी अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी या नात्याने धुरा सांभाळली. माननीय निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करत त्यामध्ये काही कल्पक उपक्रमांची भर घालून महानगरपालिकेने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ ची मतदान प्रक्रिया अधिक सुलभ व उत्साही केली. मतदान जनजागृतीसाठी वेगवेगळे उपक्रम राबवण्यासोबतच 'आपले मतदान केंद्र जाणून घ्या' या विशेष मोहीमेतून मतदान केंद्रांची माहिती मतदारांपर्यंत पोहोचवण्यात आली. ज्येष्ठ नागरिक, महिला, युवकांसोबतच तृतीयपंथी समुदायातील मतदारांचा सहभाग वाढविण्यासाठी विशेष अभियान राबविण्यात आले. मोठ्या गृहनिर्माण संस्थांमध्ये मतदान केंद्रांची स्थापना करण्यात आली. मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण करुन प्रत्येक मतदान केंद्रांवर निश्चित मतदारांसाठीच मतदानाची सोय करण्यात आली. प्रत्येक मतदान केंद्रांवर निश्चित किमान सुविधा जसे की, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, आसनव्यवस्था आदी पुरविण्यात आल्या. या सर्व बाबीचा इष्ट परिणाम दिसून आला आणि मतदानाची टक्केवारी वाढली.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक- २०२४ मध्ये विविध उपक्रम, अभियान तसेच कामकाजातून महानगरपालिका प्रशासनाने निवडणूक आयोजनासंदर्भात एक आदर्श निर्माण केला. निवडणूक प्रक्रिया, पूर्वतयारी, नागरी सोयीसुविधांची पूर्तता, प्रत्यक्ष मतदान आदी संपूर्ण प्रक्रियेची सचित्र मांडणी कॉफी टेबल बुकच्या माध्यमातून करण्यात आली आहे. मराठीमध्ये 'प्रवास अभिव्यक्तीचा, मागोवा निवडणुकीचा' या नावाने तर इंग्रजीमध्ये 'जर्नी ऑफ एक्सप्रेशन बियाँड द बॅलेट' या नावाने हे कॉफी टेबल बुक प्रकाशित करण्यात आले आहे. कॉफी टेबल बुकची संकल्पना महानगरपालिका आयुक्त तथा जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांची आहे. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. अश्विनी जोशी यांनी कॉफी टेबल बुकचे सादरीकरण तसेच निर्मितीविषयी मार्गदर्शन केले आहे. जनसंपर्क विभागाने या कॉफी टेबल बुकचे संपादन केले आहे.

# शेतकरी , मजुरांच्या प्रश्नाबाबत जव्हारमध्ये काँग्रेसचा मोर्चा व मेळावा

प्रतिनिधी
■ जव्हार

पालघर जिल्ह्यातील शेतकरी व शेतमजुरांच्या प्रश्नाबाबत आज काँग्रेस पक्षाच्या वतीने प्रांताधिकारी कार्यालयावर प्रचंड मोर्चाद्वारे निवेदन देऊन त्या प्रश्नांची सोडवणूक करून घेण्यात आली व यानंतर मेळाव्याद्वारे शेतकऱ्यांच्या व मजुरांच्या समस्या सोडवण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले

जव्हार तालुका अध्यक्ष संपत पवार यांच्या नेतृत्वाखाली जव्हार प्रांत यांना एक निवेदन देण्यात आले यावेळी किसान काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष पराग पष्टे आदिवासी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष बळवंत गावित पालघर जिल्ह्याचे वरिष्ठ उपाध्यक्ष मधुकर चौधरी यांनी प्रांत अधिकारी यांच्या उपस्थितीत विविध खात्यांच्या अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करून रोजगार हमी योजना जल जीवन मिशन कृषी खात्यातील योजना घरकुल योजनेची ड यादी सन दोन हजार सतरा अठरा मध्ये शेळी व म्हैस खरेदी अनुदाना बाबत शेतकऱ्यांची झालेली फसवणूक आदिवासी उपाय योजनेअंतर्गत कृषी विभागाकडून मिळणाऱ्या इंजिन पाईप व अन्य कृषी साहित्य या योजनेबाबत तसेच मोगरा व चाफा लागवड साठी रोजगार हमी योजनेतून मिळणारे अनुदान त्वरित मिळावे शेतकऱ्यांच्या सातबारा वर लागलेल्या सरकार ते नाव कडून शेतकऱ्यांच्या नावावर सातबारा करण्याबाबत चा प्रश्न आधी प्रश्नावर चर्चा करून हे प्रश्न सोडवण्याबाबत अधिकाऱ्यांना भाग पाडले

यावेळी किसान काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष पराग पष्टे यांनी जिल्ह्यामध्ये जलजीवन मिशन या योजनेअंतर्गत प्रचंड भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास आणून जिल्ह्यात अनेक ठिकाणी स्रोत नसताना विहिरी बांधल्याचे व शासनाच्या निधीचे अपव्यय केल्याचे निदर्शनास आणून दिले यावर जव्हार तालुक्यातील 30 योजनांमध्ये असे झाल्याचे अधिकाऱ्यांनी मान्य केले

त्यानंतर प्रांताधिकारी कार्यालय येथील सभागृहात झालेल्या मेळाव्यात शेकडो शेतकरी व शेतमजुरांना किसान काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष पराग पष्टे यांनी मार्गदर्शन करताना शासनाच्या अनेक योजनांची माहिती दिली व शासनाच्या ॲग्री स्टॅग या योजनेसाठी होणाऱ्या शिबिरात सर्व शेतकऱ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन केले तर बळवंत गावित यांनी जव्हार तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सातबारावर लागलेल्या सरकार हे नाव काढून शेतकऱ्याचे नाव लावण्यासाठी वैयक्तिक अर्ज करण्याबाबत आवाह न केले तर मधुकर चौधरी यांनी आपले मनोगत व्यक्त केले व तालुकाध्यक्ष संपत पवार यांनी आभार मानले

# सोयाबीन खरेदीला सहा दिवसाची मुदतवाढ - मंत्री जयकुमार रावल

**6 फेब्रुवारी 2025 पर्यंत खरेदी होणार**

प्रतिनिधी
■ मुंबई

राज्यात सोयाबीनची खरेदी वेगाने चालू असून 31 जानेवारी नंतर सोयाबीनची खरेदी पुढे काही दिवस चालू रहावी, अशी राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात मागणी होती. त्या अनुषंगाने सोयाबीन खरेदीसाठी आणखी काही दिवस मुदतवाढ मिळावी यासाठी केंद्र सरकारच्या कृषी मंत्रालयाला आम्ही प्रस्ताव पाठवला होता. तो प्रस्ताव केंद्रीय कृषिमंत्र्यांनी मान्य केला असून सोयाबीन खरेदीला 6 फेब्रुवारीपर्यंत मुदत वाढ दिली आहे, अशी माहिती राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

मंत्री रावल म्हणाले की, राज्यात 31 जानेवारीपर्यंत सोयाबीन खरेदीची मुदत देण्यात आली असल्याने आज ती मुदत संपली होती. सोयाबीन खरेदीची मुदत वाढावी अशी राज्यातील लोक प्रतिनिधी व शेतकऱ्यांची मागणी होती, ही मागणी लक्षात घेता यासाठी आमचा प्रत्यक्ष पाठपुरावा सुरू होता. आज ती मुदतवाढ मिळाली. या मुदतवाढीमुळे राज्याला दिलेल्या 14 लाख 13 हजार 269 मेट्रिक टन पी पी एस खरेदी उद्दिष्ट पूर्ण करता येणार असून सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

राज्यात नाफेड आणि एनसीसीएफच्या माध्यमातून 562 खरेदी केंद्रावर 30 जानेवारीपर्यंत 4 लाख 37 हजार 495 शेतकऱ्यांकडून 9 लाख 42 हजार 397 मेट्रिक टनापेक्षा अधिक सोयाबीनची खरेदी झाली आहे. दि.6 फेब्रुवारीपर्यंत या आकड्यात मोठी वाढ होऊन समाधानकारक खरेदी होणार आहे. अनेक जिल्ह्यांनी आपले उद्दिष्टे पूर्ण केले आहे.

काही जिल्ह्यांना उद्दिष्टे वाढवून दिली आहेत. शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन राज्य सरकारच्या मागणीनुसार केंद्र सरकारने 6 फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे मंत्री रावल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय कृषीमंत्री आणि केंद्र सरकारचे आभार मानले आहेत.

# 'पद्मश्री'ने मला अधिक कठोर मेहनत करण्याचे बळ दिले - पंडित मजुमदार

प्रतिनिधी
■ मुंबई

५४६ संगीतकारांच्या सिम्फनीचे नेतृत्त्व करत ऐतिहासिक ग्वाल्हेर किल्ल्यामध्ये इतिहास रचत गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद केल्यानंतर केवळ दोनच आठवड्यांमध्ये प्रख्यात बासरीवादक रोणू मजुमदार यांना देशातील तिसऱ्या क्रमांकाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार पद्मश्री जाहीर झाला आहे. हा प्रतिष्ठेचा पुरस्कार म्हणजे त्यांनी भारतीय शास्त्रीय संगीत क्षेत्रात आणि त्यातही बासरी वादनाच्या क्षेत्रात आयुष्यभर जे योगदान दिले आहे, त्याची पोचपावतीच आहे. महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील ११ जणांना भारत सरकारतर्फे त्यांच्या त्या त्या क्षेत्रातील योगदानासाठी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला पद्म पुरस्कारांनी गौरविण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.



पंडित रोणू मजुमदार त्यांपैकीच एक आहेत. हा प्रतीष्ठेचा पुरस्कार मिळाल्यावर पंडित रोणू मजुमदार यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या आहेत. "पद्मश्री मिळणे हा मी माझा सन्मान आणि आशीर्वाद मानतो. या सन्मानाचा खरोखरच नम्रतापूर्वक स्वीकार करतो. हा पुरस्कार मी माझे गुरु आणि वडील डॉ भानू मजुमदार यांना तसेच माझे इतर गुरु पंडित रवी शंकर आणि पंडित विजय राघव राव यांना अर्पण करतो. "या पुरस्काराने मला अधिक कठोर मेहनत करण्याचे बळ दिले आहे. हा पुरस्कार म्हणजे माझ्यासाठी टॉनिक असून त्यातून मला माझ्या सांगीतिक क्षेत्रात काम करण्यासाठी अधिक बळ मिळणार आहे." पद्म पुरस्कार पंडित रोणू मजुमदार यांना गिनीज वर्ल्ड रेकोर्ड मिळाल्याच्या अगदी काही दिवसांनीच मिळत आहे. पंडित रोणू मजूमदार यांची भारतीय शास्त्रीय संगीतातील सांगितीक कारकीर्द त्यांचे वडिल डॉ. भानू मजूमदार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झाली. नंतर दिवंगत पंडित लक्ष्मण प्रसाद जयपूरवाले आणि प्रख्यात पंडित विजय राघव राव यांच्या मार्गदर्शनाखाली फुलली. मैहर घराण्याशी असलेल्या त्यांच्या सखोल नात्यामुळे त्यांनी लहान वयातच बासरीत प्रावीण्य मिळवले आणि भारतीय शास्त्रीय संगीतामध्ये स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले.

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 223**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - २२३**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

## कांदिवली (पश्चिम) येथील 19 अनधिकृत दुकानांवर पालिकेचा हातोडा

**मुंबई :** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आर (दक्षिण) विभाग कार्यालयाच्या वतीने कांदिवली (पश्चिम) येथील १९ अनधिकृत दुकानांवर गुरुवारी निष्कासनाची कारवाई करण्यात आली. उप आयुक्त (परिमंडळ-७) डॉ. भाग्यश्री कापसे, सहायक आयुक्त (आर दक्षिण) मनीष साळवे यांच्या नेतृत्वात इमारत व कारखाने विभागाच्या वतीने कांदिवली रेल्वे स्थानक परिसरातील १९ अनधिकृत दुकानांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. या भागात एकूण २७ अनधिकृत दुकाने होती. मात्र, त्यापैकी ८ दुकानांवरील कारवाईला न्यायालयाकडून स्थगिती मिळाली आहे. उर्वरित १९ अनधिकृत दुकानांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान महानगरपालिकेचे अधिकारी-कर्मचारी यांच्यासह पुरेसा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



# मुंबईत नाल्यांतील गाळ काढण्यासाठी तब्बल 395 कोटींची निविदा!

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महापालिकेने शहर, पूर्व व पश्चिम उपनगरांतील नाल्यांतील गाळ काढण्यासाठी जवळपास ३९५ कोटी, तर मिठी नदीतील गाळ उपसण्यासाठी ९६ कोटींची निविदाप्रक्रिया सुरू केली आहे. या निविदांना प्रतिसाद मिळाल्यास फेब्रुवारीपर्यंत प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करुन मार्चपासून नालेसफाईला सुरूवात होण्याची शक्यता आहे.

दरवर्षी पावसाळ्यापूर्वी पर्जन्य जलवाहिन्या विभागाकडून मोठ्या नाल्यांची, तर विभाग कार्यालयांच्या स्तरावर लहान नाल्यांची सफाई केली जाते. पावसाळ्यापूर्वी ७५ टक्के, पावसाळ्यात १५ टक्के आणि पावसानंतर १० टक्के अशी तीन टप्प्यांत ही नालेसफाई केली जाते. मागील वर्षी गाळ उपसण्यासाठी पालिकेने ३१ कंत्राटदार नेमले होते. या कामासाठी पालिकेने २४९.२७ कोटी खर्च केले होते.

परंतु, मागील वर्षी अनेक ठिकाणी पाण्याचा निचरा न झाल्याने पाणी तुंबले होते. यंदा नाल्यांतील गाळ काढण्यासाठी जानेवारीच्या अखेरीस निविदा मागवल्या असून वेळीच प्रक्रिया पूर्ण झाल्यास पावसाळापूर्वी सफाईचे लक्ष्य गाठण्यात यश येईल, असा विश्वास पर्जन्य जलवाहिन्या विभागाने व्यक्त केला आहे.



### मिठी नदीसाठी ९६ कोटी रुपयांची तरतूद

१. सप्टेंबर २०२४ मध्ये मुसळधार पावसात मिठी नदीने सर्वाधिक ३.६० मीटर पातळी (४.२० अंतिम पातळी) गाठली होती.
२. त्यामुळे लगतच्या झोपडीधारकांना अन्यत्र स्थलांतरित करावे लागले. त्यामुळे मिठी नदीच्या पुरुज्जीवनाची आणि विकासाची चर्चा पुन्हा सुरु झाली.
३. यंदा मिठी नदीतील गाळ काढण्यासाठी ९६ कोटींची निविदा काढण्यात आली आहे. ही निविदा तीन टप्प्यांत काढण्यात येणार आहे. अशी माहिती पालिकेकडून देण्यात आली.

### ३०९ मोठे नाले

मुंबईत ३०९ मोठे, १ हजार ५०८ छोटे नाले, तसेच रस्त्यांच्या कडेला एक हजार ३८० गटारे आहेत. त्याचबरोबर ५ नद्यांमधून पावसाचे पाणी समुद्रात जाते.

# कुर्ला येथे भीषण आगीत भंगार दुकाने जळून खाक

प्रतिनिधी
■ मुंबई

कुर्ला (प.) भंगार मार्केट येथे शनिवारी सायंकाळच्या सुमारास लागलेल्या भीषण आगीत भंगार दुकाने जळून खाक झाल्याची घटना घडली आहे. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवित हानी झालेली नाही.

कुर्ला (पश्चिम), कुर्ला खाडी, इक्विनॉक्स बिल्डिंगजवळ, भंगार मार्केट येथे गजबजलेल्या ठिकाणी भंगार दुकानात अचानकपणे लागल्याची घटना शनिवारी सायंकाळी ४.०० वाजताच्या सुमारास घडली. या आगीत दुकानातील भंगार सामान मोठ्या प्रमाणात जळाले. ज्वालाग्राही वस्तूंमुळे ही आग काही अवधीत भडकली. या आगीची माहिती मिळताच अजुबजची रहिवाशी घरे, दुकाने तत्काळ रिकामी करण्यात आली.

या आगीत भंगार दुकाने जळून खाक झाली. मात्र आगीचा काळाकुट्ट धूर आणि आगीच्या ज्वाला या आकाशाच्या दिशेने झेप घेत होत्या. दूर अंतरावरून भंगार दुकाने जळत असल्याचे दिसून येत होते. आग लागल्याचे समजताच अनेकांनी घटनास्थळी एकच गर्दी केली. मात्र स्थानिक पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. लोकांची गर्दी बाजूला केली.

तोपर्यंत कोणीतरी अग्निशमन दलाच्या जवानांना आगीची वर्दी दिली. त्यामुळे अग्निशमन दलाचे पथक तत्काळ घटनास्थळी मदतीसाठी धावून आले. अग्निशमन दलाच्या जवानांनी तत्काळ आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी बचावकार्य युद्धपातळीवर हाती घेतले. मात्र भंगार सामानाला आग लागल्याने आग जास्तच भडकली. त्यामुळे अग्निशमन दलाच्या जवानांनी आग स्तर -२ ची असल्याचे सायंकाळी ४.४५ वाजता जाहीर केले.

अग्निशमन दलाच्या जवानांनी फायर इंजिन आणि वॉटर टँकर यांच्या साहाय्याने सदर आगीवर सायंकाळी उशिराने नियंत्रण मिळविले. त्यामुळे पुढील अनर्थ टळला. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवित हानी झाल्याचे वृत्त हाती आलेले नाही.



# सुशिक्षित बेरोजगार सोसायटी यांना सक्षम करणार -आमदार शेखर निकम

प्रतिनिधी
■ मुंबई

संपूर्ण राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांच्या सेवा सोसायट्यांचे गेली अनेक वर्ष प्रलंबित असलेले प्रश्न लवकरच मार्गी लाऊन त्याना अधिक सक्षम करून त्यांचे माध्यमातून राज्यातील बेरोजगारीचा प्रश्न मार्गी लावणार असल्याचे प्रतिपादन चिपळूण संगमेश्वरचे लोकप्रिय आमदार शेखर निकम यांनी केले. राज्य बेरोजगार व स्वयंरोजगार फेडरेशन तसेच बृहन्मुंबई व मुंबई फेडरेशन यांचे वतीने नुकताच त्यांचा मुंबईत नरिमन पॉइंट येथील साखर भवन येथे मुंबई जिल्हा बँकेचे ज्येष्ठ संचालक आणि बृहन्मुंबई बेरोजगार सेवा संस्थांचे मार्गदर्शक नंदकुमार काटकर यांचे हस्ते जाहीर सत्कार करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. आज सातत्याने सरकार दरबारी या बेरोजगार संस्थांचे प्रश्न ते मांडत आहेत. नुकतेच त्यांनी राज्यातील या सेवा सोसायट्याना विना निविदा १० लाख रुपयांची कामे सरकार कडून देण्याचे आदेश ही मंजूर करून घेतले असून येणाऱ्या अधिवेशनात ही

उर्वरित प्रश्नांबाबत आवाज उठविणार असल्याचे आश्वासन दिले आहे. सातत्याने सर्व खात्याच्या मंत्र्यांकडेही सदरच्या सेवा संस्थाना कामे उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा करत असल्याने राज्यातील सर्व फेडरेशन च्या वतीने त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील पंजीकृत स्वयंरोजगार बेरोजगार सेवा सहकारी संस्थांच्या प्रलंबित मागण्यांबाबत या बैठकीत चर्चा होऊन सेवा संस्थांचे प्रश्न तातडीने मार्गी लावण्याबाबत मंत्री महोदयानी संबंधित

या बैठकीस आमदार प्रसाद लाड, सचिव कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, सहकार आयुक्त, उपसचिव सार्वजनिक बांधकाम विभाग, सिकंदर पटेल लातूर, शरद देवरे नाशिक, जनार्दन चांदणे ठाणे, सचिन कोल्हापुरे रत्नागिरी, समीर रजपूत औरंगाबाद, जयंत शिरीषकर, संजय कांबळे, श्रीनिवास देवरूखकर, विजय केदारे, स्मिता अंजर्लेकर मुंबई, स्वप्नील फाटक तसेच राज्यांतील जिल्हा फेडरेशनचे अध्यक्ष व संचालक यावेळी बहुसंखेने उपस्थित होते.



# जोगेश्वरी पूर्व श्यामनगर ते पश्चिम द्रुतगती महामार्ग रस्ता रुंदीकरणाचे काम मार्चमध्ये होणार सुरु

### खा.रवींद्र वायकर यांच्या पाठपुराव्याला यश

■ मुंबई

मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्रांतील जोगेश्वरी विधानसभा क्षेत्राअंतर्गत येणाऱ्या जोगेश्वरी विक्रोळी लिंक रोड येथील श्यामनगर ते पश्चिम द्रुतगती महामार्ग पर्यंतच्या रस्ता रुंदीकरणाचे रखडलेले काम खासदार रविंद्र वायकर यांचे प्रयत्न व पाठपुराव्यामुळे मार्च मध्ये सुरु करण्यात येणार असल्याची माहिती मुंबई महापालिकेच्या के पूर्व विभागातील अधिकाऱ्यांनी दिली.

भविष्यातील जोगेश्वरी विक्रोळी लिंक रोडवरील होणारी वाहतुकीची होणारी कोंडी लक्षात घेऊन खासदार रविंद्र वायकर यांनी पालिकेच्या स्थायी समितीवर असताना त्यांनी जोगेश्वरी विक्रोळी लिंक रोडच्या रुंदीकरणाचे काम सुरु केले. हे काम श्यामनगर तलाव पर्यंत पूर्ण करण्यात आले. परंतु काही तांत्रिक अडचणीमुळे तसेच मेट्रोच्या कामामुळे श्यामनगर ते पश्चिम द्रुतगती महामार्ग या रस्ता रुंदीकरणाचे काम रखडले होते. खासदार रविंद्र वायकर यांनी हे काम सुरु करण्यासाठी मेट्रो व मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी यांच्या समवेत बैठकाही घेतल्या होत्या. या बैठकीमुळे येथील उर्वरित रस्ता रुंदीकरणाचे काम लवकरच सुरु होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. श्यामनगर ते पश्चिम द्रुतगती महामार्ग पर्यंतच्या रस्त्याची लांबी ८०० मीटर आहे. याठिकाणी दक्षिण भागात ५६ बांधकामे तर उत्तरेकडे ९६ बांधकामे बाधित होणार आहे. सुरुवातील दक्षिण भागातील रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम करण्यात येणार असून यासाठी ५६ बांधकामाना नोटीसा महानगर पालिकेमार्फत देण्यात येणार आहे.

# माजी खा. गोपाळ शेट्टी यांच्या वाढदिवसानिमित्त कांदिवलीत भाजप कार्यकर्ता परिषद संपन्न

### कार्यकर्त्यांचा सन्मान, अनेक पक्ष कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश



प्रतिनिधी
■ मुंबई

उत्तर मुंबईचे माजी खासदार गोपाळ शेट्टी यांच्या वाढ दिवसानिमित्त उत्तर मुंबई भारतीय जनता पक्षाने कांदिवलीतील रघुलीला मॉल येथील लोटस बँक्वेटमध्ये भव्य कार्यकर्ता परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेला उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल राम नाईक, उत्तर मुंबईचे माजी खासदार गोपाळ शेट्टी, केंद्रीय मंत्री आणि खासदार पियुष गोयल, मुंबई भाजप अध्यक्ष ॲड. आशिष शेलार, उप पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार प्रवीण दरेकर, दहिसरच्या आमदार मनीषा ताई चौधरी, चारकोपचे आमदार योगेश सागर, भाई गिरकर आणि विनोद शेलार यांच्यासह अनेक लोकप्रतिनिधी, जिल्हा, विभाग आणि प्रभागातील सर्व अधिकारी आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी गोपाळ शेट्टी यांनी आपले विचार व्यक्त केले आणि भाजपच्या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आणि कार्यकर्त्यांचे आभार मानले आणि पक्षाला बळकटी देण्यासाठी सर्वांनी एकजूट राहून समाज आणि नागरिकांच्या हितासाठी समर्पित भावनेने काम करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमादरम्यान, १००० हून अधिक लोकांना भाजपमध्ये प्रवेश मिळवून देणाऱ्या भाजप कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमादरम्यान, विविध राजकीय पक्षांमधील अधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने भाजपमध्ये सामील झाले.कार्यक्रमादरम्यान, ज्येष्ठ भाजप नेते आणि माजी केंद्रीय मंत्री स्व. वेदप्रकाश गोयल यांचे महान व्यक्तिमत्व आणि कार्ये माहितीपटाद्वारे दाखवून त्यांचे स्मरण करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन उत्तर मुंबई भाजप अध्यक्ष गणेश खणकर यांनी केले होते.

# उपनगरात पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी 309 कोटींची कंत्राटकामे

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई पूर्व उपनगर आणि पश्चिम उपनगर येथील जुन्या जलवाहिन्या बदलणे, दूषित पाणीपुरवठा रोखणे, अपुरा पाणीपुरवठा, पाणी गळती आदी पाण्याशी संबंधित अडचणी, समस्या दूर करून पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी महापालिका प्रशासनाने ३०९ कोटी रुपयांची विविध प्रकारची कामे करण्यासाठी कंत्राटदार नेमले आहेत.

मुलुंड, भांडूप, घाटकोपर, कुर्ला, वांद्रे, चेंबूर, मालाड, कांदिवली, बोरिवली, गोरेगाव आणि दहिसर आदी उपनगरीय विभागात पुढील दोन वर्षात म्हणजे २०२६ पर्यंत सदर कामे कंत्राटदारांनी पूर्ण करावयाची आहेत. सिमेंट रोड कामाच्या अंतर्गत वांद्रे पूर्व आणि पश्चिम विभाग आणि अंधेरी पूर्व या विभागात जलवाहिन्या स्थलांतरित करण्याचे सर्वात मोठे ७६ कोटी रुपयांचे कंत्राटकाम मे. बुकॉन इंजि. अँड इन्फ्रा. या कंत्राटदाराला देण्यात आले आहे.या कामामुळे पुढील दोन वर्षात सदर विभागातील पाणीपुरवठा सुरळीत होण्यास मदत होणार असून पाणी समस्येला तोंड देणाऱ्या या विभागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

मुंबईला अप्पर वैतरणा, मोडक सागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार आणि तुळशी या सात तलावांमधून दररोज ३,९५० दशलक्ष लिटर इतका पाणीपुरवठा करण्यात येतो. मात्र वाढती लोकसंख्या पाहता मुंबईला सध्या किमान ५ हजार दशलक्ष लिटर इतक्या पाण्याची गरज आहे. मात्र दररोज होणार पाणीपुरवठा हा अपुरा पडत आहे. त्यातही दररोज होणाऱ्या पाणी पुरवठ्यातील ३४ टक्के पाणी चोरी आणि गळती या पोटी पाणी वाया जाते. त्यामुळे अनेक ठिकाणी अपुरा पाणीपुरवठा, दूषित पाणीपुरवठा, पाणी गळती आदी विविध स्वरूपाच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येतात. वारंवार भेडसावणारी पाणी समस्या आणि तक्रारी पाहता जल अभियंता खात्याकडून कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात येत आहेत. त्याच अंतर्गत महापालिकेने उपनगरातील मुलुंड, भांडूप, घाटकोपर, कुर्ला, वांद्रे, चेंबूर, मालाड, कांदिवली, बोरिवली, गोरेगाव आणि दहिसर आदी विभागात पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी कंत्राटदारांची नेमणूक केली आहे.

### कोणत्या विभागात किती कामे, कंत्राट खर्च

| वार्ड | कामे | खर्च (कोटीत) |
|---|---|---|
| एच/पश्चिम | ५१० | १२.१० कोटी |
| एम/पूर्व | २०६३ | २०.७३ कोटी |
| एन | २०३४ | २३.९६ कोटी |
| एस | १८७६ | २२.४० कोटी |
| के/पश्चिम | ११७० | २१.३४ कोटी |
| आर/उत्तर | ९६४ | १०.२८ कोटी |
| पी/दक्षिण | १४३० | १५.२५ कोटी |
| टी | ३३९ | ५.६१ कोटी |
| एच / पूर्व | १६०७ | १७.७५ कोटी |
| पी/ उत्तर | १९५१ | १७.८५ कोटी |
| आर/दक्षिण | १६२० | १२.५८ कोटी |
| आर / मध्य | ११०४ | ९.२५ कोटी |
| के/पूर्व | १४५३ | १६.७६ कोटी |
| एल | २१९५ | २६.६८ कोटी |
| एच/ पूर्व, पश्चिम | १२२ | ७६.३५ कोटी |
| एकूण | | ३०९ कोटी |

# सर्व घटकांच्या अपेक्षा पूर्ण करणारा अर्थसंकल्प

### भाजप गटनेते आ. प्रविण दरेकर यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
■ मुंबई

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज शेतकरी, महिला, नोकरदार, मध्यमवर्गीय आणि उद्योग क्षेत्राला डोळ्यासमोर ठेवून सर्व घटकांना दिलासा देणारा असा अर्थसंकल्प सादर केला. हा अर्थसंकल्प सर्व घटकांच्या अपेक्षा पूर्ण करणारा असल्याचे प्रतिपादन भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी आयोजित पत्रकार परिषदेत केले आहे.

आ. दरेकर यांनी म्हटले कि, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विकसित भारताचे स्वप्न हे देशाला विकसित अर्थव्यवस्थांच्या गटात सामील करण्यासाठीचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट २०४७ पर्यंत साध्य करण्यासाठी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी पुढचे एक दमदार पाऊल टाकले आहे. सर्व घटकांच्या अपेक्षा पूर्ण करणारा हा अर्थसंकल्प आहे. शेतकऱ्यांसाठी धनधान्य योजना, किसान क्रेडीट कार्डची वाढवलेली मर्यादा, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (एमएसएमई), महिला सक्षमीकरण आणि महिला उद्योजकतेसाठी केलेल्या तरतुदी, मध्यमवर्गीयांना, चाकरमान्यांना आणि विशेषत: ज्येष्ठ नागरिकांना आयकरातून दिलेला दिलासा, श्रमजीवींची केलेली चिंता, राज्यांना पायाभूत सुविधांसाठी दिलेला मदतीचा हात, विमा क्षेत्रात १०० टक्के परदेशी गुंतवणुकीला दिलेली मान्यता, आंतरराष्ट्रीय व्यापाराला दिलेली चालना, कमी झालेली महसुली व राजकोषीय तूट, कर उत्पन्नात झालेली वाढ, राज्य हिश्श्यात केलेली भरघोस वाढ या व यासारख्या अनेक महत्त्वपूर्ण पावलांसाठी अर्थसंकल्पाचे स्वागत केले पाहिजे. या अर्थसंकल्पातून अर्थव्यवस्थेला चालना मिळून सर्व घटकांमध्ये विश्वासाचे आणि सकारात्मक वातावरण निर्माण होईल.

महिला, शेतकरी, श्रमजीवी, गरीब, नोकरदार वर्ग, युवा, मध्यमवर्गीय अशा सर्वच घटकांकडे विशेष लक्ष देत सर्वांना सामावून घेण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पातून झाला असल्याचेही दरेकर यांनी म्हटले आहे.



# लोककल्याण कार्यालय हा जनता आणि भाजपातील सेतू

### खासदार पीयूष गोयल यांचा विश्वास

प्रतिनिधी
■ मुंबई

जनता आणि कार्यकर्त्यांसाठी सुरू होत असलेले लोककल्याण कार्यालय हा जनता आणि भाजपामधील सेतू आहे आणि येथून जनतेची समस्यांमधून सुटका होईल, असा विश्वास उत्तर मुंबईचे खासदार पीयूष गोयल यांनी व्यक्त केला.ज्येष्ठ भाजपा नेते वेदप्रकाश गोयल यांच्या जन्मशताब्दीनिमित्त उत्तर मुंबईचे खासदार पीयूष गोयल यांच्या कांदिवली येथे नव्याने सुरू होत असलेल्या लोककल्याण या जनसंपर्क कार्यालयाचा उद्घाटन सोहळा शुक्रवारी पार पडला.


यावेळी पालकमंत्री ॲड. आशीष शेलार, सहपालक मंत्री मंगल प्रभात लोढा, ज्येष्ठ भाजप नेते राम नाईक, माजी खासदार गोपाळ शेट्टी, आमदार योगेश सागर, प्रविण दरेकर, अतुल भातखळकर, मनीषा चौधरी, विजयभाई गिरकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. भाजपा हा ज्येष्ठ आदरणीय नेते वेदप्रकाश गोयल यांच्यासारख्या प्रामाणिक नेत्यांचा पक्ष आहे. या नेत्यांनी तडजोडीचे राजकारण कधीच केले नाही. त्यांच्यापासून प्रेरणा घेत खासदार पीयूष गोयल यांच्या लोककल्याण कार्यालयातून जनतेच्या सेवेचा वसा सुरूच राहिल, अशी खात्री मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी व्यक्त दिली.उत्तर मुंबई ही उत्तम मुंबई घडवण्याचा संकल्प आम्ही केला आहे. लोककल्याण कार्यालयातून हा संकल्प आम्ही आणखी पुढे घेऊन जाणार आहोत. एकही व्यक्ती नोकरी आणि रोजगाराविना राहणार नाही आणि सर्वांना आहे त्याच ठिकाणी घर देताना वीज, पाणी तसेच स्वयंपाकाच्या गॅससह सर्व सुविधा पुरवू, असे आश्वासन खासदार पीयूष गोयल यांनी यावेळी दिले.



मध्य रेल्वे
जुन्या फिटिंग्ज आणि आयसोलेटर्स बदलणे
खुली ई-निविदा सूचना क्र.
केव्हायएन-एलडी-५८५-डब्ल्यू-७४६-कॉन्ट
**कामाचे नाव :** मध्य रेल्वेच्या मुंबई विभागामधील कल्याण जिल्ह्यातील वांगणी, तांबडमल, आणि इगतपुरी टिएसएस आणि वांगणी, आसनगाव, कसारा, कर्जत एलएसई येथील ११० केव्ही स्वीचयार्डस येथील जुन्या फिटिंग्ज आणि आयसोलेटर्स बदलणे. **अंदाजे मूल्य:** रु. ६१६२५९४०.९२ **इरठे:** रु. ४५८१००.०० **निविदा अर्जाचे शुल्क :** रु. ०.०० **पूर्तता कालावधी:** १२ महिने. **निविदेच्या सादरीकरणासाठी दिनांक आणि वेळ :** ०३.०३.२०२५ रोजी ११:०० वा. पर्यंत ई-निविदेचा पूर्ण तपशिल अधिकृत रेल्वे संकेतस्थळ http://www.ireps.gov.in वर उपलब्ध आहे. पूर्ण कागदपत्रे संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येतील. निविदेचा तपशिल वरी. डीईई (टीडी) केव्हायएन ह्यांचे कार्यालय, कल्याण ह्यांच्या सूचना फलकावर देखील उपलब्ध आहे.
वरी. डीईई (टीडी) केव्हायएन

आज सायं. BSF जोधपूर-राजस्थान
आयोजन सहकार्य
EKATA MANCH
प्रिं. अजय कौल
mukta
इव्हेंट्स ॲण्ड हॉस्पिटॅलिटी प्रा. लि. आयोजित
आयोजन सहकार्य
Swar Swar Entertainment
माधुरी नारकर
आयोजन सहकार्य
निमना फाऊंडेशन
नितीन मधुकर नांदगावकर
विशेष आभार : मा. महानिर्देशक – सीमा सुरक्षा बल, मुख्यालय, नवी दिल्ली
मा. महानिरिक्षक – सीमा सुरक्षा बल, सीमांत मुख्यालय, राजस्थान
सलामी
२०२५
एक नृत्य-संगीतमय सलामी सीमा सुरक्षा बलाकरिता
शनिवार १ ते बुधवार १२ फेब्रुवारी २०२५
नियोजन सहकार्य प्रशांत काशीद । डॉ. सुनील हळुरकर
संहिता संकल्पना । लेखन । दिग्दर्शन । नियोजन संतोष परब
राजस्थान फ्रंटीयर
२ फेब्रुवारी जोधपुर । ३ फेब्रुवारी पोखरण । ४ फेब्रुवारी जैसलमेर । ५ फेब्रुवारी रामगड
६ फेब्रुवारी ब्रह्मसर । ७ फेब्रुवारी बाबलीयानवाला । ८ फेब्रुवारी खाजुवाला
९ फेब्रुवारी सांचू । १० फेब्रुवारी बिकानेर
प्रमुख प्रायोजक LIC भारतीय जीवन बीमा निगम
सह प्रायोजक HAL-KO BSE सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया Central Bank of India NEW INDIA ASSURANCE NKGSB Bank Union Bank
माध्यम प्रायोजक वृत्तमानस THE PERFECT VOICE
समाजमाध्यम प्रायोजक mukta MY CULTURE यु-ट्यूब चॅनल संस्कृती फेसबुक ग्रुप

'वित्त' हे जणू राष्ट्राचं पोट आहे, तिथूनच इतर सर्व अवयवांना गती मिळते.



- डब्ल्यू. ई. ग्लॅडस्टोन
माजी ब्रिटिश पंतप्रधान

वृत्तमानस
मुंबई, रविवार, ०२ फेब्रुवारी २०२५




**०२-०२-२०२५ ते ०८-०२-२०२५ (रविवार ते शनिवार)**

**मेष - रागावर नियंत्रण ठेवावे लागेल.**
ग्रहप्रभाव पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.कामे करतांना संयम बराराहील.अडुन रहाण्यापेक्षा पर्यायीमार्ग शोधावा.या सर्व दिवसांत बोलतांना विचार करूनच बोलावे. कारण नसताना एखादी गोष्ट आंगलट येऊ शकते हे विस रु नये.इतरांच्या काही गोष्टी नाही पटल्या तरी त्या पटवून घ्याव्या लागतील.सध्या हो म्हणा व सोडून द्यायला सुरुवात करा.प्रतिक्रिया देत बसू नका.उगाचच अडून बसू नका. मनशांतिसाठी नियमीत उपासना केलेली चांगली राहील. व्यवसायात खरेदी विक्रीचे व्यवहार करताना भावनिक गोष्टी टाळा.नोकरदार वरिष्ठांच्या मर्जीने काम करावे.
**महिला -** वेळीच आर्थिक बचत करणे योग्य राहु शकल.उ गाच कुटुंबात राग करू नका.जोडीदाराचा आदर करावा. आध्यात्मिक गोष्टीत गुंतून राहा. मानसिक शांतता जपावी.
**विद्यार्थी -** आरोग्याची काळजी घ्यावी.
**शुभदिनांक -** ६,७,८.

**वृषभ - वैचारीक समतोल राखा.**
ग्रप्रभाव पहाता सप्ताहाचा पूर्वार्ध पोषक राहु शकेल.नियोजित कामे करतांना लाभाचे प्रमान वाढते राहु शकेल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना बोलतांना संयम ठेवावाच लागेल.महत्वाचे निर्णय घेतांना सर्व दिवस जपून पाऊल टाकावे लागेल.एक गोष्ट लक्षात ठेवावी.जबरदस्तीने कोणती गोष्ट करायला गेलात तर कदाचित त्याचा त्रास वाढु शकतो.धीर धरलेला बरा राहील. कोणी काय करावे करू नये सल्ला देऊनका.कोनत्याही व्यवहारात भावनिकता टाळलेली बरी. यशासाठी वेळीच आळस कमी करावा लागेल व्यावसायिकदृष्ट्या जरा पण यशस्वी धावपळ होऊ शकेल.नोकरदार वर्ग कामकाजात बदल होऊ शकतील.
**महिला -** वायफळ खर्च कमी करावे लागतील.मुलांसाठी वेळ द्यावा लागेल. कौटुंबिक मतभेद दूर ठेवावे लागतील. जोडीदाराच्या साह्याने निर्णय घ्यावे. विचारपूर्वक वागावे.
**विद्यार्थी -** योग साधनेला महत्त्व द्या.
**शुभदिनांक -** २,३,४.

**मिथुन - यशस्वी आठवडा जाऊ शकेल.**
ग्रहप्रभाव पहाता संपूर्ण सप्ताह लाभदायक जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना उत्तम यश मिळवु शकाल.गरज नसतांना उगाचच स्पष्ट बोलणे टाळलेले पोषक राहील.सध्या आपण म्हणाल ती पूर्वदिशा असणार आहे. तरिसुध्दा समोरच्याचे म्हनने ऐकून घ्यावे लागेल.कौटुंबिकस्तरावर समाधानात उत्तम वाढ होईल.चांगली स्थितीअसेल.सामाजिक कामे करतांना योग्य नियोजन घेतले जाईल.प्रतिष्ठेत चांगली वाढ होऊ शकेल. आत्मविश्वास अधीक वाढवल्यास अचानकलाभ मिळवुन देईल.उपासना फळेल.व्यवसायात उत्तम प्रगती होऊ शकेल.नोकरदार वर्गाला कामावर पूर्णपणे लक्ष केंद्रित करावे लागेल. यश मिळेल.
**महिला -** आर्थिकविवंचना सहजतेने दूर करु शकाल.समाजसेवेची आवड राहु शकेल.मुलांची प्रगती होऊ शकेल. उपस्थितिने घरगुती वातावरण आनंदी राहु शकेल.
**विद्यार्थी -** प्रकृती उत्तम असेल.
**शुभदिनांक -** ३,४,५.

**कर्क - समाधान मिळवु शकाल.**
ग्रहप्रभावपहाता सप्ताहाचा उत्तरार्ध चांगला जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना यशाचे स्तर वाढवु शकाल.निर्णय घेतांना गोंधळुन जाऊ नका. कौटुंबिकस्तरावर वावरतांना चांगला प्रतिसाद मिळु शकेल.कोर्टकचेरितिल कामांना चांगली गति मिळु शकेल.कदाचित मालकीहक्कही मिळु शकेल.सर्व कालावधी बर्यापैकी बरा राहील.या कालावधीमध्ये राहिलेली कामे होऊन जातील.तेव्हा त्वरेने कामे करण्याचा प्रयत्न करत चला."केल्याने होत आहे रेआधी केलेची पाहीजे."वैचारीक चंचलता वेळीच दूर करत चला. व्यवसाय अचूककेलेली गुंतवणूक फायद्याची ठरु शकेल. नोकरदार वर्ग वरिष्ठांची शाब्बासकी वेळीच मिळु शकेल.
**महिला -** शक्यतोविशेषआर्थिक चणचण भासणार नाही. घरामध्ये स्थावर मालमत्तेचा प्रश्न निकालात लागु शकेल. मालकी हक्क मिळेल.आरोग्याच्या तक्रारी दूर होतील,
**विद्यार्थी -** मनस्वास्थ्य लाभले.
**शुभदिनांक -**५,६,७.

**सिंह - मनमानी टाळावी लागेल.**
ग्रहसंकेत पहाताप्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना शांततेने व वेळेत पूर्ण करावे लागतील.सर्व दिवस संघर्षाचे असतील हे विसरु नये.कोणत्याही कामाची काळजी घ्यावी.बेफिकिरी चालणार नाही. कौटुंबिकस्तरावर वावरतांना कमी बोलणेच बरे राहील.जबाबदारिला झटकुन चालनार नाही.सामाजिक कामे करतांना "तोंडात साखर व डोक्यावर बर्फ" हे यशाचे सुत्र अंमलात आणा. रागावर अंकुश ठेवावा लागेल.उपासनेतुन सहनशिलता वाढवावी लागेल.मनमानी टाळलेली बरी.शात रहाने. व्यवसायात आलेले प्रस्ताव भंपक असु शकतील.नोकरदार वर्गाला घेतलेली जबाबदारी पार पाडावीच लागेल.
**महिला -** मनमानी करु चालणारनाही.काटकसर करतआर्थिक बचत करावी लागेल.नातेवाईकांच्या कार्यक्रमानिमित्त होनार्या भेटीगाठी कटाक्षाने टाळाव्या लागतील.
**विद्यार्थी -** आरोग्य सांभाळावे लागेल.
**शुभदिनांक-**६,७,८.

**कन्या - निरर्थक चिंता कमी करा.**
ग्रहसंकेत पहाता पूर्वार्ध सप्ताहाचा चांगला जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना अविश्वास कमी करावा लागेल. तरच उत्कर्षाचे वलय मजबुत होऊ शकेल.हे सर्व दिवस तसे बर्यापैकी बरे राहु शकतील.हा कालावधी धडाडीचा राहु शकेल.विश्वासाने प्रयत्न केल्यास चांगल्या कामासाठी जास्तवेळ लागणार नाही.धावपळ आता बर्यापैकी कामी येईल.थोडीशी कामातून उसंत घेता येऊ शकेल.निर्णय बरे होऊ शकतील.दडपन झटकुन टाकत चला.अचूक परिश्रमातुन यशाचे स्तर समाधानात परिवर्तित कराल. व्यवसायात चाललेल्या घडामोडींत जबाबदारीने पाऊल टाका.नोकरदार वर्गाचे कामकाज सुरळीत चालू राहील.
**महिला -** आर्थिक नियोजन मार्गी लागु शकेल.केलेले प्रयत्न यशात हळुवारपणे परिवर्तित होऊ शकतील.कदाचित राजकीय क्षेत्रात बर्यापैकी मानाचे स्थान मिळु शकेल.
**विद्यार्थी -** आरोग्य बरे राहील.
**शुभदिनांक-** २,३,४.

**तूळ - लाभदायक आठवडा जाईल.**
ग्रहसंकेत पहाता संपूर्ण सप्ताह लाभदायक जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना उत्तम सफलता मिळवु शकाल. रखडलेली महत्त्वाची कामे सहज होतील.सर्वच दिवसांचा कालावधी उत्तम राहील.अचानक धनलाभ होऊ शकतील.चांगला कालावधी म्हणजे चांगल्या गोष्टी घडतात असे म्हणायला हरकत नाही.असेच चांगले वातावरण चालत आलेआहे. कोणत्याही गोष्टीसाठी विशेष संघर्ष करावा लागणार नाही.महत्त्वाची कामेपूर्ण होतील.कौटुंबीकस्तरावर वावरतांना आनंदात उत्तम वाढ करु शकाल. व्यवसायअंतर्गत हाती घेतलेले सर्व कामे जिद्दिने तडीस नेऊ शकाल. नोकरदार वर्गाला वरिष्ठांचे सहकार्य उत्तम मिळु शकेल.
**महिला -** आर्थिक बाबतीत समाधानाची बाब राहु शकेल.कौटुंबिक वातावरण आनंदी राहु शकेल. मानसिक समाधान लाभु शकेल.मनसोक्त खरेदि करु शकाल.
**विद्यार्थी -** शारीरिकत्रास दूर होईल.
**शुभदिनांक-** ३,४,५.

**वृश्चिक - व्यवहारात सावधानता हवी.**
ग्रहसंकेतपहाता उत्तरार्ध सप्ताहाचा चांगला जाऊ शकेल. नियोजितकामे करतांना चिडचिड करु नका.दिवस जरासे ताणतणावाचे असतील. ताणतणाव घेऊन कोणतीही गोष्ट साध्य होणार नाही.हे विसरु नये.त्यातून पर्यायी मार्ग काढणे खूप गरजेचे राहील.एकघाव दोनतुकडे करून चालणार नाही.शांतमार्गाने गोष्टी हाताळाव्या लागतील.सकारात्मक विचार करायची तयारी ठेवावी लागेल.म्हणजे नुकसान होणार नाही.कौटुंबीकस्तरावर वावरतांना मनमानी करु नये.बोलतांना मधुरता बाळगत चला.उपासना वाढवा.व्यवसायात आवक-जावक बर्यापैकी बरा राहु शकेल.नोकरदार वर्ग कामातील तांत्रिक अडचणी दूर होऊ शकतील.
**महिला -** आर्थिक व्यवहार जपून केलेले बरे राहु शकेल.समाजमाध्यमांचा वापर जेवढ्यास तेवढा करत चला.जोडीदाराचीसाथ मिळु शकेल. सकारात्मक विचारांवर भर द्या.
**विद्यार्थी -** उत्साह वाढेल.
**शुभदिनांक -** ५,६,७.

**धनू - संयम उपयोगी पडु शकेल.**
ग्रहबळ पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना रागावर नियंत्रण ठेवणे बरे राहु शकेल.सप्ताहातील हे सर्व दिवस कसे संयमाने घालवता येतील ते पाहाणे उचीत ठरेल.काही गोष्टी तुमच्या मनाविरोधी घडू शकतात.रागाचा पारा अचानक चढू शकतो.नुकसानही होऊ शकते.एक गोष्ट लक्षात ठेवावे.आपण शांत राहणे खूप गरजेचेअसते. शांत राहिलात तर नुकसान होणार नाही.सहनशीलता वाढवा.नियमीत केलेली उपासना उपयुक्त ठरु शकेल.वादविवाद टाळने आवश्यक राहु शकेल.व्यवसायात नियोजन यशस्वी करण्यासाठी धावपळ होईल. नोकरदार स्विकारलेल्या कामात व्यस्त राहावे लागेल.
**महिला -** फालतु खर्च वेळीच कमी करावे लागतील.जोडीदाराचा सल्ला घ्यावा लागे.आध्यात्मिक गोष्टीत गुंतून राहावे लागेल.नियमीत उपासनेवर वेळिचभर द्यावा लागेल.
**विद्यार्थी -** शारीरिक स्वास्थ्य जपा.
**शुभदिनांक-** ६,७,८.

**मकर - विचारातील स्थिरता पोषक ठरेल.**
ग्रहबळ पहाता सप्ताहाचा पूर्वार्ध चांगला जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना बर्यापैकी सफलता मिळु शकेल.या सप्ताहात सर्व दिवसांचा कालावधी तसा बर्यापैकी बरा राहु शकेल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना असे वातावरण आले आहे.तेव्हा उगाचच वेळ घालवु नका.त्याचा पुरेपूर वापर करून घ्यावा.जेकाम करायचे आहे आणि ते पूर्ण होत नाही त्याचा श्रीगणेशा आता करायला हरकत नाही.सध्या तुमचे काम बर्या पैकी होणार आहे.नित्य उपासना पोषक होऊन मंगलकार्य सफल होईल. मनमानी टाळावी लागेल.
व्यवसायातून अपेक्षेपेक्षाही बरे प्रमाणात उत्पन्न मिळेल. नोकरदार वर्गाचीं कामे वेळेतच पूर्ण होऊ शकतील.
**महिला -** आर्थिक अडचण तितकिसी जाणवणार नाही. कदाचित राजकीय क्षेत्रात प्रतिष्ठा वाढु शकेल.नातेवाई कांशी जिव्हाळा वाढेल.मानसिक तणाव कमी होईल.
**विद्यार्थी -** आरोग्य मध्यम राहील.
**शुभदिनांक-**२,३,४.

**कुंभ - आनंदी आठवडा नेऊ शकाल.**
ग्रहबळ पहाता संपूर्ण सप्ताग लाभदायक जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना अनुकूल वातावरण असु शकेल.हा कालावधी उत्तम राहु शकेल. वरिष्ठांची चांगली मदत मिळु शकेल.कामाव्यतिरिक्त इतर गोष्टीत लक्ष घालायला वेळ मिळणार नाही.सर्व कामे साध्य होणारआहे.दुसऱ्याने केलेले मार्गदर्शन मोलाचे ठरणारआहे.कौटुंबिकस्तरावर वावरतांना आनंदीआनंद चोहिकडे असेअनुभव मिळु शकतील.सामाजीक कार्यातून प्रतिष्ठा अधीक वाढती राहील. कौटुंबीकस्तरावर वावरतांना समंजसपना उपयोगी पडेल व्यवसायात लाभाचे प्रमाण उत्तम राहु शकेल.नोकरदार वर्ग काम करताना कोणतीही तडजोड स्वीकारु नका.
**महिला -** दडपन जाणवणार नाही.आर्थिक सफलता मिळु शकेल.राजकीय क्षेत्रात महत्त्वाच्या गोष्टीवर चर्चा होईल. घरगुती वलयअनुकूल असेल. मानसिक समाधान लाभेल.
**विद्यार्थी -** प्रकृती ठणठणीत असेल.
**शुभदिनांक-**३,४,५.

**मीन - आळस कमी करावा लागेल.**
ग्रहबळ पहाता सप्ताहाचा उत्तरार्ध चांगला जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना समाधानात हळुहळु वाढ होऊ शकेल.या सर्व दिवसांत निर्णय घेताना विचार करुन घेणे बरे राहील.घाईने निर्णय घेऊ नका.ज्या गोष्टीतून मनस्ताप होणार आहे तिथे शांतराहणे सर्वात उत्तम राहील.स्वत:च्या कामाची जबाबदारी इतरांवर टाकू नका.चांगल्या गोष्टींसाठी उशीर झाला तरी चालेल.हे ब्रीदवाक्य ध्यानी ठेवावे लागेल.तसा हा कालावधीही बरा असेल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना प्रतिसाद मिळेल.उपासना करावी. व्यवसायातून बर्यापैकी मनासारखे उत्पन्न मिळु शकेल.नोकरदार वर्गकदाचित अधिकार प्राप्ती होऊ शकेल.
**महिला -** आर्थिकप्रश्न बर्यापैकी मिटु शकल.कुटुंबात असणारे मतभेद दूर होण्यासाठी प्रयत्न वाढवावे लागतील. नातेवाईकांच्या सुखदु:खात सहभागी व्हावे लागेल.
**विद्यार्थी -** प्रकृती जपत चला.
**शुभदिनांक-**५,६,७.

# प्रयागराज ते 'कुंभ'राज...



**प्रविण पुरो**

शहाणा होईल तो माणूस कसला, अशी बोली म्हण आहे. मरणासाठी तो कुठल्याही संकटाची तमा बाळगत नसतो. वाईच्या मांढरादेइवीच्या गडावर घसरून मृत्यूमुखी पडलेल्यांच्या संकटाची तमा जे बाळगत नाहीत, त्यांना काही सांगून डोकं चालवण्याचं कोणी करू नये. याने मरण आलंच तर आदळआपट करायची आणि गप्प बसायचं. प्रयागराज येथे भरलेल्या महाकुंभ मेळ्यात चेंगरून मृत्यूमुखी पडलेल्यांच्या प्रति असंच म्हणता येईल. सारासार विचार करणारा माणूस तिथे मरायला जाणार नाही. ज्याला श्रध्देचं ठिकाण मानलं जातं तिथेच अशा घटना घडतात. मात्र श्रध्दा म्हणून कोणी कोणाला वाचवायला येत नाही. पवित्र स्नान केल्याने पापं धुवून निघतात आणि मोक्ष मिळतो, असं मानायच्या ठिकाणी 30 जण मोक्षाला गेले. असा मोक्ष कोणी पाहिला नाही, की त्याने अनादी काळ कोणी जगलाही नाही. तेव्हा पाप धुवून निघणं आणि मोक्ष मिळणं या त्याहून पुढच्या गोष्टी. तरी लोकं तिथे जातात. अशी पवित्रता प्राप्त झाली असती तर सारं काही अलबेल असतं. पण जिथे अज्ञानच ओतप्रोत भरलंय तिथे पाप आणि मोक्षाच्या गोष्टी सांगून काही उपयोग नाही. यावर्षी प्रयागराजमध्ये सुरू असलेल्या महाकुंभ मेळ्यात 40 कोटी लोकं येणार असल्याचं जाहीर झाल्यापासून संकटाची चाहूल प्रशासनाला आली नाही, हेच अजब म्हटलं पाहिजे. ज्याला आता प्रयागराज असं संबोधलं जातं ते पूर्वीची अलाहाबाद. या अलाहाबादमध्ये 1954 च्या फेब्रुवारी महिन्यात असाच महाकुंभ मेळा भरला होता. तेव्हा हत्ती उधळला आणि चेंगराचेंगरीत 800 लोकांचा बळी गेला. आता हत्ती उधळण्याऐवजी लोकंच स्वत:ला उधळवतात. स्वत:च हकनाक मरणाच्या दारी जातात तरी त्यांना शहाणपण येत नाही. या घटनेनंतर अशा गर्दीच्या ठिकाणी कोणी जाऊ नये, असं आवाहन तत्कालीन सरकारने केलं होतं. या सरकारला तितकीही अक्कल नाही. आजवर असं आवाहन करणारे हे नेत्यांना मानणारे होते. नेत्यांकडे विवेक नावाची गोष्ट होती. देवाला भजून पोटं भरणार नाहीत, असे खडेबोल सुनावणाऱ्यांचे दिवस होते. आज पोट जळलं तरी चालेल मात्र भगवे नाचवलेच पाहिजेत, अशी शिकवण नेत्यांची आहे. या शिकवणीनेच महाकुंभचा हादसा घडला. 1986च्या कुंभमेळ्यात 50 लोकांचा मृत्यू झाला आणि 1992च्या हरिद्वार येथे झालेल्या सिंहस्थ कुंभमेळ्यात तितक्याच लोकांचा बळी गेला. 2003च्या नाशिकमध्ये भरलेल्या कुंभमेळ्यात नागांनी उडवलेली नाणी मिळवण्याच्या हव्यासाने गर्दीत 30 जणांचा बळी गेला होता. 2013च्या कुंभमेळ्यादरम्यान याच अलाहाबादच्या रेल्वेस्थानकावर झालेल्या चेंगराचेंगरीत 36 जणांना जीव गमवावा लागला होता. त्यात 29 महिलांचा समावेश होता. सुरू असलेल्या कुंभमेळ्यात काही दिवसांपूर्वी टेंटमधल्या गॅस सिलेंडरच्या स्फोटात अग्नीतांडव झालं. शेकडो टेंट आगीत भस्मसात झाले. सुदैवाने तिथे प्राणहानी झाली नाही. इतकं होऊनही माणसं विचार करायला तयार नाहीत, हे दुर्देवाहून अति झालं.

वाईट वाटतं ते माध्यमांचं. एखाद्या मुख्यमंत्र्यांची छबी झळकवण्यासाठी जिथे कोट्यवधींचा मलिदा रसद म्हणून वाटला जातो, त्या रसदीसाठी माध्यमं किती लाचार बनलीत याचं मूर्तीमंत उदाहरण प्रयागराजच्या दुर्देवी घटनेच्या वृत्तांकनात दिसून आलं. आम्ही लाचारीसाठी किती मुर्दाड झालोत हे माध्यमांनी विशेषत: वृत्तवाहिन्यांनी दाखवून दिलंय. कोणा विरोधकांच्या राज्यात वा विरोधी पक्षांबाबतीत असं काही घडलं असतं तर दिवसभर गोंधळ घातला गेला असता. आता सत्ताधाऱ्यांसाठी स्वत्व विकलेल्या वृत्तवाहिन्यांची लाचारी प्रयागराच्या घटनेत उघडपणे पहायला मिळाली. जणू काही घडलंच नाही, अशा तोऱ्यात माध्यमांचा वावर होता. कुंभमेळ्याचं रिपोर्टींग एकांगी होण्यासारख्या वृत्तांकनासाठी जिथे कोट्यवधी रुपये खर्ची घातले गेले तिथे माणसाच्या मरणाला किंमत येण्याचा प्रश्नच नाही. एका प्रथितयश वर्तमान पत्राच्या संपादकीयाने तर लाज कोळून प्यायल्याचं दाखवून दिलं. घटनेचं वृत्तांत देण्याऐवजी मेळ्यात सारं काही ठीक असल्याचं दाखवण्यासाठी वापर केलेला दिसला. मात्र दुर्घटनेच्या कारणांवर बोलण्याची हिंमत दाखवू शकला नाही. लाचार बनल्यावर संपादकीयमध्ये ब्र काढायची हिंमत कुठून येणार?

मौनी अमावस्येच्या मुहूर्तावर गंगेत डुबकी घेणाऱ्यांनी घाटाजवळ गाढ झोपलेल्यांना तुडवलं. त्यांच्यामागून येणारा रेटा एकमेकांवर रेटला. इतक्या गंभीर घटनेनंतर ज्यांना रुग्णालयात नेलं तिथे माध्यमांच्या प्रतिनिधींना बंदी करण्यात आली होती. एकाही बातमीचा लवलेश नव्हता. जागतिक स्तरावरील वृत्त असतानाही माध्यकांकडे बातमी नसणं हे कदापि शक्य नाही. पण दुसरीकडे केंद्रिय प्रसारमाध्यम अमृतस्नानाचं वृत्तांत देण्यात मग्न होतं. यावरून माध्यमांची झालेली अवस्था लक्षात येते. माणसाच्या मरणाला आपल्या माध्यमांप्रति असलेली किंमत या सगळ्या प्रकरणातून लक्षात येईल.

सुमारे 90 हजार कोटींच्या निधीचा चुराडा करणाऱ्या या मेळ्यात श्रध्दाळूंचा असा मृत्यू होणं हे प्रशासनाचं पूरतं अपयश होय. वाढतं व्हीआयपी कल्चर अशा असंख्य घटनांचं कारण ठरतं. याहीवेळी हेच कारण पुढे आलंय. पवित्र स्नानाचं निमित्त करत व्हीआयपी अशा ठिकाणी येतात यामुळे अपेक्षित क्षणाच्या वेळी लोकांना स्नान करता येणार नाही, अशा भीतीने रेटारेटी झाली आणि त्याचे परिणाम व्हायचे ते झाले. यापूर्वी कुंभमेळ्याला येणाऱ्यांना कोणतीही सुरक्षा दिली जाणार नाही, अशी सक्त ताकीद दिली जायची. आता सारेच भगवेधारी असल्याने आणि त्यांचा म्होरक्याच भगव्यात वेढला गेल्याने तत्कालीन सरकारच्या सूचनांचा अंमल करण्याचा विचार येणंच अशक्य. उलट अशा मेळ्यांचं श्रेय लाटण्याची अहमहिका लागली आहे. योगी मंत्रिमंडळातील मंत्री संधी मिळेल तेव्हा आणि तिथे लावाजमा घेऊन जात आपली छबी काढतात. स्वत: मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मेळ्याला 12 वेळा भेटी दिल्या. आदित्यनाथ यांच्या सरकाच्या विविध योजना हा देशातील सर्वच माध्यमांचा चर्चेचा विषय असतो. योगींना देशाचं पंतप्रधान व्हायचं असल्याने ब्रॅण्डिंने त्यांना वेडं बनवलं आहे. सुविधांहून ब्रॅण्डिंगच्या बोलबाल्याने देशभर ढोल पिटले जात आहेत. मार्केटिंगवर केलेला खर्च सुविधांवर केला असता तर अशी घटना घडली नसती, हे तिथे पोहोचलेल्यांचं म्हणण अगदीच गैर नाही. या व्यासपीठाचा वापर हा आपल्याला दिल्लीपर्यंत जायला पुरेसा आहे, हे लक्षात घेऊन स्वत:च्या छबीला चमकवण्याचे उद्योग या माध्यमातून सुरू आहेत. हिंदूंच्या अस्मितेचा गैरफायदा घेणं, या एका हेतूने सारं सुरू आहे. यासाठी कोट्यवधी रुपयांची उधळण सुरू आहे. युनोस्कोने ज्याचा सांस्कृतिक वासशाचं प्रतिबिंब म्हणून उल्लेख केला, त्या महाकुंभमेळ्यात धार्मिक द्वेषाला चालना देत मुस्लिम समुदायावर बहिष्कार घातला गेला. हा बहिष्कार माध्यमांना दिसला नाही की त्यावर न्यायाने लिहावं असंही त्यांना वाटत नसेल तर माध्यमांकडून अपेक्षा ठेवण्यात अर्थ नाही. जिथे गंगेत तरणारे आणि कुत्र्याचे शिकार बनलेले कोरोनातील दुर्लक्षिलेले मृत्यूमुखी पचणार असतील तर महाकुंभमध्ये 30 मेले म्हणून झालं काय, ही मानसिकता देशाला खूप घातक आहे, याची किमान जाण माध्यमांना असायला हवी...

*(लेखक ज्येष्ठ पत्रकार - राजकिय विश्लेषक आहेत.)*

# वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकाला विरोध नको !

वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक आता जवळपास अंतिम टप्प्यात आले आहे. याबाबत निर्णय घेण्यासाठी मध्यंतरी सत्ताधारी आणि विरोधक यांच्याकडून सुधारणा मागवण्यात आल्या होत्या. आलेल्या सुधारणांवर संयुक्त संसदीय समितीने सारासार विचार करून सत्ताधारी पक्षाने सुचवलेल्या सुधारणांपैकी १४ सुधारणा मान्य केल्या आहेत, तर विरोधकांनी केलेल्या ४४ सुधारणा फेटाळल्या आहेत यावरून सध्या राजकीय वातावरण तापले आहे. देशातील कोणत्याही भूमीवर मालकी हक्क सांगून ती ताब्यात घेण्याचा अधिकार बहाल करणारा वक्फ बोर्ड कायदा भारतात असल्याचे अनेकांना ज्ञातही नसावे. या वक्फ बोर्ड कायद्याचे नियमन करणारी वक्फ बोर्ड ही संस्था केवळ मुसलमानांचीच नव्हे, तर हिंदूंच्या परंपरागत जमिनीवरही आपला अधिकार सांगू शकते. हिंदूंच्या एखाद्या भूमीवर वक्फ बोर्डाने एकदा दावा केला की त्याविषयी न्याय मागण्यासाठी तुम्हाला पोलिसांत तक्रार नोंदवता येणार नाही किंवा कोणत्याही न्यायालयात दाद मागता येणार नाही. दाद मागायचीच असेल तर त्यासाठी वक्फ न्यायाधिकरणाकडे जावे लागते. वक्फ बोर्डाने दावा सांगितलेली भूमी तुमची कशी हे तुम्हाला स्वतःहून या ठिकाणी सिद्ध करायचे असते. ज्याठिकाणी न्याय देणारी सर्व यंत्रणा ही वक्फ बोर्डाचीच असते. अशा ठिकाणी एखाद्या हिंदूला कधीतरी न्याय मिळू शकतो का ? वक्फ बोर्ड किंवा वक्फ कायदा आज पाकिस्तानसह कोणत्याही मुस्लिम राष्ट्रात नाही. असा कायदा बहुसंख्य हिंदू असलेल्या हिंदुस्थानात आहे याचे कोणालाही नक्कीच आश्चर्य वाटेल. या वक्फ बोर्डाची स्थापना १९५४ साली केंद्र सरकारनेच केली असून आज देशभरात असे ३० हुन अधिक वक्फ बोर्ड आहेत. १९९५ च्या वक्फ कायद्याच्या कलम तीनमध्ये असे लिहिले आहे की वक्फला कोणतीही जमीन आपली आहे, असे वाटत असले तरी ती त्याची मालमत्ता असेल. वक्फ बोर्डाला हे सिद्ध करण्याचीही गरज नाही. वक्फ बोर्डाने एखाद्या व्यक्तीच्या जमिनीवर हक्क सांगितला आणि ही जमीन वक्फची असल्याचे सांगितले तर ती चुकीची सिद्ध करण्याची जबाबदारी वर उल्लेख केल्यानुसार त्या जमिनीच्या मालकाची असेल. जर न्यायाधिकरणाने मालकाची आवृत्ती स्वीकारली नाही, तर न्यायालयही हा निर्णय बदलू शकत नाही. एखादी जमीन एकदा वक्फची झाली कि ती कायमस्वरूपी वक्फचीच होऊन जाते. त्या जमिनीवरील स्थावर जंगम मालमत्ताही वक्फच्या अधिकारात येते. वक्फ हा अरबी शब्द आहे ज्याचा अर्थ राहणे असा असून देवाच्या नावाने अर्पण केलेली वस्तू असाही त्याचा एक अर्थ सांगितला जातो. वक्फ म्हणजेच कोणत्याही मुस्लिमाने धार्मिक कार्यासाठी दान केलेली मालमत्ता. १९९५ साली देशात पी.व्ही. नरसिंहराव सरकार असताना सरकारने १९५४ च्या वक्फ कायद्यात सुधारणा करून वक्फ बोर्डाला अमर्याद अधिकार बहाल केले. ज्यामुळे दानधर्म राहिला बाजूला भारतातील वक्फ बोर्ड हिंदूंच्याच भूमीवर अधिकार सांगून ती भूमी ताब्यात घेऊ लागला आहे. वक्फ कायदा १९९५ चे कलम ४० म्हणते की, एखादी जमीन कोणाची आहे, हे 'वक्फ बोर्ड' ठरवेल. वक्फला जर एखादी जमीन आपल्या आपल्या मालकीची वाटल्यास, ती जमिन वक्फ बोर्डाची होईल. तामिळनाडू राज्यातील त्रिची जिल्ह्यात तिरुचेंथुराई नावाचे एक गाव आहे. या गावातील ९५ टक्के लोक हे हिंदू आहेत, याच गावात १५०० वर्षं जूने एक मंदिरदेखील आहे. एक दिवस वक्फ बोर्डाने या संपूर्ण गावालाच आपली मालमत्ता म्हणून घोषित केले. इस्लामचा जन्म होण्याआधी बांधलेले मंदिर देखील आपल्या भूमीवर बांधल्याचा दावा वक्फ बोर्डाने केला. देशभरात अशी अनेक उदाहरणे आहेत ज्यामध्ये वक्फ बोर्डाने मोठमोठ्या भूभागांवर आपला दावा सांगत तो भूभाग ताब्यात घेतला आहे. देशातील सर्व वक्फ बोर्डाकडे मिळून आज एकूण ८ लाख, ५४ हजार, ५०९ एकर एव्हढी भूमी आहेत. देशातील एकूण भूमीचा विचार केल्यास सर्वाधिक भूमी आज लष्कराच्या ताब्यात आहे तर दुसऱ्या क्रमांकाला सर्वाधिक भूमी रेल्वे खात्याकडे आहे ही दोन्ही खाती केंद्र सरकारच्या अखत्यारीतील आहेत आणि तिसऱ्या क्रमांकाची सर्वाधिक भूमी ही आज गैर सरकारी वक्फ बोर्डाकडे आहे यावरून देशातील वक्फ बोर्डाचा व्याप भारतात किती मोठ्या प्रमाणात पसरला आहे हे आपल्या लक्षात येईल. तत्कालीन सरकारने एकगठ्ठा मताच्या लाचारीसाठी वक्फ बोर्डाला दिलेल्या अमर्यादित अधिकारांमुळे आजमितीला देशभरातील लक्षावधी एकर जमीन वकफ बोर्डाने आपल्या ताब्यात घेतली आहे. सामान्य जनतेच्या न्यायहक्कासाठी संविधानाने दिलेले कायदेसुद्धा वकफ बोर्डापुढे हतबल असल्याने जनतेची परंपरागत भूमी वकफ बोर्डाच्या घशात घालणे हा नागरिकांवरील अन्यायच आहे. या अन्यायातून नागरिकांना दिलासा देण्यासाठी वकफ बोर्ड कायद्यात सुधारणा होणे अनिवार्य असून त्यासाठी देशातील समस्त हिंदूंनी एकत्र यायला हवे. असे असताना काही हिंदु राजकीय नेतेच एका समाजाला खुश करण्यासाठी या सुधारणा विधेयकाच्या विरोधात उभे ठाकल्याचे चित्र सध्या दिसत आहे. देशातील बहुसंख्य हिंदु समाज हळूहळू जागृत होऊ लागला आहे. आपल्या न्याय हक्कासाठी व्यक्त होऊ लागला आहे. अशावेळी एका गटाच्या संतुष्टीसाठी प्रवाहाच्या विरोधात भूमिका मांडणे राजकीय मंडळींना हानिकारक ठरू शकते. केवळ राजकीय विरोधासाठी विरोध केला जात असेल तर अशांना जनता निवडणुकातून धडा शिकवल्यावाचून राहणार नाही.

- जगन घाणेकर, मुंबई

## एपीएमसीत यंदाच्या हंगामातील जादा आवक, कोकणातील 175 पेट्या दाखल

**नवी मुंबई :** वाशीच्या एपीएमसी बाजारात शनिवारी कोकणातील हापूस आंब्याच्या तब्बल १७५ पेट्या विक्रीसाठी दाखल झाल्या आहेत . गेल्या काही दिवसांपासून बाजारात तुरळक पेट्या दाखल होत होत्या. परंतु आज शनिवारी यंदाच्या हंगामातील हापूसची अधिक आवक झाली आहे. बाजारात आंब्याची ही आतापर्यंतची चांगली आवक आहे . यावर्षी हापुसचे उत्पादन चांगले असेल, मात्र हंगामाला उशिराने सुरुवात होईल असे मत हापूस बागायतदार यांच्याकडून व्यक्त करण्यात येत आहे. दरवर्षी हापूस आंब्याचा खरा हंगाम मार्च महिन्यात सुरू होतो. यंदा हवामान बदल, कडाक्याची थंडी यामुळे सुरुवातीचा मोहोरला फाळधारणा झाली नाही तर काही मोहोर गळून पडला. थ्रीप्स रोगाच्या प्रादुर्भावाचा ही फटका बसला त्यामुळे, औषधीफवारणी खर्च वाढला. त्यामुळे बाजारात सध्या फेब्रुवारी महिना उजडला तरी हापूसची आवक कमी होत आहे. त्यामुळे खवय्यांना हापूसची चव चाखण्यासाठी १५ मार्चपर्यंत वाट पहावी लागणार आहे.



### म ह त्वा चे

## व्याजाचे पैसे देऊनही अधिक पैसे उकळल्यामुळे केली आत्महत्या

**ठाणे :** व्याजासह पैसे दिले तरीही आरोपी आणखीन पैसे उकळत असल्यामुळे एकाने विष प्राशन करून आत्महत्या केली आहे. अमिन शेख असे मृत व्यक्तीचे नाव आहे. अमीन शेख यानं तीन जणांकडून १ लाख ८० हजार रूपये घेतले होते. त्यानं ३ लाख ३० हजार रूपये व्याजासह परत केले. मात्र, जास्त पैसे उकळण्यासाठी त्याला त्रास देण्यात येत होता. त्यामुळे अमिन शेख याने विष पिऊन आत्महत्या केली आहे. ही धक्कादायक घटना भिवंडी तालुक्यातील महापोली येथे घडली आहे. अमिन शेख याने ३ जणांकडून १ लाख हजार रूपये घेतले होते. व्याजासकट त्याने ३ लाख ३० रूपये परत केले. मात्र, तरीही ३ जणांकडून जास्त व्याजासाठी तगादा लावण्यात येत होता. आणखीन पैसे उकळण्यासाठी ३ जण अमिन यांना त्रास देत होते. याच त्रासाला कंटाळून अमिन याने विष प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. विष प्राशन करण्यापूर्वी अमिन यानं व्हिडिओ तयार केला. नंतर व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल केला आणि विष प्राशन करून आत्महत्या केली. व्हिडिओच्या आधारे अमिनच्या भावाने गणेशपुरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. मात्र, १ महिन्यानंतर पोलिसांनी तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एकाला अटक करण्यात आली असून, २ जण अद्याप फरार आहेत.

## हेरंब मंदिरात ड्रेसकोड लागू

**अंबरनाथ :** अंबरनाथच्या हेरंब मंदिराने मंदिरात येणाऱ्या भाविकांसाठी ड्रेस कोड लागू करण्यात आलाय. मंदिरात येताना सद्गुणी पोशाखात यावं, फाटक्या जीन्स, स्कर्ट आणि असाभ्य कपडे घालून मंदिरात येऊ नये, असं आवाहन मंदिर समितीने भाविकांना केलं आहे. याबाबतचा फलक मंदिराबाहेर दर्शनी भागात लावण्यात आलाय. काही दिवसांपूर्वीच मुंबईतील सिद्धिविनायक मंदिराने भाविकांसाठी ड्रेस कोड लागू केला होता. याच पार्श्वभूमीवर अंबरनाथच्या हेरंब मंदिराने सुद्धा रेस कोड लागू करण्याचा निर्णय घेतलाय.आपण लग्न समारंभाला किंवा पार्टीला जाताना ड्रेस कोड फॉलो करतो, मग मंदिरात येताना सभ्य कपडे आपण का घालू शकत नाही? असा सवाल हेरंब सेवा समितीचे अध्यक्ष अभय सोमण यांनी केलाय. भाविकांना अनेकदा तोंडी सूचना देऊन झाल्या. मात्र तरीही सुधारणा होत नसल्याने अखेर मंदिराच्या बाहेर दर्शनी भागात ड्रेस कोड बाबतच्या सूचनांचा फलक लावण्याची वेळ आमच्यावर आल्याचं सोमण यांनी सांगितलं.


# कौटुंबिक कलह सामंजस्याने मिटविण्यासाठी 'सुकून'

### नवी मुंबई जिल्हा न्यायालयात सुकून प्रकल्पाचे उद्धाटन

प्रतिनिधी

■ नवी मुंबई

नवी मुंबई जिल्हा न्यायालयात सुकून प्रकल्पाचे उद्धाटन आज करण्यात आले. या सुकून प्रकल्पामुळे कायद्याच्या कक्षेत राहून कौटुंबिक खटले दोन्ही पक्षांच्या सामंजस्याने मिटवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. विशेष म्हणजे हि सेवा पूर्ण मोफत आहे. या प्रकल्प उद्धाटन प्रसंगी न्यायाधीश रचना तेहरा आणि प्रकल्प प्रमुख डॉ. अपर्णा जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.




अनेकदा क्षुल्लक वाद, समोरच्या व्यक्तीला नामोहरम करण्याची जिद्द, अपमानाचा बदला, अशा अनेक कारणांनी न्यायालयात धाव घेतली जाते. यात सर्वाधिक पती पत्नीतील वादाचा समावेश होतो. हे कौटुंबिक वाद न्यायालयात येण्यापूर्वी आप आपसातच मिटावे व वादाचे रूपांतर संवादात व्हावे यासाठी कौटुंबिक न्यायालय बेलापूर याठिकाणी सुकून प्रकल्प सेंटरचे उद्धाटन करण्यात आले. कौटुंबिक वाद अनेकदा "इगो" भोवती फिरणारे असतात. त्यामुळे दोन्ही पक्षांचे ऐकून घेणे त्यांचे मन मोकळे होऊ देणे, न्यायालयीन लढाईत होणारे परिमाम आदींची माहिती देत सामंजस्याने वाद मिटविण्याचे प्रयत्न या द्वारे केले जाणार आहेत. यासाठी केवळ वकीलच नव्हे तर डॉक्टर, मनसोपचार तज्ञ् यांचा समावेश असणार आहे. सध्या न्यायालयात नवी मुंबईतील एक हजार ८९७ केसेस असून हा वाद या सेंटर च्या माध्यमातून सुटावा हा आमचा उद्देश असल्याचे सेंटर च्या प्रमुख डॉ. अपर्णा जोशी यांनी सांगितलं.

खटला न्यायालयात दाखल झाल्यावर प्रत्यक्ष बोर्डावर येण्यापूर्वी आणि आल्यावरही सुकून द्वारे वाद मिटविण्याचे दरवाजे खुले असणार आहेत. कौटुंबिक वाद अनेकदा विकोपाला पोहचल्यावर त्याला उत्तर न सापडल्याने न्यायालयात येतात. या वादाचा परिमाण केवळ जोडप्यावर होत नसतो तर दोन्ही कुटुंब मुले भरडले जातात. त्याला सुकून प्रकल्प उत्तम पर्याय आहे. मन मोकळे होईल एवढे बोलू शकता कितीही वेळ घेऊ शकतात. त्याला कुठे तरी समाधान मिळावे हाच या प्रकल्पाचा उद्देश्य आहे. अशी माहिती न्यायमूर्ती श्रीमती रेवती मोहिते – डेरे यांनी दिली.या उद्धाटन प्रसंगी जिल्हा न्यायाधीश एम आर मांडवडीकर बार कौन्सिल अध्यक्ष ऍड. सुनील मोकल, तसेच बार काउन्सिलचे अनेक सदस्य यावेळी उपस्थित होते.

# प्रियदर्शनी शाळेतील महिला आणि पुरुष शिक्षिकेची फ्रीस्टाईल हाणामारी

### शिक्षिकेकडे शरीरसुखाची मागणी केल्याने शिक्षकाच्या बसली कानशीलात

प्रतिनिधी

■ अंबरनाथ

अंबरनाथमध्ये महिला आणि पुरुष शिक्षकांची शाळेबाहेरच फ्री स्टाइल हाणामारी झाल्याची घटना घडली आहे. शिक्षकाने शरीरसुखाची मागणी केल्याने त्याला मारहाण केल्याचा शिक्षिकेचा दावा आहे. याप्रकरणी अंबरनाथ पश्चिम पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अंबरनाथ पश्चिम येथील जावसई फुलेनगर भागात प्रियदर्शिनी हिंदी शाळा आहे. या शाळेत अनिता गुप्ता या २९ वर्षापासून शिक्षिकेचे काम करतात. २९ जानेवारीला अनिता यांनी त्यांच्या वर्गातील





मुलांना पीटीच्या तासासाठी बाहेर खेळण्यासाठी सोडले असताना शिक्षक एकादशी राम यांनी या मुलांचा व्हिडीओ काढला. नंतर शाळा सुटल्यावर अनिता या शाळेबाहेर पालकांशी बोलत असताना एकादशी हे गाडीवरून तिथे आले आणि त्यांनी आपल्याला बोलावत आपल्याकडे थेट शरीरसुखाची मागणी केली, असा आरोप अनिता यांनी केला.

यावरूनच अनिता यांनी एकादशी यांच्या कानशिलात लगावली. यानंतर दोन्ही शिक्षकांमध्ये शाळेबाहेरच हाणामारी झाली. याआधी मुख्याध्यापकांनी अनिता यांच्या चारित्र्यावर संशय व्यक्त केला. तसेच शाळा सोडण्यासाठी मोठ्या प्रमाणात दबाव टाकला जात असल्याचा आरोपही अनिता गुप्ता यांनी केला.

# प्रेम संबंधातून 22 वर्षीय तरुणीची हत्या

### आरोपीने स्वत:वर देखील केले वार

■ पनवेल

प्रेम संबंधातून २२ वर्षीय तरुणीची हत्या केल्याचा प्रकार नवीन पनवेल, सेक्टर 18 येथे उघडकीस आला. त्यानंतर आरोपीने स्वतःवर देखील वार केले. याप्रकरणी खांदेश्वर पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला. आरोपीवर एमजीएम हॉस्पिटल, कामोठे येथे उपचार सुरू आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, यातील हत्या झालेल्या तरुणीचे नाव जागृती हरेश सत्वे (राहणार ज्योती अपा. सेक्टर 18, नवीन पनवेल) असे असून आरोपी निकेश भगवान शिंदे



(राहणार दिवेगाव, ठाणे, वय २५) याच्यासोबत तिचे प्रेम संबंध होते. तीन महिन्यांपूर्वी त्यांचे ब्रेकअप झाले आणि जागृतीचे दुसऱ्या मुलासोबत प्रेम संबंध असल्याच्या संशयावरून निकेश शिंदे हा ३१ जानेवारीला तिच्या घरी गेला आणि दुसऱ्यासोबत संबंध ठेवू नकोस असे बोलून तिच्याशी वादविवाद करून शिवीगाळ आणि हाताने मारहाण केली. यावेळी तिच्या घरी आई आणि तिची बहीण देखील होती.

संध्याकाळी पावणे सहा ते साडेसहाच्या दरम्यान आरोपीने जागृती सत्वे हिच्या गळयावर चाकूने वार केले. त्यानंतर स्वतःच्या हातावर आणि गळयावर देखील वार केले. या हल्ल्यात जागृती सत्वे हिचा मृत्यू झाला. पोलिसांनी आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला. सध्या आरोपीवर एमजीएम हॉस्पिटल, कामोठे येथे उपचार सुरू आहेत.

# आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या निमित्ताने भव्य सहकार दिंडीचे आयोजन

प्रतिनिधी

■ अलिबाग

रायगड जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्यावतीने आणि जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या सहकार्याने अलिबाग येथे आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या निमित्ताने भव्य सहकार दिंडी, शोभायात्रा आणि जिल्हा सहकार परिषद आयोजित करण्यात आली. सहकार क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत सहकाराचे सामाजिक आणि आर्थिक योगदान अधोरेखित करण्यात आले.

सहकार दिंडीची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयास अभिवादन करून झाली. त्यानंतर ही दिंडी महावीर चौक, बालाजी नाका आणि छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे अभिवादन करत सरखेल कान्होजीआंग्रे समाधीपासून ठिकरूळ नाका, आदर्श सहकारी पतसंस्था मार्गे



रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्यालयात पोहोचली.

या कार्यक्रमाला जिल्हा उपनिबंधक प्रमोद जगताप, सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय जोशी, कोकण विभाग फेडरेशन अध्यक्ष गिरीश तुळपुळे, कमळ पतसंस्थेचे अध्यक्ष नंदकुमार चाळके, माजी अध्यक्ष सतीश पाटील,रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक परेश देशमुख, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, जिल्हा फेडरेशन अध्यक्ष ॲड. जे. टी. पाटील, आदर्श सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश पाटील, अध्यक्ष अभिजित पाटील, कै दत्ता पाटील क्रेडिट कोऑप पतसंस्थेचे अध्यक्ष प्रमोद पाटील, एकविरा पतसंस्था नवगाव अध्यक्ष प्रमोद घासे तालुका सहनिबंधक श्रीकांत पाटील, महाराष्ट्र पतसंस्था फेडरेशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेखा लवांडे, सहयोग नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन योगेश मगर तसेच विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी, संचालक, व्यवस्थापक आणि कर्मचारी अशा तब्बल १००० पेक्षा अधिकांनी उपस्थिती दर्शविली. तालुका सहनिबंधक श्रीकांत पाटील यांनी आपल्या भाषणात सहकार क्षेत्रातील तीन रंगांचे महत्व स्पष्ट केले.

# कल्याण-भांडूप परिमंडलांतील 1 लाख वीजग्राहकांची वर्षाला सव्वा कोटींची बचत

- 'गो-ग्रीन'मध्ये नोंदणी करा आणि वाचवा 120 रुपये
- महावितरणच्या पर्यावरणस्नेही उपक्रमाला उदंड प्रतिसाद

प्रतिनिधी

■ कल्याण

महावितरणच्या कल्याण व भांडूप परिमंडलातील पर्यावरणस्नेही 1 लाखांहून अधिक वीजग्राहकांनी छापील कागदाचा पूर्णपणे वापर बंद करीत पेपरलेस वीजबिलास पसंती दिली आहे. महावितरणच्या 'गो-ग्रीन' उपक्रमात सहभागी झाल्याने या ग्राहकांना वार्षिक जवळपास सव्वा कोटी रुपयांचा थेट फायदा होत आहे.

महावितरणच्या 'गो-ग्रीन' उपक्रमानुसार छापील वीजबिलाच्या कागदाऐवजी फक्त ई-मेल व एसएमएसचा पर्याय निवडल्यास प्रतिबिल व प्रतिमहिना 10 रुपये सवलत देण्यात येत आहे. त्यामुळे योजनेत सहभागी ग्राहकांची वीजबिलांमध्ये वार्षिक 120 रुपयांची बचत होत आहे. त्यानुसार वीजबिलांसाठी छापील कागदाचा पूर्णपणे वापर बंद करीत कल्याण परिमंडलातील 52 हजार 129 तर भांडूप परिमंडलातील 49 हजार 856 पर्यावरणस्नेही वीजग्राहकांनी केवळ 'ई-मेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडला आहे. दोन्ही परिमंडलातील एकूण 1 लाख 1 हजार 985 वीजग्राहक या उपक्रमात सहभाग घेऊन वर्षाला 120 रुपयांप्रमाणे 1 कोटी 22 लाख 38 हजार 200 रुपये वाचवत आहेत.

आधुनिक जीवनशैलीशी सुसंगत 'गो-ग्रीन' उपक्रम पर्यावरण रक्षणासाठीही महत्त्वपूर्ण आहे. कागदी वीजबिलांचा वापर बंद केला तरी महावितरण मोबाईल ॲप व वेबसाईटवर ग्राहकांसाठी चालू व मागील वीजबिल तसेच वीजबिल भरण्याच्या पावत्या आदींची माहिती उपलब्ध आहे. वीजबिल तयार झाल्यानंतर लगेचच संगणकीय प्रणालीद्वारे ते 'गो-ग्रीन' उपक्रमात सहभागी ग्राहकांना ई-मेलद्वारे पाठविण्यात येत आहे. सोबतच 'एसएमएस'द्वारेही वीजबिलाची माहिती देण्यात येत आहे.

# 'केडीएमसी' पालिकेच्या लिपिकास लाच घेताना अटक

प्रतिनिधी

■ कल्याण

कल्याण डोंबिवली पालिकेच्या बाजार आणि परवाना विभागातील लिपिक प्रकाश काशिनाथ धिवर यांना ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने शुक्रवारी दीड लाख रूपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडले. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारीनुसार, तक्रारदार हे पालिका हद्दीत मटण विक्रीचा व्यवसाय करतात. या व्यवसायाचा परवाना अर्ज स्वीकृत करण्यासाठी आणि परवाना हस्तांतरित करण्यासाठी मदत म्हणून बाजार व परवाना विभागातील लिपिक प्रकाश धिवर यांनी तक्रारदार यांच्याकडे स्वत:साठी आणि वरिष्ठांसाठी



दोन लाख रूपये लाचेची मागणी केली होती. एवढी रक्कम देणे तक्रारदारास शक्य नसल्यामुळे तडजोडी अंती ही रक्कम एक लाख ५० हजार स्वीकारण्याचे लिपिक धिवर यांनी मान्य केले. परवाना अधिकृत असताना बाजार व परवाना विभागातील कर्मचारी आपल्याकडे मोठी लाच मागत असल्याप्रकरणी तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती.

बुधवारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या पडताळणी कारवाईत धिवर हे लाच मागत असल्याचे स्पष्ट झाले होते. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी शुक्रवारी पालिकेत सापळा लावला होता. तक्रारदाराकडून दीड लाख रूपये घेताना लिपिक प्रकाश धिवर यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी रंगेहाथ पकडले.

# शहापुरात अधिकाऱ्यांचा पाणी टंचाईवर कोरडा दौरा

प्रतिनिधी

■ शहापुर

शहापुरातील पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर भिवंडी प्रांत अमित सानप, तहसिलदार परमेश्वर कासोळे, सहा.गटविकास अधिकारी आर.बी. भोसले यांनी गुरुवार (दि.30) रोजी कसारा भागातील फुगाळे येथील विहीरीतील जलस्रोतांची पहाणी केली. मात्र अधिकार्यांचा हा दौरा सपशेल कोरडा ठरला. कारण कसारा भागातील फुगाळा, कसारा खुर्द, धामणी, अजनुप यांसारख्या ग्रामपंचायतींनी एक महिन्यापूर्वी टँकरची मागणी करूनही मंजुरी मिळाली नाही. तर पाणी टंचाई आराखडा देखील धुळखात पडला आहे. त्यामुळे हा दौरा केवळ फार्स ठरला आहे.

दरवर्षी प्रमाणे शहापूर तालुक्यात जानेवारी महिन्याचे सुरवाती पासुनच पाणी टंचाईला सुरूवात झाली आहे. त्यामुळे पंधरा कोटींचा टँकरने पाणी पुरवठा करण्यासाठीचा आराखडा तयार करण्यात आला असुन त्याला मंजुरी मिळाली नसल्याचे पंचायत समिती पाणी पुरवठा विभागाकडुन सांगितले जाते. तर चार ग्रामपंचायतीने टँकरची मागणी करूनही मंजुरी मिळाली नसल्याचे कळते. शहापुर तालुक्यात 110 ग्रामपंचायती असुन प्रत्येक ग्रामपंचायत मिळुन 189 जल जिवन च्या योजना आहेत. परंतु या योजनांच्या कामांची मुदत संपुनही योजना पुर्ण नाहीत. त्यामुळे येथील नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागतो.

# ठाण्याच्या अर्थसंकल्प आखणीत नागरिकांचा सहभाग

### ठाणे महापालिकेने मागविल्या नागरिकांकडून सूचना

प्रतिनिधी

■ ठाणे

'माझ्या नजरेतून ठाणे' या उपक्रमांतर्गत गेल्यावर्षीप्रमाणेच यंदाच्याही अर्थसंकलपात आखणीत नागरिकांच्या सुचनांचा समावेश करण्याचा निर्णय ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी घेतला आहे. या निर्णयानुसार, अर्थसंकल्पाकरीता नागरिकांना सूचना पाठवण्याचे आवाहन त्यांनी केले असून यामुळे यंदाच्या अर्थसंकल्पातही नागरिकांच्या सुचनांना स्थान मिळण्याची चिन्हे आहेत.

एखादी समस्या असेल तर तिचा पाठपुरावा करून ती समस्या सोडवण्यासाठी प्रशासनास लोकप्रतिनिधींचे सहकार्य मिळते. माध्यमांचे प्रतिनिधीही वेळोवेळी बातम्यांमधून किंवा प्रत्यक्ष भेटून विविध मुद्दे निदर्शनास आणून देतात. यासोबतच नागरिकांची मते जाणून घेण्याची गरज असल्याने 'माझ्या नजरेतून ठाणे’ हा उपक्रम सुरू करण्याचा निर्णय तत्कालीन ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी घेतला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून त्यांनी थेट नागरिकांशी संवाद साधून त्यांची शहराबद्दलची मते जाणून घेत त्याचा अर्थसंकल्पात अंर्तभाव केला होता. हा उपक्रम पुढे विद्यमान आयुक्त सौरभ राव यांनी पुढे सुरूच ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

# मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार पर्यावरण संरक्षणासाठी माघी उत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या

### श्रीगणेशमूर्तींचे विसर्जन महानगरपालिकेने निर्माण केलेल्या कृत्रिम विसर्जन तलावातच करण्याचे आवाहन

प्रतिनिधी

■ नवी मुंबई

मा. उच्च न्यायालयाचे दि. 30 जानेवारी 2025 रोजीच्या आदेशानुसार राज्यात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीची विक्री करण्यास बंदी आहे. तसेच त्या मूर्तींची नैसर्गिक तलावामध्ये विसर्जनासाठी बंदी आहे.

या अनुषंगाने माघी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार, नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या श्रीगणेशमूर्ती विसर्जनासाठी ठिकठिकाणी 26 कृत्रिम विसर्जन तलावांची निर्मिती करण्यात येत आहे. यावर संबंधित विभाग कार्यालयांचे सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी यांचे निरीक्षण व दोन्ही परिमंडळांचे उपआयुक्त यांचे नियंत्रण असणार आहे.

तरी मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पर्यावरण संरक्षणाच्या



दृष्टीने नागरिकांनी माघी गणेशोत्सवात प्रतिष्ठापना केलेल्या प्लास्टर ऑफ पॅरिसच्या श्रीमूर्तींचे विसर्जन आपल्या नजिकच्या कृत्रिम विसर्जन तलावातच करावे. तसेच शाडूच्या मूर्तींचेही विसर्जन पर्यावरणशील दृष्टीकोन जपत कृत्रिम विसर्जन तलावात करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

***कृत्रिम विसर्जन तलावांची यादी -***

***दिघा विभाग – 4 कृत्रिम तलाव***

*1 खोकड तलाव जवळ*
*2 गणपतीपाडा पेट्रोल पंपाजवळ*
*3 मनुभाई मैदान*
*4 रावली मिलजवळ*

***ऐरोली विभाग – 3 कृत्रिम तलाव***

*1 दिवा तलाव, सेक्टर 9 जवळ*
*2 ऐरोली नाका तलाव, सेक्टर 1 जवळ*
*3 खाडी तलाव, सेक्टर 20 जवळ*

***घणसोली विभाग – 4 कृत्रिम तलाव***

*1 रबाले तलाव जवळ*
*2 गुणाली तलाव जवळ*
*3 खदाण तलाव (राजीव गांधी तलाव) जवळ*
*4 छत्रपती शिवाजी महाराज तलाव जवळ*

***कोपरखैरणे विभाग – 3 कृत्रिम तलाव***

*1 धारण तलाव, सेक्टर 19 जवळ*
*2 महापे तलाव जवळ*
*3 महापे शाळा मैदान*

***तुर्भे विभाग – 3 कृत्रिम तलाव***

*1 कोपरीगाव तलाव जवळ*
*2 तुर्भेगाव तलाव जवळ*
*3 खोकड तलाव सानपाडा जवळ*

***वाशी विभाग – 2 कृत्रिम तलाव***

*1 वाशी तलाव सेक्टर 7 जवळ*
*2 जुहूगाव सेक्टर 12*

***नेरूळ विभाग – 2 कृत्रिम तलाव***

*1 चिंचोली तलाव शिरवणे जुईनगर जवळ*
*2 नेरूळ गाव तलाव जवळ*

***बेलापूर विभाग – 5 कृत्रिम तलाव***

*1 आग्रोळी तलाव जवळ*
*2 बेलापूर गाव तलाव जवळ*
*3 करावे तलाव जवळ*
*4 दारावे तलाव जवळ*
*5 दिवाळे जेट्टी जवळ*


# ठाकुर्ली चोळेतील तलाव गणपती विसर्जनासाठी बंद

प्रतिनिधी

■ डोंबिवली

देखभाल, दुरुस्तीचे काम करायचे असल्याने ठाकुर्ली चोळे गाव येथील तलाव गणपती विसर्जनासाठी बंद ठेवण्याचा निर्णय कल्याण डोंबिवली पालिका प्रशासनाने घेतला आहे. माघी गणेशोत्सव सुरू होण्याच्या पूर्वसंध्येला पालिका प्रशासनाने हा निर्णय घेतल्याने गणेश भक्त, राजकीय मंडळींकडून प्रशासनाच्या या निर्णयावर टीका केली जात आहे.

डोंबिवली, ठाकुर्ली, ९० फुटी रस्ता, सारस्वत कॉलनी, पेंडसेनगर परिसरातील बहुतांशी भाविक गणपती विसर्जन, नवरात्रोत्सव आणि इतर उत्सव काळातील विसर्जनासाठी ठाकुर्लीतील चोळेगाव येथील तलावावर येतात. हा तलाव पालिकेने यापूर्वीच सुशोभित केला आहे. विसर्जनासाठी हे ठिकाण सुरक्षित असल्याने बहुतांशी भाविक चोळे गाव तलावाला प्राधान्य देतात. माघी गणेशोत्सव शनिवारपासून सुरू



झाला. भाविक दीड दिवस, पाच दिवस गणपतीचे पूजन करून मग गणपतीचे विसर्जन करतात.

पालिकेने गणेशोत्सवाच्या पूर्वसंध्येला हा तलाव गणपती विसर्जनासाठी बंद ठेवण्यात येणार आहे, असे जाहीर करून भाविकांची गैरसोय केली आहे, अशी टीका गणेशभक्तांकडून केली जात आहे. चोळेगाव तलाव विसर्जनासाठी बंद ठेवण्यात येणार असल्याने या भागातील गणेश भक्तांना कचोरे येथे रेल्वे मार्ग ओलांडून खाडी किनारी, एमआयडीसी तलाव किंवा डोंबिवली पश्चिमेतील गणेशनगर, मोठागाव भागातील खाडी किनारच्या विसर्जन घाटावर जावे लागणार आहे.

पालिकेतर्फे माझी वसुंधरा अभियानांतर्गत चोळे तलावाचे पुनरुज्जीवन करण्याचे काम सुरू आहे. या कामांतर्गत तलावात साचलेला गाळ बाहेर काढणे, तलावा भोवतालची सुरक्षा भिंत दुरुस्त करणे, पदपथ तयार करणे, तलावाच्या बाजुला कायमस्वरुपी कृत्रिम तलावाची उभारणी करणे ही कामे केली जाणार आहेत.

## जल जीवन योजनेसाठी साडी नेसून सरपंच मंगेश साबळेंचे आंदोलन

**संभाजीनगर :** सरकारी अधिकाऱ्याचे लाच मागितली म्हणून 2 लाख रूपये कार्यालयाबाहेर उडविणारे, मराठा आरक्षणासाठी आपली नवी कोरी कार जाळणारे फुलंब्री तालुक्यातील गेवराई पायगा गावचे सरपंच मंगेश साबळे हे पुन्हा चर्चेत आले आहेत. मंगेश साबळे यांनी छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद कार्यालयाबाहेर डोक्यावर कळशी घेत साडी घालून आंदोलन केले आहे. लाडक्या बहिणींना जल जीवन मिशनच्या माध्यमातून चार-चार वर्षे झाले पाणी पिण्यासाठी मिळत नाही, असं म्हणत मंगेश साबळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सवाल विचारला आहे. गावकऱ्यांना पाणी समस्येला तोंड द्यावे लागत आहे. 4 वर्षापासून जल जीवन मिशनचे काम अपूर्ण आहे. याकडे लक्ष वेधण्यासाठी मंगेश साबळे यांनी साडी घालून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांच्या कार्यालयाबाहेर आंदोलन केले. याचा व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल होत आहे. मंगेश साबळे म्हणाले, "माझ्या गावातील महिलांना 2 किलोमीटर पाण्यासाठी पायपीट करावी लागते. 2020-21 काळात जल जीवन मिशन अंतर्गत 1 कोटी 80 लाख मंजूर करण्यात आले.



**म ह त्वा चे**

### नगरपालिका शाळेतील जेवणात मृत किडा

**भुसावळ :** भुसावळमधून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. भुसावळ शहरातील नगरपालिका शाळेत जेवणात मृत धनोर किडा सापडला आहे. नगरसेवक महिंद्रा ठाकूर यांनी हा प्रकार उघडकीस आणला. नगरपालिका शाळेच्या जेवणात किडा सापडल्याने पालकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.
भुसावळ शहरातील नगरपालिका शाळा क्र. ३५ मध्ये शालेय पोषण आहारात सोयाबीन पुलाव बनवून विद्यार्थ्यांना खाण्यासाठी दिला जातो. हा पुलाव बनवण्यासाठी पुरविण्यात आलेल्या सोयाबीनच्या वड्यांमध्ये मृत धनोर किडा आढळला. आहार विद्यार्थ्यांना देण्याआधीच हा प्रकार समोर आल्याने अनर्थ टळला असे लोक म्हणत आहेत. नगरपालिका शाळेतला हा प्रकार भुसावळ शहरातील नगरसेवक महिंद्रा ठाकूर यांनी उघडकीस आणला. त्यांनी पोषण आहार पुरवठा अधिकारी यांच्यासह भुसावळ नगरपालिकेचे मुख्य अधिकारी यांच्याकडे संबंधित प्रकारावरुन तक्रार नोंदवली आहे. ठाकूर यांनी संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी देखील केली आहे.

### पुण्यात जीबीएसचे 3 नवे रुग्ण

**पुणे :** पुण्यासह राज्यभरात जी बी सिंड्रोमचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. पुण्यानंतर इतर जिल्ह्यांमध्येही हा आजार पसरत आहे. दरम्यान जी बी एस वाढू नये यासाठी आरोग्य यंत्रणा अलर्ट मोडवर आहे. नागरिकांना या आजाराचा संसर्ग होऊ नये यासाठी प्रशासन खबरदारी घेतली जात आहे. आता पुण्यातील जी बी एस रुग्णांची नवी माहिती समोर आली आहे. गुलियन बॅरी सिंड्रोमचे पुण्यात आत्तापर्यंत १४९ रुग्ण सापडले आहेत. यातील वीस रुग्णांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. पुण्यात ५ संशयित मृत्यूची नोंद झाली आहे. एकूण रुग्णांपैकी १२४ रुग्णांची जी बी एस निदान निश्चिती झाली आहे. यांपैकी २९ रुग्ण हे महापालिका तर ८२ रुग्ण हे नव्याने पुणे महापालिका अंतर्गत येणाऱ्या गावांमधील आहेत. १७ रुग्ण हे पिंपरी चिंचवड मनपा, १३ रुग्ण पुणे ग्रामीण व ८ इतर जिल्ह्यांतील आहेत. पुण्यातील एकूण जी बी एस रुग्णांपैकी २८ रुग्ण हे व्हेंटीलेटरवर आहेत. आज ३ नवीन संशयित रुग्णांची नोंद झाली आहे. तसेच ६ रुग्ण हे मागील दिवसामधील आहेत.

## मला भारतीय जनता पक्ष धार्जिण नाही, तो पक्ष माझ्यासाठी लकी नव्हता

### कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांची जोरदार फटकेबाजी

प्रतिनिधी
■ नाशिक

भारतीय जनता पक्षात गेल्यावर तिकिट मिळाले की आमदार होतो. मात्र, माझ्याबाबत तसे का झाले नाही? असा प्रश्न कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी उपस्थित केला आहे. मला भारतीय जनता पक्ष धार्जिणा नाही, असे देखील ते म्हणाले. रामाला 14 वर्षांचा वनवास मिळाला होता. मात्र मला 28 वर्षाचा वनवास मिळाला. मात्र आता माझा 28 वर्षांचा वनवास अजित पवार यांनी दूर केला, असे देखील कोकाटे यांनी म्हटले आहे. सिन्नर विधानसभा मतदारसंघातून पाच वेळा विजयी झालेले माणिकराव कोकाटे यांचा सर्व पक्षीय नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात माणिकराव कोकाटे यांनी जोरदार फटकेबाजी केली.



यावेळी माणिकराव कोकाटे म्हणाले की, मी निवडणुकीला उभे राहणार नव्हतो. त्या ऐवजी माझी मुलगी निवडणुकीला उभे राहणार होती. मात्र माझ्या मुलीने मलाच उभे राहण्यास सांगितले. तुम्ही ज्येष्ठ आहात तुम्हाला मंत्रिपदाची संधी असल्याचे माझी मुलगी मला म्हणाली होती. त्यानंतर झाले देखील तसेच. त्यामुळेच आता मी मंत्री आहे. आधीच्या काळी काँग्रेसचे तिकीट घेतले की आमदार होत होते. आता भाजपमध्ये तिकीट घेतले की आमदार होता येते. मात्र मीच कसा आमदार झालो नाही? तो पक्ष माझ्यासाठी लकी नव्हता, असे देखील कोकाटे यांनी म्हटले आहे.

यावेळी माणिकराव कोकाटे यांनी आपल्या कृषी खात्यासंदर्भात देखील प्रतिक्रिया दिली आहे. कृषी खाते हे शंभर टक्के लोकांशी संबंधित आहे. मात्र अन्नधान्य बाबतीत नैसर्गिकपणा कसा राखता येईल आणि रासायनिक खतांचा वापर कसा कमी करता येईल, यासाठी मी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या संदर्भात बोलताना नाशिकचे शेतकरी हुशार आणि प्रयोगशील असल्याचा दावा कोकाटे यांनी केला आहे. पाणी मर्यादित असल्यामुळे कमी पानात शेती कशी करता येईल, याकडे लक्ष द्यावे लागणार आहे. 31 टक्क्यांपेक्षा जास्त बागायती शेती होणार नाही तर 70% शेती ही जिरायती आहे. त्या दृष्टीकोनातून पिके घेतली पाहिजेत, असे आवाहन देखील त्यांनी यावेळी शेतकऱ्यांना केले.

## महिलांना कायदे आणि त्यांचे हक्क समजावून सांगण्यास असमर्थ ठरलो

### ज्येष्ठ विधिज्ञ उज्वल निकम यांची खंत

प्रतिनिधी
■ पुणे

न्यायदेवता डोळ्यावरील पट्टी काढून महिलांना न्याय देण्याचे काम करीत आहे. पण दुर्दैवाने आजही महिला व मुलींवर होणाऱ्या अत्याचाराबाबत दाद मागण्यासाठी कोणते कायदे आहेत? त्यांचे काय हक्क आहेत हे समजून सांगण्यात आम्ही असमर्थ ठरलो आहोत अशी खंत व्यक्त करीत, महिलांवरील अत्याचारासंबंधीचे कायदे महिलांना समजेल अशा सोप्या मराठी भाषेत कळण्यासाठी पुस्तिका काढायला हव्यात अशी सूचना ज्येष्ठ विधिज्ञ उज्वल निकम यांनी शासनाला केली. तर फौजदारी व दिवाणी न्यायालयांमध्ये निकालपत्र मराठी भाषेत देण्यासाठी मराठी भाषा विभागाने कार्यवाही करावी,' असे निर्देश विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले.



विश्व मराठी संमेलनाच्या आचार्य प्र. के. अत्रे मंचावर (ॲम्फी थिएटर) 'महिलांविषयक कायदे व न्याय मराठी भाषेत' या विषयावरील परिसंवादात डॉ. गोऱ्हे आणि ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. उज्वल निकम यांनी आपले विचार मांडले. कायद्याच्या चौकटीत मराठी भाषेचा परिणामकारक वापर केल्यास महिला आपल्या हक्क-अधिकारांबाबत जागरूक होतील. त्यातून पीडितांना खऱ्या अर्थाने न्याय मिळेल,' अशी मांडणी दोन्ही मान्यवरांनी केली. ॲड. अनुराधा परदेशी यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या की, १९८० नंतर महिलांविषयक कायद्यांमध्ये विविध बदल झाले आहेत. पोलिसांपासून न्यायव्यवस्थेत लिंगभाव संवेदनशीलता आली आहे. त्यातून न्यायव्यवस्था सक्षम होत असून, महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये दोषसिद्धीचे प्रमाण वाढत आहे. महाराष्ट्र सरकारने सर्व फौजदारी आणि दिवाणी न्यायालयांची भाषा मराठी असेल हा निर्णय घेतला आहे.

## सावंतवाडीत बांधणार अत्याधुनिक चर्च

### अतिरिक्त खर्चासाठी मदतीचे आवाहन

प्रतिनिधी
■ सावंतवाडी

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्वांत जूने चर्च म्हणून प्रसिध्द असलेल्या सावंतवाडीतील नव्याने बांधण्यात आलेल्या मिलाग्रीस मदर चर्चची प्रतिकृती आज चर्चचे प्रमुख फादर मिलेट डिसोझा यांनी आज जाहीर केली. दरम्यान या चर्चचे बांधकाम अर्धे झाले असून ते मे २०२६ पर्यंत पुर्ण करायचे आहे. त्यासाठी ७ कोटी इतक्या निधीची आवश्यकता असून त्यासाठी सर्वधर्मियांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी आज येथे पत्रकार परिषदेत केले.

सावंतवाडी संस्थान कालापासून म्हणजेच १६५२ सालात बांधण्यात आलेल्या सावंतवाडीच्या मिलाग्रीसची वास्तू पुन्हा एकदा नव्याने बांधली जात आहे. या इमारतीचे अर्धे काम पुर्ण झाले आहे. याबाबत माहिती देण्यासाठी मिलाग्रीस हायस्कुल मध्ये आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी चर्चच्या प्रमुख पदाधिकारी माजी नगराध्यक्षा अनारोजीन लोबो, ग्रेगरी डान्टस, ऑगस्तीन फर्नांडिस, व्हिक्टर फर्नांडीस, ॲन्थोनी डीकोना आदी उपस्थित होते. यावेळी फादर डिसोझा म्हणाले, संस्थानकालात बांधण्यात आलेली चर्चची इमारत जीर्ण झाली होती. त्यामुळे तब्बल १२ ते १५ कोटी खर्च करुन नव्याने इमारत बांधली जात आहे. आता पर्यंत अर्धे काम पुर्ण झाले आहे. आता उर्वरित कामासाठी आणखी ७ कोटीची आवश्यकता आहे. टि आकार घेवून बांधण्यात येणाऱ्या या चर्च मध्ये तब्बल दिड हजार लोक बसू शकतील अशी क्षमता आहे



## संमेलनाने नाट्यचळवळीला उर्जितावस्था येईल

### डॉ. गिरीश गांधी 100 व्या विभागीय नाट्य संमेलनाच्या तयारीला श्री नटराज पूजनाने प्रारंभ

प्रतिनिधी
■ नागपूर

100 व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे विभागीय स्तरावर आयोजन करण्याचा मान नागपूरला मिळाला असून हे संमेलन दर्जेदार व्हावे, यासाठी सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करायला पाहिजे. या संमेलनाने नागपूर, विदर्भातील नाट्यचळवळीला उर्जितावस्था येईल, असे मत 100 व्या नागपूर विभागीय नाट्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष आणि नाट्यपरिषदेचे विश्वस्त डॉ. गिरीश गांधी यांनी व्यक्त केले.

नागपूर विभागातील नाट्य संमेलन येत्या मार्च महिन्यात होणार असून त्याच्या तयारीची सुरुवात शनिवारी विष्णूजी की रसोई येथे श्री नटराज पूजनाने व घंटा वाजवून संमेलनाच्या तयारीची सुरुवात करण्यात आली. यावेळी नाट्य परिषदेच्या नागपूर शाखेचे कार्यवाह व मध्यवर्तीचे उपाध्यक्ष नरेश गडेकर, अध्यक्ष अजय पाटील, उपाध्यक्ष सचिन गिरी, प्रसिद्ध चित्रपट अभिनेते देवेंद्र दोडके, ज्येष्ठ रंगकर्मी प्रभाकर आंबोणे, बापू चनाखेकर, डॉ. निलकांत कुलसंगे, किशोर आयलवार यांची प्रमुख उपस्थिती होती.



हे विभागीय संमेलन सर्वसमावेशक व्हावे यासाठी सर्व रंगकर्मींनी एकत्र येऊन कार्य करावे, असे आवाहन डॉ. गिरीश गांधी यांनी केले. नरेश गडेकर यांनी नाट्यसंमेलनातील कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली तर अजय पाटील यांनी विदर्भातील सर्व रंगकर्मींनी या संमेलनासाठी एकत्र यावे यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतुल शेबे यांनी केले तर आभार नरेश गडेकर यांनी मानले. कार्यक्रमाला नाट्यपरिषदेचे नितीन पात्रीकर, किशोर डाऊ, प्रशांत मंगदे, प्रदीप धरमठोक, संजय जीवने, वत्सला पोलकमवार, आसावरी तिडके, कुणाल गडेकर, संजय भाकरे, देवेंद्र लुटे, संजीवनी चौधरी, डॉ. दीपाली घोंगे, रमेश भिसीकर, संजय वलीवकर, मीना देशपांडे, विवेक खेर, महेश पातुरकर, स्वप्निल बन्सोड, सारिका पेंडसे यांच्यासह अनेक रंगकर्मी उपस्थित होते.

## कुसुंबीत श्री काळेश्वरी देवी कलशारोहण कार्यक्रम सोहळा

प्रतिनिधी
■ सातारा

कुसुंबी, सातारा येथे श्री काळेश्वरी देवी (जुनेठाण) प्राणप्रतिष्ठा, कलशारोहण आणि कोनशिला अनावरण कार्यक्रम सोहळा ५ ते ७ फेब्रुवारी दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. या निमित्ताने विविध धार्मिक तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांची रूपरेषा निश्चित करण्यात आली आहे.

श्री काळेश्वरी देवी जुनेठान जीर्णोद्धार फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाची सुरुवात ५ फेब्रुवारीला सकाळी ७ पासून विविध धार्मिक पूजाअर्चा यांनी होणार आहे. याच दिवशी रात्री ९ वाजता महाराष्ट्राची लोकधारा हा सांस्कृतिक कार्यक्रम होईल. दुसऱ्या दिवशी ६ फेब्रुवारीला सकाळी ८ पासून धार्मिक कामे होणार असून याच दिवशी रात्री ९ वाजता स्वर सह्याद्री भावगीतांचा हा संगीत सोहळा होणार आहे. तिसऱ्या दिवशी ७ फेब्रुवारीला या सोहळयातील प्रमुख धार्मिक विधी होणार असून यात कलशारोहण आणि प्राणप्रतिष्ठा यांचा समावेश असेल. या दिवशी रात्री ९ वाजता देवीच्या जागरण गोंधळ गाण्यांचा कार्यक्रम होईल. तिन्ही दिवशी भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन दुपारी १२ ते ३ आणि रात्री ७ ते १० या दरम्यान करण्यात आले आहे.



सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि खासदार श्री. उदयनसिंहराजे भोसले यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमाला लाभली आहे. यावेळी सातारा सहकारी मध्यवर्ती बँकेचे संचालक आणि समाजसेवक श्री. ज्ञानदेव रांजणे तसेच माजी जिल्हा परिषद सदस्य सौ. अर्चना रांजणे उपस्थित राहणार आहेत. तीर्थक्षेत्र कुसुंबी तसेच सातारा परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन या कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि देवस्थान प्रमुख सल्लागार उमेश माने तसेच स्वागत अध्यक्ष शालन गाडे यांनी केले आहे.

## टक्कल व्हायरसने बाधित रुग्णांना मनोधैर्य देण्यासाठी गावातील 10 जणांनी केले टक्कल

प्रतिनिधी
■ शेगाव

शेगाव तालुक्यातील बोंडगाव गावात सध्या अनेक नागरिक अनाकलनीय केस गळतीच्या समस्येने त्रस्त आहेत. या समस्येमुळे गावकरी मानसिक तणावाखाली असून, अनेकांना आत्मविश्वास कमी झाल्याची भावना निर्माण झाली आहे. लोकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, काहींना हा गंभीर आजार असल्याचे वाटत आहे.

गावकऱ्यांना या परिस्थितीत आधार देण्यासाठी शिवसेना शेगाव तालुका प्रमुख माजी सरपंच रामा पाटील थारकर यांनी एक अनोखी आणि प्रेरणादायी कृती केली. त्यांनी आपले सहकारी विनायक इलामे, आदर्श अंदुरकर, सोपान जुमळे, संजय बोरसे, प्रवीण थारकर, प्रदीप कळसकर, ओम थारकर, प्रणव थारकर सह इतर सहकाऱ्यांसह स्वतःहून टक्कल करून घेतले आहे.



बाधित नागरिकांना मानसिक आधार देण्यासाठी हा निर्णय घेतला असल्याचं त्यांनी सागितलं. ही कोणतीही लाज वाटण्यासारखी गोष्ट नाही, हा कोणताही गंभीर आजार नाही आणि आपण सर्वजण सोबत आहोत, हे दाखवण्यासाठी आम्ही हा निर्णय घेतला असल्याचं ते म्हणाले.

## 15 ठिकाणी खासगी टँकरच्या पाण्यातच जीवाणू असल्याचे उघड

प्रतिनिधी
■ पुणे

गुइलेन बॅरे सिंड्रोमची (जीबीएस) लागण झालेले रुग्ण आढळत असलेल्या भागांत खासगी टँकरनेही पाणीपुरवठा होतो. हे टँकर जेथून पाणी घेतात, अशा १५ ठिकाणच्या पाण्यात ई-कोलाय जीवाणू आढळला आहे. महापालिकेने आवाहन करूनही टँकरमालकांनी आवश्यक ती काळजी न घेतल्याने हे घडल्याचे उघडकीस आले आहे.

शहरात गेल्या काही दिवसांपासून खडकवासला, धायरी, किरकिटवाडी आणि आजूबाजूच्या परिसरात 'जीबीएस' रुग्णांची संख्या वाढत आहे. या भागातील नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या पाण्याचे स्रोत आणि अन्नपदार्थांची तपासणी करण्याचे काम महापालिकेच्या वतीने केले जात आहे. या परिसरातील सोसायट्यांना पाणीपुरवठा करणारे खासगी टँकर ज्या केंद्रांवरून पाणी भरतात, त्याचीही तपासणी करण्यात आली होती.

## पालिकेकडून दिली जाणारी मोफत ब्लिचिंग पावडर घेतली फक्त एका टँकरचालकाने

प्रतिनिधी
■ पुणे

गुलियन बॅरे सिंड्रोमच्या (जीबीएस) बाधित क्षेत्रात पाणीपुरवठा करणाऱ्या सर्व टँकरमध्ये ब्लिचिंग पावडर मिसळण्याचे आदेश देत महापालिकेने ही पावडर मोफत उपलब्ध करून दिली. मात्र, महापालिकेच्या या आदेशाला टँकरचालकांनी ठेंगा दाखवला आहे. महापालिकेकडून केवळ एका टँकरचालकानेच महापालिकेकडून पावडर नेली आहे. त्यामुळे महापालिकेने नोटीसद्वारे टँकरचालकांवर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

धायरी, नांदोशी, किरकटवाडी, नांदेड या भागांसह काही गावांमध्ये जीबीएसचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळले आहेत. या भागांतील विहीर आणि बोअरवेल अशा सोळा ठिकाणी टँकर व्यावसायिकांकडून पाणी भरले जाते. यातील बहुतेक व्यावसायिक हे स्थानिक भागातील असून, त्यांच्याकडूनच चांगले पाणी पुरवठ्याबाबत दुर्लक्ष केले जात आहे. जीबीएसच्या वाढत्या रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने सिंहगड रस्त्यावरील धायरी, नांदेड परिसरातील १५ टँकर पॉइंट चालकांच्या जलस्रोतांमधील पाण्याचे नमुने चाचणीसाठी घेतले होते. यापैकी एका ठिकाणच्या नमुन्यात ई-कोलाय जीवाणू आढळला.

## सुजल निवातेची राज्यस्तरीय निसर्गचित्रण स्पर्धेतील कलाकृती ठरली सर्वोत्कृष्ट

### ▪ सह्याद्रि स्कूल ऑफ आर्टचा विद्यार्थी ▪ प्रणय फराटेचे उल्लेखनीय यश


प्रतिनिधी
■ संगमेश्वर

संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'राज्यस्तरीय प्रत्यक्ष निसर्गचित्रण स्पर्धा-२०२५ मध्ये कोकणातील अग्रगण्य कलामहाविद्यालय सह्याद्री स्कूल ऑफ आर्ट सावर्डेचा विद्यार्थी सुजल निवाते व माजी विद्यार्थी प्रणय फराटे यांच्या कलाकृती राज्यात सर्वोत्कृष्ट ठरल्या आहेत.

विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे प्रथमच विद्यापीठात प्रत्यक्ष निसर्गचित्रण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेला राज्यभरातील चित्रकारांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. पश्चिम महाराष्ट्रासह बेळगाव, मुंबई, पुणे, रत्नागिरी इत्यादी ठिकाणांहून १२० चित्रकार यात सहभागी झाले. सकाळी नोंदणी आणि उद्घाटन समारंभानंतर सर्व कलाकारांनी विद्यापीठाच्या परिसरात फेरफटका मारला आणि आपल्याला भावलेल्या दृष्याची निवड करून तेथे कलाकृती रेखाटण्यास सुरुवात केली.










मुख्य प्रशासकीय इमारतीच्या परिसरात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनीही मोटारीतून उतरून हे चित्रकार काढत असलेली चित्रे मोठ्या कुतूहलाने पाहिली आणि त्यांचे कौतुक केले. सायंकाळी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले. ही स्पर्धा विद्यार्थी विभाग आणि खुला कलाकार विभाग अशा दोन विभागांत घेण्यात आली. दोन्ही विभागांमध्ये सर्वोत्कृष्ट पाच चित्रकारांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह, रोप आणि रोख ५००० रुपये असे पारितोषिकाचे स्वरुप होते.

विद्यार्थी विभागात सुजल निवाते तर खुल्या कलाकार विभागात प्रणय फराटे यांचे चित्रे सर्वोत्कृष्ट ठरले. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून ज्येष्ठ चित्रकार सुनील पुजारी (मुंबई), शरद तावडे (मुंबई) आणि महेश होनुले (बेळगाव) यांनी काम पाहिले.

पारितोषिक वितरण समारंभास विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, माजी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड उपस्थित होते. तत्पूर्वी, सकाळच्या सत्रात विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी कॅनव्हासवर निसर्गचित्र रंगवून स्पर्धेचे अभिनव पद्धतीने उद्घाटन केले.


कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी केले, तर डॉ. राजश्री खटावकर यांनी आभार मानले. प्रख्यात चित्रकार बबन माने, नृत्यदिग्दर्शक संग्राम भालकर, नागेश हंकारे यांनी स्पर्धेचे यशस्वी संयोजन केले. या यशस्वी विद्यार्थ्यांचे सह्याद्री शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष व आमदार शेखर निकम, संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब भुवड, सेक्रेटरी महेश महाडिक, ज्येष्ठ चित्रकार शिल्पकार प्रा. प्रकाश अर्जुन राजेशिर्के, पूजा निकम, अनिरुद्ध निकम कलामहाविद्यालयाचे प्राचार्य माणिक यादव तसेच प्राध्यापक यांनी या विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

> विद्यापीठाचा परिसर भारावून टाकणारा संगीत व नाट्यशास्त्र विभागाचा सारा परिसर कलाकाराना भारावून टाकणारा असल्याने या उत्साहवर्धक जागेत जिकडे पाहावं तिकडचा परिसर चित्रबद्ध कारण्यासारखा होता. माझे विषय कोकणच्या ग्रामीण भागावर आणि जीवनावर आधारित असल्याने, मी कलाकृती रेखाटण्यासाठी एका कौलारू बैठ्या इमारतीची निवड केली. या इमारतीवर पडलेलं सकाळचं कोवळं ऊन आणि भिंतीचा फिकट गुलाबी रंग मला सर्वाधिक भावला.
>
> **- प्रणय फराटे, विजेता चित्रकार**

## वसंत पंचमीच्या पावन पर्वावर बैलांच्या शंकरपटाचे आयोजन

प्रतिनिधी
■ भंडारा

मुंबई- कोलकाता राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या पिंपळगाव / सडक येथे वसंतपंचमीच्या पावन पर्वावर पटसमिती अंतर्गत बैलांच्या शंकरपटाचे आयोजन करण्यात आले आहे. डोळ्याचे पारने फेडणाऱ्या मानाच्या बैलांच्या जंगी बिना तुतारीच्या शंकरपटाची सुरुवात फेब्रुवारीच्या 2 तारखेला होणार आहे. मध्यंतरी 2014-15 ते 2020-21 या सात वर्षाच्या काळात बैलांच्या शर्यतीवर न्यायालयाच्या बंदीमुळे खंड पडल्यानंतर सन 1920 ते 2025 असा शंभर वर्षाचा इतिहास या शंकरपटाला आहे. शताब्दी महोत्सव-२०२५ च्या पार्श्वभूमीवर पिंपळगावात 'एक मैदान एक पट' या पार्श्वभूमीवर शंकरपटाची 'शंभरी' साजरी होत आहे. झाडीपट्टीतील सर्वात मोठे आणि मानाचा शंकरपट



शर्यतीचे पिंपळगाव / सडक येथील मैदान चार दिवस सळसळत्या उत्साहात न्हाऊन निघणार आहे. त्यामुळे झाडीपट्टीत पुन्हा एकदा शताब्दी महोत्सव-२०२५ मध्ये शंकरपटा निमित्त बैलांच्या शर्यतीत वाऱ्याच्या वेगाचा थरार अनुभवत भिर्रर्रर्र.. ची आरोळी गुंजणार आहे. दरम्यान, जवळपास सात वर्षापासून शंकरपटावर घातलेल्या बंदीमुळे ९६ वर्षापासून सुरु असलेला पिंपळगावातील शंकरपट इतिहासजमा होईल का असा प्रश्न पिंपळगावसह जिल्हावासियांना होता.

# जिल्हा क्रीडा स्पर्धेत डोल्हारी बुद्रूक शाळेतील कबड्डी- मुलांची चांगली कामगिरी

**विक्रमगड :** स.तु.कदम विद्यालय पालघर येथे झालेल्या शैक्षणिक वर्ष 2024-25 शालेय जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत जि.प.उच्च प्राथ शाळा डोल्हारी बुद्रूक शाळेतील कबड्डी- मुले द्वितीय क्रमांक पटकावला तर 100 मी. धावणे मुले- मयूर जयवंत ठाकरे द्वितीय क्रमांकाने विजयी झाला. या क्रीडा स्पर्धेप्रसंगी जि.प.अध्यक्ष प्रकाश निकम , विक्रमगड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी कासले, दादडे केंद्रप्रमुख तथा गट समन्वयक किरण रोडे साहेब, तसेच शाळेचे मुख्याध्यापक . विलास चौधरी मार्गदर्शक कोच संतोष गणपत उमतोल , मेघा ठाकरे, विष्णु उमतोल , प्रशांत महाले, विनोद पानतले, व असंख्य ग्रामस्थ हितचिंतक उपस्थित होते.शाळेतील या विजेत्या मुलांचे पं.स.सभापती कनोजे, उपसभापती मा भोईर, शिक्षण विस्तार अधिकारी. पाचमासे साहेब, सरपंच, उपसरपंच , ग्रामस्थ यांनी या मुलांचे अभिनंदन केले. एकंदरीत संपूर्ण विक्रमगड तालुक्यातून या गुणी खेळाडू मुलांचे गोड कौतुक केले जात आहे.


कबड्डी मुले द्वितीय क्रमांक

# परब फिटनेसचा दिनेश राठोड 'नवोदित मुंबई श्री' चा मानकरी

## २८० स्पर्धकांची विक्रमी उपस्थिती



प्रतिनिधी
■ मुंबई

अभूतपूर्व गर्दी, खेळाडूंचा विक्रमी सहभाग आणि पीळदार सागर उसळलेल्या नवोदित मुंबई श्री स्पर्धेत मुंबई शरीरसौष्ठव स्पर्धेला दिनेश राठोड गवसला. परब फिटनेसच्या दिनेशने आपल्यापेक्षा वरच्या गटात ठरलेल्या विजेत्यांवर अत्यंत चुरशीच्या लढतीत मात करीत मुंबई शरीरसौष्ठवाचे सर्वात उत्साहवर्धक आणि प्रोत्साहन देणारे नवोदित मुंबई श्रीचे जेतेपद संपादले. स्ट्रेंथ जिमचा हितेन तामोरे उपविजेता ठरला.

परळच्या कामगार मैदानाला आज शरीरसौष्ठवांच्या वारकऱ्यांची अर्थात शरीरसौष्ठवपटूंची गर्दी उसळली होती. दिंडीतल्या वारकऱ्यांना जशी विठू माऊलीच्या दर्शनाची आस जशी लागलेली असते तशीच आस नवोदित शरीरसौष्ठवपटूंना या स्पर्धेची लागली होती. त्यामुळे या स्पर्धेत आपले पीळदार स्नायू दाखवण्यासाठी तब्बल २८० स्पर्धकांची विक्रमी उपस्थिती लाभल्याने आयोजक आणि संघटनेच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहात होता. या नवोदितांबरोबर त्यांचे पाठीराखेही शेकडोंच्या संख्येने आल्यामुळे कामगार स्टेडियम अक्षरशा फुलले होते. प्रत्येक गटात ४० पेक्षा अधिक स्पर्धक असलेल्या या स्पर्धेत ६० किलो वजनीगटात स्पर्धकांच्या अभूतपूर्व सहभागाने अर्धशतक ओलांडले होते. गेल्यावेळी २३० स्पर्धकांची उपस्थिती लाभलेल्या या स्पर्धेत एकंदर सात गटात मुंबईच्या शरीरसौष्ठवाचे २८० भावी स्टार्स अवतरले होते. स्पर्धकांची उपस्थिती इतकी प्रचंड होती की भव्य दिव्य स्टेजही अपुरा पडत होता.

बृहन्मुंबई शरीरसौष्ठव संघटना आणि मुंबई उपनगर शरीरसौष्ठव आणि फिटनेस संघटना यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या या स्पर्धेला खरी ताकद लाभली ती आंतरराष्ट्रीय शरीरसौष्ठवपटू विक्रांत देसाईची. शरीरसौष्ठवावर असलेल्या प्रेमापोटी त्यानेच या स्पर्धेचे शिवधनुष्य लिलया पेलले आणि एका दिमाखदार स्पर्धेचे आयोजन केले.

**नवोदितांना प्रोत्साहन देण्यासाठी शरीरसौष्ठवाच्या स्टार्सची हजेरी**

*मुंबई शरीरसौष्ठवाची नर्सरी असलेल्या नवोदित मुंबई श्रीमध्ये सहभागी झालेल्या हौशी खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी कामगार मैदानात शरीरसौष्ठव जगतातल्या स्टार्सने हजेरी लावली. पीळदार तरूणाईचा मार्गदर्शक असलेला अनिल राऊत, सुजल पिळणकर, जालिंदर आपके, संतोष भरणकर, हरमीत सिंह आणि मुंबई श्रीचा गतविजेता उमेश गुप्ता या दिग्गजांनीही स्पर्धेतील खेळाडूंचे कौतुक केले.*

# नॅशनल गेम्स; खो-खोमध्ये महाराष्ट्राचा डबल धमाका

## महिला व पुरूष संघाला सुवर्णपदक ; पदकतालिकेत अव्वल क्रमांक

वृत्तसंस्था
■ हल्दवणी

38 वी नॅशनल गेम्समध्ये (राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत) राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत महाराष्ट्रच्या महिला आणि पुरूष संघाने ओरिसाच्या दोन्ही संघांवर मात करित डबल धमाका साधला आहे. महिला आणि पुरूष संघानी सुवर्णपदक पटकाविले आहे. या विजयामुळे महाराष्ट्र राज्य पदक तालिकेत प्रथम क्रमांकावर पोहोचला आहे.



उत्तराखंड येथे सुरु असलेल्या या स्पर्धेत आज झालेल्या महिलांच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्र संघाने ओडिसावर चूरशीच्या सामन्यात 3 गुणांनी (31-28) असा पराभव केला. मध्यंतराला महाराष्ट्र कडे तीन गुणांची (15-12) आघाडी होती. दुसऱ्या सत्रात कायम राखण्यात महाराष्ट्र संघाला यश आले. त्यामुळे हा विजय सुकर झाला. विजयी महाराष्ट्रातर्फे प्रियांका इंगळे (१.३० मि. , १.५२ मि. संरक्षण आणि ४ गुण), अश्विनी शिंदे (१.२३ मि. संरक्षण व १० गुण), संध्या सुरवसे (२.२४ मि., २.२३ मि. संरक्षण व २ गुण), रेश्मा राठोड (१.११ मि., १.४५ मि. संरक्षण आणि ४ गुण) यांनी विजयात मोलाची कामगिरी केली. तर ओडिसा तर्फे अर्चना प्रधान (१ मि., १.३५ मि. संरक्षण आणि ४ गुण), सुभश्री सिंग (१.८ मि. संरक्षण व ६ गुण) यांनी चांगला खेळ केला.

पुरूष गटात महाराष्ट्राने ओडिसाचा सव्वा सात मिनिटे राखून ६ गुणांनी (३२-२६) पराभव केला. त्यात महाराष्ट्राच्या रामजी कश्यप (२.२० मि., १.१० मि. संरक्षण व २ गुण), सुयश गरगटे (१.१० मि. संरक्षण व ६ गुण), अनिकेत चेंदवणेकर (१ मि. व २ मि. संरक्षण), प्रतिक वायकर (१ मि. संरक्षण व ६ गुण), शुभम थोरात (१.३० मि., १.२० मि. संरक्षण आणि २ गुण) यांनी उत्कृष्ट खेळ केला. पराभूत संघातर्फे पाबनी साबर (१ मि. संरक्षण व ६ गुण), सुनिल पात्रा (१.१० मि. संरक्षण व २ गुण) यांनी चांगला खेळ केला.

उत्तराखंड येथे सुरू असलेल्या या नॅशनल गेम्समध्ये सर्व खेळात महाराष्ट्रच्या पथकाने चांगली कामगिरी बजावली आहे. खो-खो स्पर्धेतील यशामुळे पदक तालिकेत महाराष्ट्र राज्य प्रथम क्रमांकावर पोहोचला आहे. आतापर्यंत दहा सुवर्ण, 16 रौप्य, 11 कांस्य पदके मिळाली आहेत. खो-खो संघाने सुवर्णमय कामगिरी केल्याबद्दल दोन्ही संघाचे खेळाडू, प्रशिक्षक राजेंद्र साप्ते, पंकज चवंडे यांचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष संजीवराजे नाईक-निंबाळकर, सचिव डॉ. चंद्रजित जाधव, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार ॲड. गोविंद शर्मा यांच्यासह सर्व पदाधिकारी, सदस्य आणि खेळाडूंनी अभिनंदन केले आहे.

> सलग चार राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र पुरुष व महिला संघाने सुवर्णमय कामगिरी केली आहे. याचा मनस्वी आनंद होत आहे. यासाठी सर्व जिल्हा संघटना, राज्य शासनाचे क्रीडा खाते, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, क्रीडा मंत्री भरणे यांचे मनापासून आभार मानतो. येणाऱ्या काळात होणाऱ्या स्पर्धामध्ये महाराष्ट्र अव्वल कामगिरी करीत राहील याची खात्री देतो.
>
> **- डॉ. चंद्रजित जाधव, सचिव, महाराष्ट्र खो-खो असोसिएशन**
>
> उत्तराखंडच्या अतिशय प्रतिकूल व थंड वातावरणात महाराष्ट्राच्या मुलांनी खूप परा कष्टाने व मेहनतीने मिळवलेल्या या सुवर्णपदकांनी महाराष्ट्राला आज प्रथम क्रमांकावर स्थान मिळवून दिल्याबद्दल पथक प्रमुख या नात्याने मी खो-खो खेळाडूंचे अभिनंदन करतो.
>
> **- संजय शेटे (उपाध्यक्ष, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन)**

# मुंबईचा मेघालयवर दणदणीत विजय

## ८ विकेट्स, ८४ धावांसह शार्दूलचे महत्त्वपूर्ण योगदान





प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईतील शरद पवार क्रिकेट अकादमीमध्ये गतविजेत्या मुंबईने मेघालयाचा एक डाव आणि ४५६ धावांनी दारुण पराभव केला. या सामन्यात मेघालय संघ प्रथम फलंदाजी करताना ८६ धावांवर गारद झाला होता. प्रत्युत्तरात मुंबईने पहिला डाव ७ बाद ६७१ धावांवर घोषित केला होता. यानंतर दुससऱ्या डावात मेघालयचा संघ १२९ धावांवर गारद झाला या विजयामुळे मुंबईचे २९ गुण झाले आहेत. या सामन्यात मुंबईला आता बाद फेरीत पोहोचण्यासाठी अन्य दोन अव्वल संघांच्या निकालावरही लक्ष ठेवावे लागणार आहे. या सामन्यातील अष्टपैलू कामगिरीसाठी शार्दुल ठाकुरला सामनावीर पुरस्कार देण्यात आला.

या सामन्याच्या पहिल्या डावात गोलंदाजी करताना शार्दुल ठाकूरने मेघालयविरुद्ध हॅट्ट्रिक घेत ४ फलंदाजांना शून्यावर बाद केले. त्यानंतर मेघालयविरुद्ध पहिल्या डावात फलंदाजी करताना शार्दुलने वेगवान फलंदाजी करत प्रथम ३० चेंडूत अर्धशतक पूर्ण केले आणि त्यानंतर ४२ चेंडूत ८४ धावांची शानदार खेळी केली. यादरम्यान शार्दुलने ५ षटकार आणि ९ चौकार मारले आणि त्याचा स्ट्राईक रेट २००.०० होता. यानंतर दुसऱ्या डावातही गोलंदाजी करताना शार्दुलने ४८ धावा देत ४ विकेट्स घेतल्या.

मुंबईची सुरुवात चांगली झाली नाही आणि संघाने ४३ धावांवर २ विकेट गमावल्या, मात्र त्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या सिद्धेश लाडने शानदार खेळी करत १४५ धावा केल्या. एक षटकार आणि १७ चौकार मारले. कर्णधार अजिंक्य रहाणेने ९६ धावा करून बाद झाला आणि अवघ्या ४ धावांनी त्याचे शतक हुकले. पहिल्या डावात सहाव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या संघाचा यष्टीरक्षक आकाश आनंदनेही शतक झळकावले आणि १५ चौकारांच्या मदतीने १०३ धावा केल्यानंतर तो बाद झाला. श्रेयांश शेडगेनेही ६१ धावांची उत्कृष्ट खेळी केली. यानंतर शार्दुल ठाकूरनेही (८४) दमदार खेळी केली आणि त्याचे शतक हुकले.

# प्रभादेवीत 8 फेब्रूवारीपासून चढाई-पकडींचा थरार

## स्वामी समर्थकडून व्यावसायिक कबड्डी स्पर्धेचे आयोजन

■ मुंबई

गेली आठ दशके प्रभादेवीत कबड्डीचा दम घुमवणाऱ्या स्वामी समर्थ क्रीडा मंडळाच्या राजाभाऊ देसाई स्मृतीचषक कबड्डी स्पर्धेच्या निमित्ताने अव्वल १२ व्यावसायिक संघांची संघर्ष पुन्हा एकदा पाहायला मिळणार आहे. येत्या ८ ते ११ फेब्रूवारीदरम्यान विशेष व्यावसायिक पुरूष गट कबड्डी स्पर्धेच्या निमित्ताने दिग्गज कबड्डीपटूंचा चढाई-पकडींचा थरार कबड्डीप्रेमींना अनुभवता येणार आहे.

कबड्डीला प्रो कबड्डीची श्रीमंती लाभण्यापूर्वी कबड्डी आणि कबड्डीपटूंना मान आणि सन्मान मिळवून देताना दिमाखदार स्पर्धांचे आयोजन करणाऱ्या ८१ वर्षांच्या तरुण तडफदार स्वामी समर्थ क्रीडा मंडळाने पुन्हा एकदा विशेष व्यावसायिक गट कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले आहे. यंदाही मंडळाच्या विशेष व्यावसायिक स्पर्धेत इन्शुअरकोट स्पोर्टस् (युवा पलटन), सेंट्रल बँक, मुंबई महानगर पालिका, रिझर्व्ह बँक, मिडलाईन ॲकॅडमी, एमपीएमसी पुणे, मुंबई पोर्ट ट्रस्ट अशा बलाढ्य संघांचा 'दम'दार खेळ चवन्नी गल्लीत उभारलेल्या क्रीडानगरीतील एका मॅटच्या मैदानावर पाहण्याची संधी मिळणार आहे.

**विजेत्याला लक्षाधिश करणार**

कबड्डी संघ आणि कबड्डीपटूंना प्रोत्साहन मिळावे म्हणून या स्पर्धेत विजेत्या संघाला लाखमोलाचे म्हणजे १,११,१११ रुपयांचे रोख इनाम दिले जाणार असल्याची माहिती आमदार आणि मंडळाचे प्रमुख कार्यवाह महेश सावंत यांनी दिली. तसेच उपविजेत्या संघालाही ८० हजार रुपये आणि चषक दिला जाणार आहे. एवढेच नव्हे तर उपांत्य सामन्यात पराभूत झालेल्या संघांनाही रोख इनाम देऊन सन्मानित केले जाणार असल्याची माहिती आमदार सावंत यांनी दिली. स्पर्धेत एकंदर १२ बलाढ्य संघ खेळणार असून तीन-तीन संघांचे चार गट खेळविले जातील. प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ उपांत्यपूर्व फेरीसाठी एकमेकांशी भिडतील. स्पर्धा अधिक रंजक आणि थरारक व्हावी म्हणून एकाच मॅटवर खेळविली जाणार असून प्रत्येक दिवशी पाच सामने खेळविले जाणार असल्याची माहिती मंडळाचे क्रीडाप्रमुख रवी शिंदे यांनी दिली.

# नवनियुक्त 236 अग्निशामक ऑगस्ट 2024 पासून वेतन व प्रशिक्षण भत्त्यापासून वंचित

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महापालिकेच्या अग्निशमन दलामध्ये १६.८.२०२४ रोजी २३६ अग्निशामक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. परंतु सदर कर्मचाऱ्यांना अग्निशमन दल प्रशासनाचा गलथानपणा, प्रशासकीय उदासीनता यामुळे हे सर्व नवनियुक्त कर्मचारी त्यांच्या नियुक्तीपासून आजतागायत कायदेशीर वेतनापासून वंचित आहेत. तसेच सदर कर्मचाऱ्यांना त्यापूर्वी घेण्यात आलेल्या ६ महिन्याच्या प्रशिक्षण कालावधीचा प्रशिक्षण भत्ता ही देण्यात आलेला नाही. अशी कैफियत दि म्युनिसिपल युनियनचे सरचिटणीस रमाकांत बने यांनी मांडली आहे.

या नवनियुक्त अग्निशामक कर्मचाऱ्यांमध्ये महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून, गरीब घरातून अनेक मुले/ मुली भरती झाल्या असून, सध्या त्यांनी तात्पुरता नातेवाईकांकडे तात्पुरता आसरा घेतला असून, वेतन न मिळाल्यामुळे खायचे काय, आणि प्रवास कसा करायचा, हे प्रश्न रोज त्यांच्यासमोर यक्ष म्हणून उभे असतात. कित्येक मुले / मुली त्यामुळे कर्जाच्या विळख्यात सापडण्याचा संभव आहे. त्यांच्याकडे अधिक चौकशी करता या कर्मचाऱ्यांसह महापालिकेत नव्याने नियुक्त झालेले अनेक कामगार, कर्मचारी सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधीकरिता त्यांच्या कायदेशीर वेतनापासून वंचित असल्याचे कळते. त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांमध्ये कमालीचा असंतोष पसरलेला आहे.

महापालिका अग्निशमन दल प्रशासनाची ही उदासीन कृती ही महापालिकेला लागू असलेल्या विविध कामगार कायद्याच्या तरतुदींचा भंग तर आहेच, त्याशिवाय फौजदारी गुन्हा दाखल होऊ शकेल अशी कृती आहे. असेही रमांकात बने यांनी म्हटले आहे.

संबंधित सर्व नवनियुक्त अग्निशामकांना त्यांच्या कायदेशीर वेतनाचे तसेच प्रशिक्षण भत्त्याचे अधिदान थकबाकीसह माहे फेब्रुवारी २०२५ च्या वेतनाबरोबर करण्यात यावे, अशी विनंती महापालिका उप आयुक्त (वित्त) व प्रमुख अग्निशमन अधिकारी यांना करण्यात आली असल्याचेही संघटनेचे सरचिटणीस रमाकांत बने यांनी म्हटले आहे.

# राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्यावतीने कामगारांचा पुन्हा थकीत पगारावर एनटीसीवर हंगामा!

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईतील एनटीसीच्या चार बंद गिरण्यातील कामगा रांच्या थकीत पगारावर राष्ट्रीय मिल मजदूर संघांच्या वतीने बेलार्ड पिअर येथील प्रधान कार्यालयावर संतप्त कामगारांनी आज हंगामा केला.संघटनेचे अध्यक्ष आमदार सचिनभाऊ अहिर आणि सरचिटणीस गोविंदराव मोहिते यांच्या आदेशानुसार आज हे निदर्शनाचे पाऊल उचलण्यात आले होते.बंद मिलच्या कामगारांनी आज एनटीसी हाऊस मध्ये घोषणा देत अधिक-यांना घेराव घातला. एनटीसीचे कार्यकारी अधिकारी पी.कुंगुमाराजू यांनी संघटनेचे खजिनदार निवृत्ती देसाई यांच्या नेतृत्वाखाली भेटावयास गेलेल्या शिष्टमंडळाला सांगितले की, कामगारांचा येत्या दोन महिन्यांत थकीत पगार मिळेल आणि तो पुढे सातत्याने मिळत राहील. गिरण्या बंदच्या काळात निवृत्त होणा-या कामगारांना त्यांची देणी देण्या बाबत,तसेच खाते निहाय सेवा बढतीचाही प्राधान्याने विचार केला जाईल,असेही एनटीसी अधिका-यांनी शिष्टमंडळाला आश्वासन देताना सांगितले.



गेल्याच महिन्यात २४ डिसेंबर रोजी गिरणी कामगारांनी तीन महिन्याच्या थकीत पगारासाठी एनटीसी व्यवस्थापनाला घेराव घातला होता.त्यावेळी एनटिसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुंगुमाराजू यांनी दिल्ली होर्डींग्ज कंपनीशी बोलणी करुन हा प्रश्न मार्गी लावण्याचे कामगारांना आश्वासन दिले होते.पण या प्रश्नावर संघटनेने सातत्याने पाठपुरावा करूनही व्यवस्थापनाने अकारण कालापव्यय लावला. त्यामुळे राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या वतीने आज निदर्शनाचे पाऊल उचलण्यात आले.

खजिनदार निवृत्ती देसाई,उपाध्यक्ष रघुनाथ आण्णा शिर्सेकर,सेक्रेटरी शिवाजी काळे यांच्या नेतृत्वाखाली कामगारांनी एनटीसीच्या बेलार्ड पियर येथील प्रधान कार्यालयावर तिव्र निदर्शने केली.संघटनेचे उपाध्यक्ष सूनिल बोरकर हे न्यायालयातील तांतडीच्या कामामुळे आंदोलनात सहभागी होऊ शकले नाहीत तरी त्यांचे याकामी महत्त्वपूर्ण सहकार्य राहीले आहे. संघटन सेक्रेटरी दीपक राणे,बबन आसवले, प्रकाश भोसले,सखाराम भणगे,गजानन कदम यांचा आंदोलन यशस्वी करण्यात महत्त्वाचा वाटा राहिला आहे. सुनिता खराडे,पूजा माळकर,छाया पाटील,सुभाष नारकर, राजेंद्र नारकर,आरती आणसूळकर आदी कार्यकर्ते, प्रतिनिधीनी आंदोलनात सहभागी झाले होते.

केंद्र सरकारच्या अखत्यारीतील देशभरातील चालू असलेल्या २३ गिरण्या सन २०२० मध्ये कोविडचे कारण पुढे करून बंद करण्यात आल्या,त्या अद्याप सुरू करण्यात आलेल्या नाहीत.रामिम संघाचे अध्यक्ष आमदार सचिनभाऊ अहिर यांच्या नेतृत्वाखाली आणि सरचिटणीस गोविंदराव मोहिते यांच्या पुढाकाराने राष्ट्रीय समन्वयक कृती समिती स्थापन करुन दिल्ली संसदेवर आंदोलन छेडण्यात आले होते.या प्रश्नावर खासदारांच्या शिष्टमंडळाकडून केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्र्याची भेटही घेण्यात आली होती.परंतु या प्रश्नावर केंद्र सरकारने पहिल्या पासूनच नरो वा कुंजोरोची भूमिका घेतली.या गिरण्यात मुंबईतील टाटा,इंदू मिल क्र.५,पोद्दार, दिग्विजय तसेच बार्शी,अचलपूर या महाराष्ट्राच्या सहा एनटीसी गिरण्यांचा समावेश आहे. मुंबईतील गिरण्या म्हणजे सोन्याचे अंड देणारी कोंबडी आहे,या दृष्टीकोनातून त्यांच्याकडे पाहिले गेले आहे.

मुंबईसह राज्यातील सहा एनटीसी गिरण्यांच्या गंभीर परिस्थितीकडे लक्ष वेधण्यासाठी मुंबईत किमान तीन वेळा गिरणगावात अध्यक्ष आमदार सचिनभाऊ अहिर, सरचिटणीस गोविंदराव मोहिते यांच्या नेतृत्वाखाली आंदोलने छेडण्यात आली.एनटीसी गिरण्यांची स्थावर मालमत्ता कोट्यवधी रुपयांची आहे. देशातील इस्पितले,सरकारी कार्यालये आदींसाठी लागणारे कापड, एनटीसी गिरण्यां मधून सक्तीने खरेदी करण्याची अट घालण्यात आली असती तर या गिरण्या सुस्थितीत चालू शकल्या असत्या,शिवाय या गिरण्यांचे आधुनिकीकरण झाले असते,तर या गिरण्यावर बंदची पाळी आली नसती, या गोष्टीकडे अध्यक्ष आमदार सचिनभाऊ अहिर यांनी सरकारचे लक्ष वेधले होते.

एनटीसी बंद गिरण्यांच्या प्रश्नावर संघटना नेतृत्वाने न्यायालयाचा मार्ग अनुसरतानाच,अनेक खासदारांना निवेदने देऊन हा प्रश्न केंद्रीय स्तरावरून सोडविण्याचा आग्रह केला आहे.केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्र्यांनाही निवेदन देण्यात आले आहे.या प्रश्नावर लवकरच वस्त्रोद्योगमंत्री यांचीही भेट घेण्यात येणार आहे.या गिरण्या सरकारला चालवाव्याच लागतील अन्यथा कामगारांना पगार द्यावाच लागेल,असा आजच्या आंदोलनाद्वारे सरकारला इशारा देण्यात आला आहे.

# उद्या बृहन्मुंबई महानगरपालिकेचा अर्थसंकल्प होणार सादर

प्रतिनिधी
■ मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सन २०२५-२६ चे अर्थसंकल्पीय अंदाज उद्या मंगळवारी ४ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता महानगरपालिका मुख्यालयातील सभागृहात सादर करण्यात येणार आहेत.

प्रारंभी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी हे शिक्षण खात्याचा अर्थसंकल्पीय अंदाज महानगरपालिका आयुक्त, प्रशासक भूषण गगराणी यांना सादर करतील. तर अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर हे पालिकेचे अर्थसंकल्पीय अंदाज महानगरपालिका प्रशासक भूषण गगराणी यांना सादर करणार आहेत.

# भायखळा प्राणीसंग्रहालयातील मत्स्यालयासाठीची निविदा रद्द करा - सपा आमदार रईस शेख

प्रतिनिधी
■ मुंबई

भायखळा प्राणीसंग्रहालयातील ५ हजार चौरस फूट मत्स्यालयाच्या बांधकामासाठी ६५ कोटी रुपयांची निविदा काढण्यात आली आहे.त्यात एकच निविदाकार सहभागी झाला आहे शिवाय या मत्स्यालयासाठी राखीव ठेवलेले एकूण क्षेत्रफळ फक्त ५ हजार चौरस फूट आहे, ज्याची उंची २० फुटांपेक्षा कमी आहे. असे असूनही, पालिका या प्रकल्पासाठी कोट्यवधी रुपये खर्च करीत आहे. हे ढिसाळ नियोजन असून निविदा रद्द करावी तसेच संबंधित अधिकारी आणि सल्लागारांची चौकशी करण्यात यावी अशी मागणी सपाचे आमदार रईस शेख यांनी पालिका आयुक्तांकडे केली आहे.

प्रस्तावित मत्स्यालय सुरक्षेच्यादृष्टीने धोका दर्शवते. मत्स्यालय पेंग्विन एन्क्लोजरच्या अगदी समोर आहे, जिथे दररोज मोठ्या संख्येने पर्यटक येतात. कोणतीही अनुचित घटना घडल्यास, आगीचा धोका, चेंगराचेंगरी किंवा इतर सुरक्षिततेच्या समस्या उद्भवू शकतात. शिवाय, मत्स्यालयाच्या लहान आकारामुळे, कोणत्याही वेळी पुरेसे पर्यटक मत्स्यालय पाहू शकणार नसल्याचे शेख यांनी म्हटले आहे. ही जागा मुळात पेंग्विन एन्क्लोजरच्या स्मरणिका दुकानासाठी राखीव ठेवण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

निविदा प्रक्रियेत फक्त एकाच निविदाकाराने भाग घेतला आहे. त्यामुळे निष्पक्षता आणि पारदर्शकतेबद्दल गंभीर प्रश्न निर्माण होतो. एका निविदाकाराचा सहभाग हे स्पष्टपणे सूचित करते की निविदा प्रक्रियेत गैरप्रकार झाला आहे. त्यामुळे पुरेशा जागेचा अभाव, चेंगराचेंगरी आणि आगीच्या धोक्यांचे संभाव्य धोके आणि निविदेमध्ये असलेल्या अनियमितता यामुळे ही निविदा त्वरित रद्द करावी अशी मागणी शेख यांनी केली.

मत्स्यालय मफतलाल मिलच्या जमिनीवर स्थलांतरित करा अशा ढिसाळ नियोजनासाठी आणि करदात्यांच्या पैशातून ५ हजार चौरस फूट मत्स्यालयाच्या बांधकामासाठी ६५ कोटी रुपये खर्च करण्याच्याबाबत अधिकारी आणि सल्लागारांविरुद्ध चौकशी सुरू करावी. हे मस्त्यालय भविष्यात मृत्यूचा सापळा बनू शकेल. मत्स्यालय मफतलाल मिलच्या जमिनीवर स्थलांतरित करण्याची मागणीही शेख यांनी केली आहे.

# शुक्रवारी दादासाहेब गायकवाड केंद्रात माता रमाई आंबेडकर यांचा 127 वा जयंती सोहळा

■ मुंबई

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्र, मुंबई तर्फे माता रमाई आंबेडकर यांचा १२७ वा.जयंती सोहळा केंद्राचे अध्यक्ष विजय जाधव यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार ७ फेब्रुवारी २०२५, सायंकाळी ५.०० वाजता सम्राट अशोका सभागृह, पहिला मजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी भवन,लोखंडवाला रोड, चार बंगला, अंधेरी (प) येथे साजरा करण्यात येणार आहे.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अनिता वानखेडे मेश्राम, आय.ए.एस व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मत्स्य विकास महामंडळ, मुंबई तसेच विशेष पाहुण्या म्हणून सुप्रसिध्द अभिनेत्री सोनाली कुलकर्णी आणि प्रमुख वक्त्या म्हणून मुंबई विद्यापीठ, मराठी विभाग प्रमुख, प्रा. वंदना महाजन, प्रशासकीय अधिकारी,बृहन्मुंबई महानगर पालिका सर्व शाळा, जी दक्षिण विभाग वर्षा संतोष गांगुर्डेउपस्थित राहणार आहे.केंद्राच्या महिला विकास विभागातर्फे यावेळी माता रमाई यांच्या जीवनावर संगीतमय कार्यक्रम शाहीर राम जाधव कलामंच, मुंबई सादर करणार आहेत.

# मध्य रेल्वेच्या मुंबई विभागात रविवारी मुख्य मार्गावर मेगा ब्लॉक

## मात्र हार्बर आणि ट्रान्स हार्बर मार्गावर मेगाब्लॉक नाही



प्रतिनिधी
■ मुंबई

मध्य रेल्वे, मुंबई विभाग रविवारी उपनगरीय विभागांवर विविध अभियांत्रिकी आणि देखभालीची कामे करण्यासाठी मेगा ब्लॉक आयोजित करण्यात आहे. माटुंगा आणि मुलुंड स्थानकांदरम्यान सकाळी ११.३० ते दुपारी ३.३० वाजेपर्यंत अप आणि डाऊन जलद मार्ग येथे हा मेगा ब्लॉक असेल. त्यामुळे

सकाळी १०.५८ ते दुपारी ३.१० वाजेपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून सुटणाऱ्या डाऊन जलद मार्गावरील सेवा माटुंगा येथे डाऊन धीम्या मार्गावर वळवल्या जातील, माटुंगा आणि मुलुंड स्थानकांदरम्यान त्यांच्या नियोजित थांब्यांवर थांबतील आणि १५ मिनिटे उशिराने त्यांच्या गंतव्यस्थानी पोहोचतील. तर ठाण्यापलीकडे जाणाऱ्या जलद गाड्या मुलुंड येथे पुन्हा डाऊन जलद मार्गावर वळवल्या जातील.

सकाळी ११.२५ ते दुपारी ३.२७ पर्यंत ठाणे येथून सुटणाऱ्या अप जलद मार्गावरील गाड्या मुलुंड येथे अप धीम्या मार्गावर वळवल्या जातील, मुलुंड आणि माटुंगा दरम्यान नियोजित थांब्यांवर थांबतील आणि माटुंगा स्थानकावर पुन्हा अप जलद मार्गावर वळवल्या जातील आणि त्यांच्या गंतव्यस्थानावर १५ मिनिटे उशिराने पोहोचतील.

हार्बर मार्गावर आणि ट्रान्स हार्बर मार्गावर कुठेही मेगा ब्लॉक राहणार नाही असे मध्या रेल्वेने स्पष्ट केले आहे.

## ट्रम्प यांनी कॅनडा-मेक्सिकोवर 25% टॅरिफ लादले, चीनवरही 10% टॅरिफ लावणार

**वॉशिंग्टन:** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आज, म्हणजे 1 फेब्रुवारी रोजी, कॅनडा आणि मेक्सिकोवर 25% आणि चीनवर 10% टॅरिफ लादला आहे. त्यांनी यासंदर्भातील कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी केली. या दरम्यान, जेव्हा ट्रम्प यांना विचारण्यात आले की हे देश टॅरिफ लांबणीवर टाकण्यासाठी काही करू शकतात का? त्याने उत्तर दिले की तो आता काहीही करू शकत नाही. शुक्रवारी, व्हाईट हाऊसच्या प्रवक्त्या कॅरोलाइन लेविट म्हणाल्या की डोनाल्ड ट्रम्प शनिवारपासून कॅनडा आणि मेक्सिकोमधून आयात होणाऱ्या वस्तूंवर २५% आणि चिनी वस्तूंवर १०% कर लादतील. यापूर्वी कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो म्हणाले होते की आम्हाला असे काहीही घडू द्यायचे नाही, परंतु जर त्यांनी पुढे पाऊल टाकले तर आम्ही देखील कारवाई करू. मीडिया रिपोर्ट्सनुसार, कॅनडा प्रत्युत्तर म्हणून ट्रम्प यांच्या गृहराज्य फ्लोरिडा येथून येणाऱ्या संत्र्याच्या रसावर शुल्क लादू शकते.



# केजरीवालांनी प्रचारात 450 कोटी खर्च केले

## मोदी सरकारकडे दूरदृष्टी नाही, देशात बेरोजगारी वाढतेय...

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

काँग्रेस खासदार प्रियंका गांधी यांची दिल्लीतील चांदनी चौकात सभा झाली. त्यांनी जनतेला सांगितले - दिखाव्यावर जाऊ नका, टीव्ही जाहिरातींवर जाऊ नका. मी कुठेतरी वाचले की केजरीवाल यांनी प्रचारात 450 कोटी रुपये खर्च केले. केजरीवालांनी एवढी गुंतवणूक केली तर मोदीजींनी हजारो कोटींची गुंतवणूक केली असावी.

त्या म्हणाल्या, 'हे लोक स्वतःचे हित जोपासत आहेत, तुम्हीही तुमचे हित पहा. तुमच्या आयुष्यात प्रगती झाली आहे की नाही, रस्ते बांधले आहेत की नाही हे तुम्ही पहा. याला हलके घेऊ नका, यातून तुम्ही देशाचे भविष्य घडवू शकता. आज तुम्ही प्रत्येक गोष्टीवर कर भरत आहात आणि किती कमाई करत आहात. बेरोजगारी वाढत आहे. केंद्र आणि दिल्लीत हजारो पदे रिक्त आहेत.



प्रियंका म्हणाल्या- भाजपच्या राजवटीत रोजगार वाढत नाही तर कमी होत आहे. बघा, चीनमध्ये उत्पादनाचे काम सुरू आहे, त्यामुळे प्रगती होत आहे. आमच्यातही टॅलेंट आहे पण आम्हाला कोणी संधी देत नाही. धोरण नाही, दूरदृष्टी नाही.

त्या म्हणाल्या की हे लोक नेहरूजींना शिव्या देतात पण त्यांच्याकडे दृष्टी होती. त्यांच्या दूरदृष्टीमुळेच आज देशाची स्थिती बांगलादेश आणि श्रीलंकासारखी झाली नाही कारण देश बलवान होता. नेता आणि राजकारणी ओळखायचे असतील तर त्यांचे शब्द नव्हे तर त्यांचे कार्य पहा.

प्रियंका म्हणाली- एक छोटा दुकानदार नेहमीच रोजगार देणारा असतो. सरकारी कंपन्या नेहरू आणि इंदिराजींनी बांधल्या होत्या. यामध्ये रोजगाराची हमी होती. सरकारी नोकरी मिळाली तर बरं होईल, असं लोकांना वाटत होतं. आज सरकारी कंपन्याही खाजगी हातात गेल्या आहेत.

त्या म्हणाल्या की दिल्लीत काही म्हणतात की त्यांनी शीशमहाल बांधला आणि काही म्हणतात की त्यांनी राजमहाल बांधला, हे दिल्लीचे मुद्दे आहेत का? संसदेत आज महागाईच्या मुद्द्यावर कोणतीही चर्चा झाली नाही. निवडणुकीच्या वेळी आश्वासने देतात पण पूर्ण किती? कर्नाटक आणि हिमाचलमध्ये बघा, महिलांच्या खात्यात पैसे जात आहेत.

प्रियंका म्हणाल्या की, आज ते (भाजप) 500 रुपयांना गॅस सिलिंडर देणार असल्याचे सांगत आहेत. ते आजपर्यंत कुठे होते? केंद्रात भाजपचे आणि दिल्लीत आपचे सरकार होते. हे अद्याप का दिले नाही? आता निवडणुकीत आश्वासन दिले आहे, पुढे काय होते ते पाहू. त्या म्हणाल्या- राजस्थानमध्ये काँग्रेस सरकारच्या काळात 25 लाख रुपयांचे उपचार मोफत होते. आज देशाची संपत्ती अदानींना दिली जात आहे. किती लग्नसोहळे साजरे होत आहेत हे तुम्ही सोशल मीडियावर पाहत आहात. हे सर्व आपल्या मालमत्तेवर होत आहे. तुमची मालमत्ता अदानीला मोफत दिली जात आहे. दिल्लीतील सर्व 70 जागांवर 5 फेब्रुवारीला मतदान होणार आहे. तर 8 फेब्रुवारीला निकाल जाहीर होणार आहेत. विधानसभेच्या 70 जागांसाठी एकूण 699 उमेदवार रिंगणात आहेत. विधानसभेचा सध्याचा कार्यकाळ 23 फेब्रुवारीला संपत आहे.

# 'आप' सोडलेल्या 8 आमदारांनी केला भाजपमध्ये प्रवेश



**रोहित मेहरोलिया**
त्रिलोकपुरी



**राजेश ऋषि**
जनकपुरी



**मदनलाल**
कस्तूरबा नगर



**भूपेंद्र सिंह जून**
बिजवासन



**पवन शर्मा**
आदर्श नगर



**भावना गौड**
पालम



**नरेश यादव**
मेहरौली



**गिरीश सोनी**
मादीपुर

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

आम आदमी पक्ष (आप) सोडून गेलेले आठ आमदार शनिवारी भाजपमध्ये सामील झाले. एक दिवस आधी, या आमदारांनी निवडणुकीची तिकिटे न मिळणे आणि भ्रष्टाचार हे राजीनाम्याचे कारण असल्याचे सांगितले होते.

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी 5 फेब्रुवारी रोजी मतदान होत आहे. या नेत्यांचे 4 दिवस आधी भाजपमध्ये प्रवेश करणे आपसाठी मोठी समस्या बनू शकते. याचा परिणाम पक्षाला मिळणाऱ्या मतांवर होऊ शकतो. आपचे आमदार ऋतुराज झा यांनी भाजपवर या आमदारांना आमिष दाखवल्याचा आरोप केला होता. त्यांनी सांगितले होते की मलाही पक्ष सोडण्याचे आमिष दाखवण्यात आले होते. पण मी शेवटच्या श्वासापर्यंत आपमध्येच राहीन. 'आप'ने 21 नोव्हेंबर ते 20 डिसेंबर दरम्यान, म्हणजेच 30 दिवसांत एकूण 5 यादींमध्ये 70 उमेदवारांची नावे जाहीर केली होती. यामध्ये 26 आमदारांचे तिकिटे कापण्यात आले तर 4 आमदारांच्या जागा बदलण्यात आल्या. दिल्लीत 5 फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. निकाल 8 फेब्रुवारी रोजी येईल.

सीलमपूरच्या आमदाराने 10 डिसेंबर रोजी राजीनामा दिला. आम आदमी पक्षाने 21 नोव्हेंबर रोजी उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. त्यात सीलमपूरचे आमदार अब्दुल रहमान यांचे नाव नव्हते. यावर अब्दुल रहमान उघडपणे अरविंद केजरीवाल यांच्या विरोधात उभे राहिले.


# अमेरिकन संसदेत चिनी AI डीपसीकच्या वापरावर बंदी

## फोन-कॉम्प्युटरवरही इन्स्टॉल करण्यास मनाई

वृत्तसंस्था
वॉशिंग्टन

अमेरिकन संसद आणि काँग्रेसने त्यांच्या कार्यालयात चीनच्या आर्टिफिशियल इंटेलिजेंस (AI) चॅटबॉट डीपसीकच्या वापरावर बंदी घातली आहे. एक्सिओसच्या रिपोर्टनुसार, यूएस काँग्रेसने यासंदर्भात एक नोटीस जारी करून म्हटले आहे की, सिस्टममध्ये धोकादायक सॉफ्टवेअर अपलोड करण्यासाठी अनेक चॅटबॉट्सचा वापर केला जात आहे. हे डीपसीकशी संबंधित धोके देखील स्पष्ट करते.

यूएस काँग्रेसने म्हटले आहे की, एआय तंत्रज्ञानाच्या जलद विकासामुळे सुरक्षा आणि प्रशासकीय आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. त्याच वेळी, काँग्रेसचे मुख्य प्रशासकीय अधिकारी म्हणतात की सध्या डीपसीकची चौकशी सुरू आहे. या कारणास्तव ते यूएस काँग्रेस कार्यालयांमध्ये वापरले जाऊ शकत नाही. कोणत्याही संभाव्य धोक्याचा सामना करण्यासाठी, सभागृहाने जारी केलेल्या सर्व उपकरणांमध्ये डीपसीकच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे. तसेच, कर्मचाऱ्यांना अधिकृत फोन, संगणक आणि टॅब्लेटवर डीपसीक स्थापित करण्यास बंदी घालण्यात आली आहे.




**डीपसीकची वैशिष्ट्ये**

डीपसीकएक AI चॅटबॉट आहे. फक्त आज्ञा द्यावी लागते आणि त्यानुसार निकाल लागतो. ChatGPT, Meta सारख्या इतर AI मॉडेल्सवर करता येणारे सर्व काम ते करू शकते. डीपसीक एआय कोडींग आणि गणितासारखी जटिल कामेही अचूकतेने पूर्ण करण्यास सक्षम आहे. हे एक विनामूल्य आणि मुक्त स्रोत AI मॉडेल आहे, ते जगभरातील प्रत्येकासाठी सहज उपलब्ध आहे.

डीपसीक हे पूर्णपणे मोफत आणि मुक्त स्रोत AI मॉडेल आहे. याशिवाय चीनचे मॉडेल अत्यंत कमी खर्चात तयार करण्यात आले आहे, तर एनव्हीडिया, मायक्रोसॉफ्ट आणि मेटा सारख्या अमेरिकन कंपन्यांनी एआय मॉडेल्स तयार करण्यासाठी मोठी गुंतवणूक केली आहे. काही रिपोर्ट्समध्ये असा दावा करण्यात आला आहे की डीपसीक कंपनीने त्याचे एआय मॉडेल फक्त 48.45 कोटी रुपयांमध्ये विकसित केले होते.

# उपराष्ट्रपती धनखड यांचे संगममध्ये स्नान

## 77 देशांचे प्रतिनिधी महाकुंभात पोहोचले, मेळ्यात कठोरतेवरून रवींद्र पुरी नाराज





वृत्तसंस्था
प्रयागराज

उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभमेळ्यात भारतासह जगातील विविध भागातून कोट्यवधी भाविक स्नान करण्यासाठी संगम येथे पोहोचत आहेत. त्याचक्रमाने, भारताचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड हे देखील शनिवारी महाकुंभ मेळ्याला आले होते. उपराष्ट्रपती धनखड आणि 73 देशांचे 116 राजनयिक महाकुंभ मेळयात संगमात स्नान करण्यासाठी पोहोचले. यासोबतच, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ हे देखील शनिवारी मेळयात आले आणि धार्मिक कार्यक्रमात सहभागी झाले.

सरकारने जाहीर केलेल्या माहितीनुसार, शनिवारी 73 देशांमधील 116 राजदूतांनी महाकुंभ मेळ्याला भेट दिली. या राजदूतांनी संगमात स्नानही केले. त्यांनी राजदूत अक्षयवट, सरस्वती कूप आणि झोपलेल्या हनुमान मंदिरालाही भेट दिली. आज प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभमेळयाला अमेरिका, ब्राझील, दक्षिण आफ्रिका, फ्रान्स, रशिया, स्वित्झर्लंड, जपान, न्यूजीलँड, जर्मनी, नेपाळ आणि कॅनडा यासह अनेक देशांचे राजदूत उपस्थित राहणार आहेत. यापूर्वी, 2019 च्या कुंभमेळ्यातही 73 देशांच्या राजदूतांना आमंत्रित करण्यात आले होते.

# कोलंबियाच्या राष्ट्रपतींनी अमेरिकेत राहणाऱ्या स्थलांतरितांना मायदेशी बोलावले

वृत्तसंस्था
बोगोटा

मी यूएस मधील अनधिकृत कोलंबियन लोकांना आवाहन करतो की त्यांनी त्या देशातील नोकऱ्या त्वरित सोडा आणि शक्य तितक्या लवकर कोलंबियाला परत या आणि देशाची उभारणी करा.

ते म्हणाले की, कोलंबिया सरकार कोलंबियाला परत येण्याची ऑफर स्वीकारणाऱ्या सर्वांना व्यवसायासाठी कर्ज देईल. तथापि, कोलंबियाला परतणाऱ्या लोकांना किती रक्कम मिळेल हे त्यांनी सांगितले नाही.

प्यू रिसर्च सेंटरच्या मते, अमेरिकेत सुमारे 2 दशलक्ष अवैध कोलंबियन राहतात. कोलंबियाची लोकसंख्या 5 कोटींहून अधिक आहे. कोलंबियन म्हणाले- आधी देशात राहणाऱ्या लोकांना मदत करा गुस्तावो पेट्रो हे कोलंबियाचे पहिले डावे राष्ट्रपती आहेत. 2022 मध्ये ते देशाचे राष्ट्रपती झाले.

# 'हमास'ने 3 इस्रायली ओलीस सोडले

## रेडक्रॉसच्या मदतीने इस्रायल गाठले; 183 पॅलेस्टिनी कैद्यांची लवकरच सुटका

वृत्तसंस्था
तेल अवीव

हमासने शनिवारी यार्डन बिबास (35), ऑफर कॅल्डेरॉन (54) आणि कीथ सिगेल (65) या इस्रायली ओलीसांची युद्धविराम करारानुसार सुटका केली. रेडक्रॉसच्या मदतीने हे इस्रायली लष्कराकडे सुपूर्द करण्यात आले. कीथ सिगल वगळता इतर दोन ओलीस इस्रायलला पोहोचले आहेत.

इस्रायल लवकरच 183 पॅलेस्टिनी कैद्यांची सुटका करणार आहे. गेल्या आठवड्यात हा करार लागू झाल्यापासून एकूण 10 इस्रायली आणि 5 थाई ओलिसांची सुटका करण्यात आली आहे. सुटका करण्यात आलेल्या



ओलिसांपैकी यार्डन बिबास हा सर्वात लहान ओलिसाचा पिता आहे. 7 ऑक्टोबर रोजी हमासच्या सैनिकांनी यार्डनच्या मुलाचे अपहरण केले तेव्हा तो केवळ 9 महिन्यांचा होता. तेव्हा तो हमासने ठेवलेला सर्वात तरुण ओलीस होता ओलिस ठेवलेल्या यार्डन बिबासचे त्याची पत्नी शिरी आणि दोन मुले केफिर आणि एरियल यांच्यासह नीर ओझ किबुट्झ येथून अपहरण करण्यात आले होते. बिबासची पत्नी शिरी आणि त्याची दोन्ही मुले हमासच्या ताब्यात असताना मरण पावली. हमासने नोव्हेंबर 2023 मध्ये दावा केला होता की इस्रायली बॉम्बहल्ल्यात त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर हमासने एक व्हिडिओही जारी केला होता ज्यामध्ये यार्डन बिबास यांनी इस्रायलचे पंतप्रधान नेतन्याहू यांना त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या मृत्यूसाठी जबाबदार धरले होते. मात्र, इस्रायलने हमासचा हा दावा कधीच मान्य केला नाही.

# यमुना वादानंतर सैनी बनले दिल्ली निवडणुकीचा चेहरा

## बैलगाडीत पाणी भरुन प्रचार

चंदीगड

हरियाणा आणि दिल्ली यांच्यातील यमुना वादानंतर हरियाणाचे मुख्यमंत्री दिल्ली विधानसभा निवडणुकीचा चेहरा बनले आहेत. सीएम नायब सिंग सैनी यमुनेच्या प्रदूषणाचा मुद्दा या सभांमध्ये सतत उपस्थित करत आहेत. यासोबतच दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना यासाठी थेट जबाबदार धरले जात आहे.

दिल्लीतील निवडणूक प्रचारादरम्यान सीएम सैनी यांनी यमुनेच्या पाण्याने एक घागर भरला आणि बैलगाडीतून निघाले. केजरीवाल यांनी आपले अपयश लपवण्यासाठी प्रचाराची तयारी केली असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. केजरीवाल यांनी 10 वर्षांपूर्वी दिल्लीतील जनतेला यमुनेचे पाणी स्वच्छ करण्यास सांगून मते मिळवली होती. या यमुनेत गणेशमूर्तीचे विसर्जन होते आणि छठपूजाही होते, सैनी म्हणाले की, हरियाणावरील या घृणास्पद आरोपासाठी हरियाणा केजरीवाल यांना कधीही माफ करणार नाही. केजरीवाल यांनी ज्या मातीत जन्म घेतला ती माती कलंकित केली आहे.

# दाट धुक्यात 12 प्रवासी असलेली क्रूझर कोसळळी; 10 जण बेपत्ता

चंदिगड

हरियाणामध्ये धुक्यामुळे भयानक अपघात झाल्याचा प्रकार समोर आला आहे. शुक्रवारी रात्री हरियाणाच्या फतेहाबाद येथे दाट धुक्यामुळे १२ प्रवासी असलेली क्रूझर कार भाकरा कॅनलमध्ये कोसळली असून १० जण बेपत्ता झाले आहेत. रात्री उशीरपर्यंत बचाव कार्य सुरू होते, पण प्रशासकीय अधिकाऱ्यांनी १० वर्षीय मुलाला वाचवण्यात यश मिळाले तसेच एका ५५ वर्षीय व्यक्तीचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. वाहनाचा चालक जरनैल सिंग याने वाहन पाण्यात पडण्याची आधीच बाहेर उडी घेतली आणि तो सुखरुप बचावला.

# माघी गणेश दर्शन




श्री. संदीप कदम यांच्या घरी विराजमान झालेली श्री गणरायाची सुबक मूर्ती.
बाळकुम, ठाणे



श्री. राजेश गजानन माजलकर यांच्या घरी विराजमान झालेली श्री गणरायाची महाकाल रूपातील मूर्ती.
सजावटकार - सुयलेश चंद्रकांत सावंत
काळाचौकी, मुंबई



श्री. सिद्धनाथ तूकाराम पाटील यांच्या घरातील श्रींची मूर्ती. मु. पो. हाशिवरे ता. अलिबाग



श्री. गजेंद्र बाजीराव कदम यांच्या घरात विराजमान झालेली श्री गणरायाची सुबक मूर्ती.
टिटवाळा जि. ठाणे